नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी
१९८५

अनुक्रमणिका

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : मधुकर रघुनाथ आष्टीकर ✻ कार्यकारी संपादक : वसंत खेरडोकर

अनुक्रमणिका

युगवाणी 'ज्ञानेश्वर' विशेषाङ्क

लेखकांना विनंती की त्यांनी आपले संशोधनपर वा इतर स्वरूपाचे 'ज्ञानेश्वर'विषयक लिखाण सप्टेंबर १० पूर्वी पाठवावे.

—संपादक

गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशीराणी चौक, नागपूर–१२.
: म. पां. वनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.

‘ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ’ पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

एप्रिल–मे १९७५

वैशाख–जेष्ठ शके १८९६

संपादक : डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर

कार्यकारी संपादक : वसंत खेरडीकर

श्रेष्ठ ज्ञानोपासक श्री. ना. बनहट्टी

(संपादकीय)



श्रीनिवास नारायण बनहट्टी यांचा जन्म ६ मार्च १९०१ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील, महाराष्ट्रातील जुन्या पिढीतील एक श्रेष्ठ संस्कृत पंडित, व्याकरण तज्ज्ञ व निबंध-कार, नारायण दासो बनहट्टी हे तत्कालीन मुंबई सरकारच्या विद्याखात्यात नोकरीस होते व वरील सुमारास ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजात संस्कृताचे सहायक प्राध्यापक आणि संस्कृत हस्तलिखित विभागाचे मुख्य होते. प्रा. बनहट्टींचे शालेय शिक्षण पुणे; नाशिक, मुंबई व जळगाव येथे झाले. जून १९१४ मध्ये जळगावास नव्यानेच सुरू झालेल्या शासकीय गोवर्धनदास सुंदरदास हायस्कूलचे पहिले हेडमास्तर म्हणून नारायण दासो यांची नेमणूक झाली. या हायस्कूलमध्ये १९१४ ते १९१७ ही तीन वर्षे प्रा. बनहट्टी हे विद्यार्थी होते व तेथूनच १९१७ मध्ये ते उत्कृष्ट रीतीने मॅट्रिकची परीक्षा पास झाले. जळगावास असताना त्यांच्या आयुष्यात एक महत्त्वाची घटना घडली, तिचे वर्णन त्यांनी स्वतःच पुढीलप्रमाणे केले आहे—

निबंधमालेचा प्रभाव

“ पुढे आम्ही दीक्षित मास्तरांच्या घरी उतरलो व सुमारे ८–१० दिवस त्यांच्या येथेच राहिलो. वडील नवीन हायस्कुलाच्या उभारणीच्या कामात व्यग्र व आई लहान भावाच्या जोपासनेत मग्न. मीच काय तो रिकामा टोळभैरव होतो. परंतु खेळण्या-उनाडण्याचा नाद लहानपणापासूनच कमी, त्यात नवख्या गावी ओळखीचे कोणीच नव्हते. तेव्हा माझी चांगलीच कुचंबणा होण्याचा योग; परंतु सुदैवाने दीक्षितांच्या घरी दोन जाडी पुस्तके माझ्या हाती पडली. त्यांच्या योगाने माझी कुचंबणा तर टळलीच, खेरीज माझ्या मनावर काही एक विलक्षण प्रकाश पडला व माझ्या

मनाने माझे भविष्य निश्चित करून टाकले. त्या पुस्तकांच्या वाचनाने माझे 'मीपण' मला गवसले; किंबहुना माझे संकुचित 'मीपण' एका महान् 'मीपणा'त विलीन झाले. ती दोन पुस्तके म्हणजे निबंधमालेच्या जुन्या आवृत्तीचे दोन खंड होते." (गोवर्धनदास सुंदरदास हायस्कूल, जळगाव, रौप्यमहोत्सव स्मृतिअंक, १९३९ यातील बनहट्टींच्या लेखातून.)

शिक्षण, विवाह व व्यवसायनिश्चिती

त्यानंतर १९२३ साली पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून संस्कृत व मराठी हे विषय घेऊन प्रा. बनहट्टी हे एम्. ए. ची परीक्षा सन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले. संपूर्ण मुंबई विद्यापीठात संस्कृतामध्ये पहिला येणाऱ्यास मिळणारी भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ती आणि वेदान्ताची स्वतंत्र प्रश्नपत्रिका संस्कृतामध्ये लिहिणाऱ्यांतून पहिला येणाऱ्यास मिळणारे त्या काळचे सुप्रसिद्ध "सुज्ञ गोकुळजी झाला वेदान्त पारितोषिक" हे त्यांनी मिळविले.

१९२२ साली त्यांचा विवाह साताऱ्याच्या सुप्रसिद्ध गजेन्द्रगडकर घराण्यातील सर्वात धाकटी कन्या उषा हिच्याशी झाला. पुढे भारताचे सरन्यायाधीश झालेले डॉ. प्र. बा. गजेन्द्रगडकर यांची ही धाकटी बहीण होय. उषाबाईंनी 'पद्मावती' हे नवे नाव घेऊन बनहट्टींच्या घरात प्रवेश केला व तेव्हापासून 'श्रीनिवास-पद्मावती' यांच्या संसाराची जोडयात्रा सुरू झाली.

१९२५ साली ते एल्एल्. बी. झाले व वकिलीची सनद काढणार होते, पण त्याच सुमारास मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजात मराठीच्या व्याख्यात्याची एक अस्थायी जागा झाली. ती त्यांना मिळाली. त्यानंतर शिक्षक किंवा प्राध्यापक हाच जीवनाचा व्यवसाय म्हणून त्यांनी पत्करला. १९२५ ते १९२७ ते एलफिन्स्टन कॉलेजात होते. १९२७ मध्ये नागपूरच्या तत्कालीन मॉरिस कॉलेजमध्ये मराठीचे पहिले प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली व २६ सप्टेंबर १९२७ रोजी ते या पदावर रुजू झाले.

व्यासंग व अध्ययन

प्रा. बनहट्टींनी संस्कृत व मराठी साहित्याच्या सखोल अभ्यासाला आपल्या वडिलांच्यापाशीच प्रारंभ केला होता, हे उघड आहे. विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा स्वभाव अत्यंत शिस्तप्रिय व प्रकृती चिंतनशील आणि गंभीर होती. निबंधमालेने त्यांच्या मनावर जो परिणाम केला त्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. डॉ. मा. गो. देशमुख त्यांच्या व्यासंगाविषयी म्हणतात, "चिपळूणकरांनी वाङ्मयसेवेचे व्रत जसे आपल्या वडिलांपासून घेतले, त्याचप्रमाणे बनहट्टींनाही संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र यांचे प्रारंभिक पाठ पितृपरंपरेनेच प्राप्त झाले. थोरल्या शास्त्रीबुवांच्या पांडित्याचा प्रकर्ष आणि रसिकतेचा स्पर्श जसा विष्णुशास्त्र्यांना लाभला, त्याचप्रमाणे कै. नारायण दासो यांच्या विद्वत्तेचा वारसा आणि अभ्यासाचे अनुशासन प्रा. बनहट्टींकडे चालत आले. 'रासेलस' या तत्त्वचिंतनात्मक कादंबरीचे भाषांतर करण्याच्या कामात चिपळूणकरांनी वडिलांना विद्यार्थिदशेतच साहाय्य करून वाङ्मयसेवेचा पहिला आनंद लुटला, तद्वत् प्रा. बनहट्टी यांनीही आपल्या तीर्थरूपांनी संपादन केलेल्या उद्भटाच्या 'काव्यालंकार-सार-संग्रहाची' इंग्रजी प्रस्तावना व टीपा यांसह छापलेली आवृत्ती तयार करण्यास हातभार लावून आपल्या साहित्यशास्त्रीय अभ्यासाची पायाभरणी केली." ('वाङ्मयीन व्यक्ती' या संग्रहातील "'वाङ्मयविमर्श'कार प्रा. बनहट्टी" या लेखातून.)

वाङ्मयनिर्मितीस प्रारंभ

प्रा. बनहट्टींचे प्रारंभीचे अभ्यासविषय टिळक, चिपळूणकर व मोरोपंत हे झाले, यात नवल नाही. उपलब्ध माहितीनुसार प्रा. बनहट्टी यांचा पहिला प्रकाशित प्रदीर्घ निबंध "लो. टिळकांची धर्मविषयक मते" हा असून तो १९२५ साली केसरी संस्थेने प्रकाशित केलेल्या "लोकमान्यांची धर्मबुद्धी व धर्मविषयक मते" या संग्रहग्रंथातून प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर "रत्नाकर" मासिकाच्या मार्च, एप्रिल, मे, जुलै व ऑगस्ट १९२५ या अंकात "विष्णुशास्त्री चिपळूणकर व त्यांचे आधुनिक आक्षेपक" ही विस्तृत लेखमाला त्यांनी लिहिली, ती त्या काळी फार गाजली. पुढे त्यांचे बालमित्र व वर्गबंधु श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या चिपळूणकरविषयक प्रबंधासह ती "विष्णु कृष्ण चिपळूणकर – द्विविध दर्शन" या पुस्तकाच्या रूपाने १९३४ साली प्रसिद्ध झाली. अव्वल इंग्रजीत मोरोपंतांच्या कवितेवर 'ही कविताच नाही' येथपासून जे अनेकानेक आक्षेप मोठमोठ्या विद्वानांकडून घेतले

जात होते, त्यांचा निरास करून, पंतकाव्याचे लोकोत्तर श्रेष्ठत्व विष्णुशास्त्र्यांनी आपल्या "मोरोपंताची कविता" या प्रदीर्घ निबंधाने प्रथमतः सुप्रतिष्ठित केले. त्या निबंधाच्या वाचनाने अनेक नवसुशिक्षित मोरोपंताच्या कवितेकडे आकर्षित झाले. परिणामतः प्रा. बनहट्टी यांचा 'मयूरकाव्यविवेचन' हा पहिला ग्रंथ १९२६ साली प्रसिद्ध झाला. त्याला साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांनी प्रस्तावना लिहिली असून तीत "प्रस्तुत ग्रंथ वाचीत असता चिकित्सकतेपेक्षाही माझे मन कौतुकानेच अधिक भरून गेले होते, हे स्पष्ट नमूद करण्यास मला आनंद वाटतो. कारण इतक्या ताज्या पदवीधराने इतका विद्वत्तापूर्ण व विवेचक ग्रंथ लिहिलेला माझ्या पाहण्यात नाही." असे उद्गार त्यांनी काढले आहेत.

अनेक उद्योग उभारले

इ. स. १९२७ साली नागपूरला येऊन स्थायिक झाल्यावर, प्रा. बनहट्टींची साहित्यसेवा आणि साहित्य-समाजकार्यविषयक अन्य उद्योग जोमाने सुरू झाले व भरभराटीस येऊ लागले. त्याकाळच्या सुप्रसिद्ध 'रत्नाकर', 'मासिक मनोरंजन'; नंतर 'लोकशिक्षण', 'प्रतिभा' या प्रमुख मासिक-पाक्षिकांतून साहित्य व समाज-जीवनविषयक अनेक मार्मिक लेख त्यांनी लिहिले. २९ नोव्हेंबर १९३५ च्या 'प्रतिभे'त प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'महाराष्ट्राचे केन्द्र' या लेखामुळे पुढे खूपच वाद उद्भवला व अनेक महनीय व्यक्तींनी त्यात भाग घेतला. शेवटी १५ ऑक्टोबर १९३६ च्या 'प्रतिभे'च्या अंकात 'केन्द्रवादाचा समारोप' हा लेख लिहून प्रा. बनहट्टींनी या वादाचा शेवट केला. महाराष्ट्रातील गाजलेल्या व नमुनेदार वादांपैकी एक, म्हणून हा 'केन्द्रवाद' ओळखला जातो.

प्रकाशन कार्य

प्रत्यक्ष साहित्य निर्मिती करून साहित्याची सेवा तर करावीच; पण साहित्यविषयक संघटनात्मक कार्यातून समाजसेवाही करावी याची स्फूर्ती प्रा. बनहट्टींना ऐन तारुण्यातच मिळाली होती. इंग्रजीतील Home Unversity Library च्या धर्तीवर, मराठीत गंभीर व शास्त्रीय विषयांवर आटोपशीर पुस्तके प्रसिद्ध करण्याच्या हेतूने इ. स. १९३१ साली त्यांनी 'नवभारत ग्रंथमाला' स्थापन केली. लवकरच या मालेच्या जोडीला एक मुद्रणालयही स्थापन करून, प्रकाशन कार्याला अधिक व्यापक आणि स्थायी स्वरूप देण्यासाठी १९३४ साली 'सुविचार प्रकाशन मंडळ' या प्रकाशनसंस्थेची त्यांनी स्थापना केली. आजही ही प्रकाशनसंस्था नागपूर व पुणे या दोन्ही ठिकाणी उत्कृष्ट कार्य करीत आहे. अशा प्रकारे त्यांनी विदर्भातील वाङ्मयीन प्रकाशन व्यवसायाची एका तऱ्हेने पायाभरणीच केली. विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की प्रा. बनहट्टींच्या मनावर चिपळूणकरांच्या वाङ्मयाचा व कर्तृत्वाचा जोरकस प्रभाव प्रारंभी जरी पडला होता, तरी पुढे त्यांचे मन अधिक परिणत होत गेले व एका व्यापक आणि समावेशक ध्येयवादाचे अधिष्ठान त्यांनी आपल्या सर्व उद्योगांना प्राप्त करून दिले. ' निबंधमालेने प्रभावित केलेल्या अवस्थेतून माझे मन पुढे पुष्कळच वाढले व सार-असार पारखण्याचा विवेक करू लागले. याची खूण हीच की, पुढे चिपळूणकरांइतकाच रानड्यांचाही मी भक्त बनलो व चिपळूणकरांनी ज्यांच्यावर हेटाळणीची कडक टीका केली होती, त्या ज्योतिबा फुल्यांच्या भूमिकेतील हितकारक तत्त्व ग्रहण करू शकलो......... चिपळूणकर आणि फुले किंवा टिळक आणि आगरकर या परस्परविरुद्ध जोड्यांच्या भूमिकांमधील तथ्यांश मी ग्रहण करू शकलो......' ('वृत्ति, कृति आणि अनुभूति' -युगवाणी, मार्च १९४६). '.........त्या वयात माले-वर जी भक्ति जडली तिच्यावर पुढे विवेचक बुद्धीचे संस्कार घडले. सामाजिक समतेच्या तत्त्वाचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले आणि चिपळूणकर यांच्यामध्ये जे द्वंद्व निर्माण झाले त्यासंबंधीचा यथायोग्य बोध झाला आणि चिपळूणकरांच्या मर्यादा कळू लागल्या.' असे त्यांनी अगदी अलीकडे म्हटले आहे (विष्णुपदी खंड ३, प्रस्तावना; २५ मे १९७४). या त्यांच्या मनाच्या व्यापकतेची व्यवहारातील खूण म्हणजे 'नवभारत ग्रंथ-माले'त प्रसिद्ध झालेले ग्रंथ. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचा 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' आणि आचार्य धर्मानंद कोसंबी यांचा 'भगवान बुद्ध' हे दोन ग्रंथ त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक मिळवून प्रसिद्ध केले, ते मराठी वाङ्मयात चिरस्थायी झाले आहेत. याशिवाय डॉ. शं. दा. पेंडसे यांचा 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', म. म. वा. वि. मिराशी यांचा 'कालिदास' (प्रथमावृत्ती), डॉ. अ. स. अळतेकर यांचा 'प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती', प्रो. श्री. व्यं. पुणतांबेकर यांचा

'नागरिकनीती', डॉ. श्री. व्यं. केतकर यांचा 'भारतीय समाजशास्त्र' असे दिगंतकीर्ति विद्वानांचे अनेक ग्रंथ 'नवभारत ग्रंथमाले'ने प्रसिद्ध केले.

संस्थाचालन व संपादन कार्य

याशिवाय संस्थाचालनाचे जे कार्य प्रा. बनहट्टींनी केले तेही फार मूल्यवान आहे. १९३१ नंतर म. गांधी व गांधीवाद यांच्याकडे त्यांच्या मनाची ओढ जाऊ लागली. म. गांधींच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'भारतीय साहित्य परिषदे'ची महाराष्ट्र शाखा नागपुरात इ. स. १९३३ च्या सुमारास स्थापन करून तिच्यातर्फे १९३४ ते १९३८ पर्यंत 'विहंगम' हे मासिक त्यांनी चालविले. त्याच्यातून नावाने, निनावी असे किती तरी लेखन त्यांनी केले. आता अस्तंगत झालेल्या पण अत्यंत दर्जेदार अशा मराठी मासिकात 'विहंगमा'चे नाव अद्यापही घेतले जाते.

रंगभूमीविषयक उपक्रम

'नाट्य व रंगभूमी' या विषयाची प्रा. बनहट्टींना मुळातच विशेष आवड व हौस होती. दुर्दशेला गेलेल्या मराठी रंगभूमीच्या उद्धारासाठी त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. कलादृष्ट्या उत्कृष्ट अशा नाट्यप्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी १९३५ च्या सुमारास नागपुरात 'अभिनव नाट्यमंदिर' या संस्थेची स्थापना करून तिच्यामार्फत स्त्रियांची कामे स्त्रियांनीच केलेले असे नाट्यप्रयोग प्रथमतःच नागपुरात घडवून आणले. 'महाराष्ट्र नाट्यसंमेलन' या मध्यवर्ती संस्थेचे ते १९४० ते १९५० पर्यंत कार्याध्यक्ष होते. मराठी रंगभूमीचा १९४३ साली झालेला शतसांवत्सरिक उत्सव अखिल महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही साजरा व्हावा या कल्पनेचे जनक व प्रमुख प्रचारक प्रा. बनहट्टी हेच होते. त्यासाठी १९४२ साली जे 'मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव मंडळ' स्थापन झाले, त्याचे ते, १९५३ साली ते मंडळ विसर्जित होईपर्यंत कार्याध्यक्ष होते. या मंडळाच्या अधिपत्याखालीच १९४३ साली सर्व महाराष्ट्रभर रंगभूमी शतसांवत्सरिक महोत्सव साजरा झाला. इंदूर येथे झालेल्या या महोत्सवाचे अध्यक्षपद प्रा. बनहट्टींना देण्यात आले होते.

उत्कृष्ट प्राध्यापक

नागपुरात अशा अनेकविध कार्यात गुंतले असतानाच त्यांचे अध्यापनाचे कार्य सुरूच होते. सूक्ष्म दृष्टीचे व विवेचक बुद्धीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी फार कीर्ती मिळविली. मराठीचे अनेक पंडित त्यांच्या हाताखाली शिकून तयार झाले. पीएच्. डी. पदवीसाठी मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी अनेक नवीन विद्वानांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. गो. मो. रानडे, डॉ. दा. ल. अडोणी ही त्यांच्या शिष्यमालिकेतील काही चमकदार रत्ने होत.

राजसेवेची शृंखला तोडली !

आपल्या प्रतिभाबलावर व कार्यशक्तीवर प्रा. बनहट्टी नागपुरात असे अनेक नवे उपक्रम हाती घेत असता, अकस्मात त्यांची बदली १९४४ साली अमरावतीस झाली. नागपुरास त्यांनी उभारलेला कार्याचा पसारा विसकटणार होता. प्रारंभापासूनच त्यांचे मन सरकारी नोकरीत रमत नव्हते. अमरावतीस सुमारे एक वर्ष काढून १९४५ साली, मुदत पूर्ण होण्याच्या आधीच त्यांनी अठरा वर्षांच्या सुखाच्या सरकारी नोकरीतून नाममात्र निवृत्तीवेतनावर निवृत्ती पत्करली. त्यावेळी त्यांची अजून ११ वर्षे नोकरी व्हावयाची होती. पण 'सर्वांस स्पर्धाभूत वाटणारी राजसेवेची शृंखला' तोडून टाकण्यात त्यांनी एकप्रकारे मालाकारांचेच अनुकरण केले !

वि. सा. संघाचे पुनरुज्जीवन

अमरावतीच्या छोट्याशाच मुक्कामात त्यांनी एक महनीय कार्य केले, ते म्हणजे त्यावेळी निद्रिस्त अवस्थेत असलेल्या विदर्भ साहित्य संघाचे पुनरुज्जीवन. अथक परिश्रम करून त्यांनी वि. सा. संघाला पुनः चैतन्य प्राप्त करून दिले व त्याचे आठवे संमेलन अकोट येथे डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली १९४४ साली भरविले. त्यानंतर नववे विदर्भ साहित्य सम्मेलन २३ डिसेंबर १९४५ रोजी दर्यापूर येथे भरले, त्याचे अध्यक्ष प्रा. बनहट्टी हेच होते. या अध्यक्षपदावरून त्यांनी दिलेले भाषण साहित्य विवेचनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे गणले जाते. वि. सा. संघाचे मुखपत्र असावे व वि. सा. संघातर्फे मराठी भाषेच्या परीक्षा घेण्यात याव्या या कल्पना काढून त्यांनीच त्या प्रथमतः मूर्तरूपात आणल्या.

प्रा. बनहट्टींनी १४-१-१९४८ पासून तो १३-५-१९५१ पर्यंत 'समाधान' हे साप्ताहिक नागपुरात चालविले. त्यांनी स्वतः तर या साप्ताहिकात विपुल व अनेकविध लेखन केलेच, पण विदर्भातील अनेक

अनुक्रमणिका

नवोदित तरुण लेखक-कवींना प्रसिद्धी देऊन पुढे आणले. १९४९-५० या वर्षी केन्द्र सरकारने नेमलेल्या भारतीय राज्य घटनेच्या मराठी भाषांतर समितीचे व भारतीय परिभाषा समितीचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. १९५१-५२ या वर्षी संसदेचे अध्यक्ष स्वर्गीय ग. वा. मावळणकर यांनी निर्मिलेले 'परिभाषा अधिकारी' हे पद त्यांनी भूषित केले.

पुण्याला स्थलांतर व तेथील कार्य

१९५३ साली आकाशवाणीवर मराठी कार्यक्रमाचे संयोजक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यांचे मुख्य कार्यालय पुणे येथे ठेवण्यात आले, त्यामुळे त्यांचे पुण्याला स्थलांतर झाले. तथापि त्यांनी नंतर नागपुरातही स्वतःसाठी कायमची वास्तु उभारली आणि त्यांच्या सुविचार प्रकाशन मंडळानेही नागपुरात आपले कायम भवन बांधले.

पुण्याला १९५३ ते १९५५ ते आकाशवाणीवर काम करीत होते. तेथून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी पुण्याला आपल्या प्रकाशन संस्थेचे कार्य सुरू केले. तथापि १९६१ साली वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ते सर्व व्यावहारिक जबाबदारीतून निवृत्त झाले व त्यांनी प्रकाशनसंस्थेची धुरा, त्यात पूर्वीपासून काम करणारे आपले चिरंजीव श्यामकान्त आणि राजेन्द्र यांच्यावर सोपविली. आयुष्याची शेवटची १४ वर्षे अध्ययन, संशोधन, लेखन व सार्वजनिक कार्य यातच त्यांनी व्यतीत केली. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे १९६४ ते १९६७ व १९६७ ते १९७० असे सहा वर्षे ते लागोपाठ अध्यक्ष होते. या काळात पुण्याला आपल्या 'पद्मश्री' या निवासस्थानात राहून त्यांनी विपुल ग्रंथनिर्मिती केली. त्यांच्या सर्व प्रकाशित ग्रंथांची यादी शेवटी दिली आहे. याशिवाय अद्याप संग्रहरूपाने प्रकाशित न झालेले असे त्यांचे कितीतरी मौलिक साहित्य नियतकालिकांतून विखुरलेले आहे.

'ज्ञानदेवी' संशोधन

त्यांच्या 'नाट्याचार्य देवल' या ग्रंथाला १९७० साली साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले. भांडारकर प्राच्य संशोधन संस्थेने जशी महाभारताची संशोधित पाठशुद्ध प्रत प्रसिद्ध केली, तशी 'ज्ञानदेवी'ची पाठशुद्ध संहिता, अनेक मूळ हस्तलिखित पोथ्या व मुद्रित प्रती यांच्या पाठांचे तोलन करून प्रसिद्ध करावी असा ध्यास त्यांना १९६६ पासून लागला होता. त्यासाठी १९६७ साली त्यांनी 'ज्ञानोपासना निकेतन' ही संस्था पुण्याला स्थापन केली व जवळ जवळ एकट्याच्या हिंमतीवर कार्यास प्रारंभ केला. वयाची सत्तरी गाठली असतानाही काशीपासून तो तंजावरपर्यंत अनेकवार प्रवास करून कितीतरी हस्तलिखिते जमविली व ज्ञानदेवी अध्याय १, ७ व १२ यांच्या पाठशुद्ध संहिता प्रसिद्ध केल्या. या संहिता ग्रंथांना त्यांनी लिहिलेले विस्तृत उपोद्घात म्हणजे पाठसंशोधनविद्येवर मूलगामी प्रकाश टाकणारे दीपस्तंभच होत. किंबहुना मराठीत पाठसंशोधन विद्येचे अत्यंत उपेक्षित असे दालन प्रा. बनहट्टींच्याच प्रयत्नाने प्रतिष्ठित झाले असे म्हटले पाहिजे.

'विष्णुपदी'चे संपादन

गतवर्षी १९७४ साली 'निबंधमाले'च्या जन्मशताब्दीनिमित्त प्रा. बनहट्टींनी स्वतः अक्षरशः तनमनधनाने झटून चिपळूणकरांचे 'शाळापत्रक', 'निबंधमाला' व 'केसरी' या तिन्हीतील निवडक लेखन मुळाबरहुकूम संपादित करून एकंदर ९०० डेमी पृष्ठांच्या तीन खंडातून (विष्णुपदी खंड १, २ व ३) प्रकाशित केले. अत्यंत महर्गतेच्या दिवसात, कोणत्याही मदतीची अपेक्षा न ठेवता आणि फारशा खपाची आशा नसताना ध्येयवेडाच्या पोटी सुविचार प्रकाशन मंडळाने हा उपक्रम केला. 'विष्णुपदी'च्या तिसऱ्या खंडाला १५६ पृष्ठांचा जो विस्तृत उपोद्घात त्यांनी लिहिला, त्यात विष्णुशास्त्र्यांच्या जीवनकार्याविषयी त्यांचे परिणतावस्थेतील विचार ग्रथित झाले आहेत. विष्णुपदीच्या कामातून मोकळे होताच 'टिळक आणि आगरकर' या आपल्या पूर्वीच्या ग्रंथाची पूर्णपणे सुधारलेली व कितीतरी नवीन मजकुराने नटलेली आवृत्ती तयार करण्याच्या कार्यास ते लागले. 'ज्ञानोपासना निकेतना'तील अभ्यासिका सौ. पुष्पाताई पुसाळकर या सुविद्य तरुण भगिनी त्यांच्या लेखिका व निजी सचिव होत्या. एकाद्या पितृभक्त कन्येप्रमाणे शेवटच्या काही वर्षात त्यांनी प्रा. बनहट्टींच्या वाङ्मयीन संसाराची जपणूक केली हे नमूद करण्यासारखे आहे.

अखेर!

६ डिसेंबर १९७१ रोजी त्यांच्या पत्नी सौ. पद्मावती यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांना मोठाच मानसिक धक्का बसला. पुढे मे १९७४ पासून प्रा. बनहट्टींची प्रकृती जास्तच खालावू लागली. पण त्यांच्या पोटदुखीच्या कारणाचे योग्य निदान लवकर झाले नाही. पुण्यासारख्या स्वास्थ्यदायक शहरातील सर्व उपचारपद्धतींचे पहिल्या दर्जाचे नामांकित भिषग्वर्य त्यांना येऊन तपासून गेले. तरीही नक्की निदान होईना. आजारामध्येही 'टिळक आगरकर' ग्रंथातील मजकूर लेखिकेला सांगण्याचे त्यांचे काम चालूच होते. त्यांनी आपल्या वाङ्मयीन जीवनाला प्रारंभ लो. टिळकांवरील निबंधाने केला, हे पूर्वी सांगितलेच आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या ऐहिक जीवनाची अखेरही लो. टिळक विषयक मजकूर सांगण्याच्या कार्यात असतानाच झाली. मृत्यूपूर्वी काही दिवस त्यांना पोटातील कॅन्सर असावा असे निदान करण्यात आले. १० एप्रिल १९७५ हा ज्ञानकोशकार डॉ. केतकरांचा स्मृतिदिन! त्याच दिवशी, 'ज्ञानकोशकार डॉ. केतकर मार्ग'वर राहणारे प्रा. बनहट्टी यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली, पण तिचा विशेष उपयोग झाला नाही. अखेर, ज्या जिद्दीने त्यांनी आयुष्यभर अनेक उद्योग उभारले त्याच जिद्दीने त्यांनी शेवटचे बारा दिवस मृत्यूशी प्राणपणाने झुंज देऊन, २२ एप्रिल १९७५ रोजी सकाळी ११-३० वाजता इहलोकीची यात्रा संपविली!

□ □ □

श्रीनिवास नारायण बनहट्टी यांची ग्रंथसंपदा

ग्रंथ

मयूरकाव्यविवेचन (१९२६)
विष्णु कृष्ण चिपळूणकर,
द्विविध दर्शन-उत्तरार्ध (१९३४)
ज्ञानोपासना आणि भारतीयांचे कर्तव्य,
द्वितीयावृत्ती (१९४०)
टिळक आणि आगरकर, तृतीयावृत्ती (१९६१)
मराठी रंगभूमीचा इतिहास, खंड १ ला (१९५७)
नाट्याचार्य देवल (१९६७)

लेखसंग्रह

एकावळी, द्वितीयावृत्ती (१९५१)
नाट्य आणि रंगभूमि (१९५५)
वाङ्मयविमर्श (१९५५)
आदरांजलि (१९५६)
आकाशलहरी (१९६१)
चिंतन आणि चर्चा (१९६३)

भाषणसंग्रह

मराठी नाट्यकला व नाट्यवाङ्मय
(केळकर व्याख्यानमाला, पुणे, १९५९)
ज्ञानेश्वरी-रहस्य
(कौशिक व्याख्यानमाला, पुणे, १९७१)

प्रवासवर्णन

जोडयात्रा खण्ड पहिला (१९७३)
जोडयात्रा खण्ड दुसरा (१९७४)

संपादन

मोरोपंतकृत श्लोककेकावलि
" आर्याकेकावलि
" कृष्णविजय
रघुनाथपंडितकृत नलदमयंती स्वयंवराख्यान
आज्ञापत्र
विष्णुपदी (निवडक चिपळूणकर)
(खण्ड १, २ व ३; विस्तृत उपोद्घातासह, १९७४)
ज्ञानेश्वरी अध्याय पहिला
ज्ञानेश्वरी अध्याय दुसरा
ज्ञानेश्वरी अध्याय तिसरा
ज्ञानेश्वरी अध्याय पाचवा
ज्ञानेश्वरी अध्याय सातवा
(प्रतिशुद्ध संहिता)
ज्ञानदेवी संकलित पाठसंचासह प्रतिशुद्ध संहिता
अध्याय बारावा (१९६७), अध्याय पहिला आणि सातवा (१९७३)

● ● ●

'रुक्मिणी स्वयंवरा'च्या निमित्ताने

वि. भि. कोलते

'युगवाणी'–१९७४ च्या दिवाळी अंकात प्रा. भा. श्री. परांजपे यांनी 'प्रा. डोळके–संपादित रुक्मिणी स्वयंवर : काही विचार' या मथळ्याखाली एक लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी माझ्यावर काही हेत्वारोप केलेले आहेत. प्रा. डोळके यांनी संपादन केलेल्या प्रतीची वैशिष्टये दाखविताना मी संपादन केलेल्या ८७९ ओव्यांच्या या अपूर्ण काव्याच्या प्रतीतील काही उणिवा व दोषही दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्या लेखात त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर देण्यासाठी हा लेख लिहीत आहे.

(१) प्रा. डोळके यांनी प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीचे 'पहिली छायाचित्रात्मक प्रत' हे वैशिष्टय आहे. आणि ते कुणीच अमान्य केलेले नाही. पण 'या छायाचित्रांमुळे यादवकालीन पोथीची अक्षरवटिका, लेखनपद्धती, शुद्ध-लेखन, व्याकरण यांसारख्या बऱ्याचशा बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास होण्यास मदत होणार आहे.' असे जेव्हा प्रा. परांजपे म्हणतात तेव्हा आश्चर्य वाटल्या- वाचून राहात नाही. डोळके प्रतीतील छायाचित्रे ज्या चारिमांडल्य पोथीतील पानांची आहेत ती पोथी शके १६७७ (इ. स. १७५५) मध्ये लिहिलेली आहे. तेव्हा या छायाचित्रांतील अक्षरवटिका, लेखनपद्धती इत्यादी शकाच्या १७ व्या शतकातील आहेत. त्यावरून यादव-कालीन म्हणजे १३ व्या शतकातील अक्षरवटिका, लेखनपद्धती इत्यादींचा अभ्यास कसा करता येणार? १७ व्या शतकातील हस्ताक्षरावरून त्यापूर्वी चारशे वर्षे अगोदरच्या काळातील हस्ताक्षर, त्यातील अक्षर-वटिका इत्यादिकांचा अभ्यास करण्याचे काही नवीन संशोधनतंत्र प्रा. परांजपे यांना उपलब्ध झाले असल्यास त्यांनी त्यावर प्रकाश टाकावा. एरवी डोळके यांच्या छायाचित्रित प्रतीला अवास्तव महत्त्व देण्याच्या उत्साहापायी ते जाणूनबुजून 'भ्रमजाल' निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे वाटले तर ते चुकीचे ठरू नये.

(२) 'यापूर्वी १९४० साली डॉ. कोलते यांनी रुक्मिणी–स्वयंवराची ८७९ ओव्यांची जी प्रत काढली होती ती परिष्करणाच्या जातीची आहे. व्याकरणशुद्ध व ग्राह्य पाठ शोधून एक शक्य तितकी निर्दोष पोथी तयार करणे हे कोलत्यांच्या प्रतीचे वैशिष्टय आहे' असे प्रा. परांजपे सांगतात. पहिली गोष्ट अशी की, मी संपादन केलेल्या प्रतीतील काव्याचे नाव 'रुक्मिणी–स्वयंवर' असे आहे, 'रुक्मिणी स्वयंवर' असे नाही. दुसरे असे की, मी 'पोथी' तयार केली नाही, तर जुन्या पोथ्यांच्या आधारे त्या काव्याची आवृत्ती तयार केली आहे. तिसरे असे की, ही 'निर्दोष पोथी' तयार करण्यासाठी मी परिष्करण केले आहे असे प्रा. परांजपे सुचवितात आणि एक नवीन 'भ्रमजाल' निर्माण करू पाहातात. मी या काव्याचे संपादन केले आहे ते ज्ञातृ-निष्ठ पद्धतीने. या पद्धतीत उपलब्ध हस्तलिखितांतील पाठांतरांतून कवीला अभिप्रेत असलेला मूळ पाठ शोधून द्यायचा असतो, मूलस्थापन करायचे असते. त्यात संपा-दकाने निवडलेला पाठ त्याने आधाराला घेतलेल्या कोणत्यातरी हस्तलिखितातीलच असतो. हे मूलस्थापन होय, परिष्करण नव्हे. परिष्करण म्हणजे उपलब्ध पाठ 'शुद्ध' करणे. त्यात बदल अभिप्रेत आहे. घर या अर्थाचा शब्द गृह; तो पोथीत किंवा पोथ्यांत 'ग्रह' असा लिहिलेला असेल तर तो शुद्ध करून 'गृह' असा स्वीकारणे, कदन्न हा संस्कृत शब्द पोथ्यांत 'कदन' असा असताना तो आपल्या संहितेत 'कदन्न' म्हणून देणे, हे परिष्करण झाले. मी संपादन केलेल्या 'रुक्मिणी–स्वयंवर' काव्याच्या संहितेत असे परिष्करण मी केलेले नाही. प्रा. परांजपे यांना मी तसे केले आहे, असे सुचवायचे असेल तर ते चूक आहे. मूलस्थापन निराळे आणि परिष्करण निराळे. मी मूलस्थापननाचा प्रयत्न केलेला आहे, परिष्करण नव्हे.

(३) डोळके प्रतीतील 'सुरुवातीच्या ८७९ ओव्यांचे संपादन करताना भिन्न पोथ्यांचे पाठभेदही दिलेले आहेत. त्यांनी जमविलेल्या या पोथ्यांपैकी 'ख' प्रत त्यातील समाप्तिलेखाप्रमाणे पाहता १५ ऑक्टोबर १६८२ ची असल्यामुळे डॉ. कोलते यांच्याजवळच्या

'म' पोथीतून ती १५ वर्षांनी जुनी ठरते. जास्तीत जास्त जुनी प्रत मिळविण्यात प्रा. डोळके यांनी मिळविलेले यश डॉ. कोलते यांच्या प्रतीची 'अपूर्णता' नाहीशी करणारे असल्यामुळे त्याही दृष्टीने त्यांचे संपादन बरेचसे उजवे ठरते' असे प्रा. परांजपे लिहितात.

इ. स. १९४० मध्ये या 'अपूर्ण' काव्याचे संपादन करताना मला मिळालेल्या पोथ्यांपैकी सर्वात जुनी म पोथी शके १६१८ ची म्हणजे इ. स. १६९६ ची होती हे बरोबर आहे. याच काव्याची संशोधित नवीन आवृत्ती मी इ. स. १९६६ मध्ये प्रसिद्ध केली. त्यावेळी नवीन उपलब्ध झालेल्या हस्तलिखितांच्या साह्याने मी या काव्याचे पुनःसंपादन केले. त्यावेळी मला उपलब्ध झालेल्या ग प्रतीचा लेखनकाल शके १५३८ (=इ. स. १६१६) आहे; तर घ प्रतीचा लेखनकाल शके १४५४(=इ. स. १५३२) आहे. या माझ्या आवृत्तीकडे प्रा. परांजपे यांचे लक्ष गेले आहे की नाही? की त्यांनी तिकडे जाणूनबुजून काणाडोळा केला आहे? उपलब्ध झालेल्या हस्तलिखितांच्या केवळ प्राचीनतेमुळे 'संपादना'चे उजवे-डावेपण ठरविता येते काय? प्रा. परांजपे यांचे तसे मत असावे असे दिसते. तसे असल्यास, मी माझ्या नवीन आवृत्तीसाठी स्वीकारलेल्या इ. स. १६१६ च्या ग प्रतीकडे व १५३२ च्या घ प्रतीकडे त्यांनी दुर्लक्ष का केले? 'स्नेहा'ने आंधळे झाल्यामुळे त्यांच्याकडून असे घडले की प्रा. डोळके यांचे संपादन उजवे ठरविण्यासाठी त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून त्यांनी हे 'भ्रमजाल' निर्माण केले?

प्रा. परांजपे यांच्या दृष्टीने प्रा. डोळके यांनी मिळविलेल्या जास्तीत जास्त जुन्या अशा ख प्रतीचा लेखनकाल निःसंदिग्ध आहे असे म्हणता येत नाही. या प्रतीचे वर्णन प्रा. डोळके यांनी आपल्या संपादणीच्या प्रस्तावनेतील ५२ व्या पानावर दिलेले आहे. त्यावरून दिसून येईल की, 'वरील उल्लेखात शकाचा निर्देश नाही' त्यात दिलेला संवत्सर, मास, तिथी, वार वगैरे 'कालांगे' शके १६०४ शी जुळतात. म्हणून तो शक त्यांनी ठरविला आहे. ती इतर कोणत्याच शकाशी जुळत नाहीत याची खात्री देता येईल काय? कदाचित हे बरोबरही असेल. पण शककालाच्या निश्चित निर्देशाच्या अभावी या प्रतीचा हा काळ निःसंदिग्ध नाही, हे मात्र खरे.

"जास्तीत जास्त जुनी प्रत मिळविण्यात प्रा. डोळके यांनी मिळविलेले यश डॉ. कोलते यांच्या प्रतीची 'अपूर्णता' नाहीसे करणारे"—यावर आता निराळे भाष्य करण्याची गरज नाही. या ग्रंथाच्या माझ्या दुसऱ्या आवृत्तीसाठी शके १४५४ (=इ. स. १५३२) ची पोथी मला मिळालेली असल्याचे लक्षात घेऊन आता त्या बाबतीत कोणाच्या प्रतीत 'अपूर्णता' संभवते हे अभ्यासकांनीच ठरवावे.

(४) प्रा. परांजपे लिहितात: 'प्रा. डोळके यांच्या संपादनकौशल्याचा आमच्या मते सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे ग्रंथाच्या शेवटी जोडलेला शब्दकोश होय.' तेव्हा 'प्रा. डोळके यांच्या संपादनकौशल्याच्या अनुषंगाने प्रा. परांजपे यांनी त्यांच्या शब्दकोशासंबंधी जे विवेचन केले आहे ते आता पाहू. प्रा. परांजपे म्हणतात की, 'प्रा. डोळके यांनी संपादिलेल्या ऋक्मिणी स्वयंवर या काव्यात निरनिराळे प्रसंग वर्णन करतांना किती तरी नवे शब्द आमच्यापुढे उभे राहतात. आमच्या म्हणण्याचा ज्यांना प्रत्यय घ्यायचा असेल त्यांनी उदाहरणादाखल पुढील काही शब्द डॉ. तुळपुळे यांच्या 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथाच्या ताज्या आवृत्तीत मिळत असल्यास पाहावे.' असा हवाला देऊन ते पुढे लिहितात. 'आट, आग्यारी, आनागळ, आडमोडे, कन्हेरी, भगवती, रणवट यांसारखे जवळजवळ २५—३० शब्द तुळपुळे—कोशात नाहीत.'

हे २५—३० शब्द निश्चित कोणते ते सर्व प्रा. परांजप्यांनी दिले असते तर बरे झाले असते. त्यांनी फक्त ७ शब्दांचाच प्रत्यक्ष उल्लेख केला आहे. आता पहिला प्रश्न असा की हे सर्व शब्द 'नवे' आहेत काय? प्रा. परांजपे यांना कदाचित ते नवे वाटत असतील. पण वस्तुस्थिती तशी नाही. यांतील अनेक शब्द जुने, म्हणजे अभ्यासकांना प्राचीन काव्यांतून पूर्वीच माहीत झालेले आहेत. उदा—

आट: 'ऐसी सैन्यासि केली वोहरी। थोर आट भवीनला तिये आवसरीं'(२११०)' तैसा दोहीं दळासि आट भवीनला। तिये वेळे' (२१६०). प्रा. डोळके संपादित ऋ.स्व. मध्ये या ओव्यांत हा आट शब्द आला आहे. 'आट भवणे' असा तेथे वाक्प्रचार आहे. नेमका याच अर्थाने हा शब्द उषाहरण, शिशुपालवध इत्यादी पूर्वप्रसिद्ध काव्यांत आला आहे. उदा.: 'ना गवे

रे ना गवे रणसुभटू । सैन्या भवंतुसे आटू' (उषाहरण. ६१७); 'गरगरां आटू भवंतु असे तैसा : दोही दळांचा' (शिशु. १०४२). 'मग तेयाही वरि आटु भविनला । आकाशाचा' (ज्ञाने ६-३१४); 'आटु भवतसे वीरवृत्ता : तया गजरासवें' (उद्धवगीता. ४६१). या उदाहरणांवरून हा शब्द नवा नाही हे दिसून येईल. टीपग्रंथाच्या आधारे मी या शब्दाचे अर्थ पीळ, वर्तुळाकार भ्रमण, भोवरा असे दिले आहेत. प्रा. डोळके यांनीही भोवरा हाच अर्थ दिला आहे. तथापी, व्युत्पत्तीच्या अनुरोधाने याचा पुनर्विचार व्हायला पाहिजे. आटणे = कमी होणे, नाश होणे. त्यावरून आट = नाश, विध्वंस. भवणे = होणे. हे लक्षात घेऊन या ओव्यांच्या अर्थाचा नव्याने विचार व्हावा, असे वाटते.

आडमोडे : डोळकेसंपादित न. रु. प्रतीत 'जैसा आगीयेलाचा सीरवा पडे : तैसी सावीखें येताति झडझडे : तेही चक्राक्षक केले आडमोडे : अर्जूना-वळभद्राचे' (१९९९) या ओवीत आला आहे. हा आडमोडे शब्द प्रा. परांजपे समजतात तसा नवा नाही. भास्कर भट्टाच्या शिशुपाळवध काव्यात हा शब्द पुढील ओवीत आला आहे. 'आंगिचेनि घुघूवाटें : वारा न मोडी तनकटें : आडमोडें करी खरांटे : महातरूचे' (४८६). याच शब्दाचे दुसरे रूप ज्ञानेश्वरीत आढळते. उदा. : 'एकें आडमोडीं केली । अजंगमाची खाल काढविली' (ज्ञाने. १३-२२७); 'व्रतातें आडमोडी । धर्माचे पाये उपडी' (ज्ञाने. १३-६९३). तेव्हा हाही शब्द नवीन नाही. प्रा. डोळके यांनी शब्दकोशात या शब्दाचा अर्थ 'भयभीत' असा दिला आहे. तो बरोबर आहे काय ? याचा विचार व्हावा. मोडून आडवे करणे, मोडून आडवे फेकून देणे, मोडतोड करणे हा त्याचा अर्थ असू शकेल काय याचाही प्रा. परांजपे यांनी विचार करावा.

कन्हेरी : डोळके प्रतीत हा शब्द ७४६ व २०४८ या ओव्यांत आलेला आहे. प्रा. परांजपे तो नवा मानतात. 'धावना पवनु : कन्हेरी वरुणू' (शिशु. ५०), 'कन्हेरी श्रीकरणी : फुलवडुवे हातिसाहानी' (शिशु. ३५५); 'काइ सवें हडप बारी वोनेबाटिकार कन्हेरी' 'जयाची कन्हेरी अवर्णोदकें : खेळवो सेवा नित्यकें' (सह्याद्रिवर्णन. ४४५, ४५१); 'तयासि कन्हेरीचें उलींग' (गोविंद्रप्रभुचरित्र. १६७) इत्यादी पूर्वप्रसिद्ध गद्यपद्य ग्रंथांत तो आला आहे. तेव्हा तोही 'नवा' नाही.

रणवट : डोळके प्रतीत 'माया रणवटु बाणला पाचीचा । वरि मुकटु मीरवे अनर्घाचा' (१५८२) या ओवीत आलेला 'रणवट' हा शब्द प्रा. परांजपे यांना नवीन वाटतो, तसा तो नाही. चोंभा कवीच्या उषाहरण काव्यातील पुढील ओव्यांत तो आलेला आहे. 'कां नेघसी हातीयेरु । कां न वंघसी रणवटू' 'मायां होता जो रणवटू । त्यावरी वाण लागला नीटू । तुटौनी पडीला भुमी । वीधुरला जटाजुटु' (उषाहरण. ६११,१३५७). शके १३२५ मध्ये नृसिंह कवीने लिहिलेल्या 'रुक्मिणी स्वयंवर' या काव्यातही तो आढळतो. उदा : 'पैल जयाचा झळफळीत मुगुटु । पाठिसीं सोभताए रणवटु । तो मच्छदेसीचा वैराटु । मैत्र भीमकाचा' (१६७९). 'प्रा. डोळके यांच्या संपादनकौशल्याचा सर्वात महत्त्वाचा भाग' म्हणून ज्याचा निर्देश प्रा. परांजपे करतात त्या 'शब्दकोशा'त 'रणवटु' शब्दाचा अर्थ 'समरांगणातील स्थान' असा देऊन त्यापुढे प्रश्नचिन्ह घातले आहे; म्हणजे तो अर्थ संदिग्ध आहे. मूळ ओवीतील 'माया रणवटु बाणला पाचीचा' या चरणाचा भावा[र्थ] जरी लक्षात घेतला असता तरी 'समरांगणातील स्थान' हा त्या शब्दाचा अर्थ चुकीचा आहे, हे सहज समज[ते] असते. अन्यत्र हा शब्द ज्या ओव्यांत आलेला आ[हे] त्यांवरून 'रणवट=युद्धाच्या वेळी डोक्याला बांधावया[चे] शिरस्त्राण, किंवा पाठीला बांधावयाचे चिलखत,' अ[सा] अर्थ दिसतो. संस्कृत 'रण+पट्ट' यावरून तो व्युत्पादि[त] येईल. 'पट्ट' या शब्दाचा एक अर्थ, आपटे यांच[्या] संस्कृत कोशात shield (= ढाल) असाही दिले[ला] आहे. त्यावरून ही अर्थलापनिका लक्षात येईल.

'आग्यारी' हा शब्द मात्र यादवकालीन वाङ्[मय]यात वाचल्याचे मला आठवत नाही. तो कदा[चित्] नवीन असेलही. 'आनागळ,' 'भगवती' हे शब्द डो[ळके] प्रतीच्या शब्दकोशातही नाहीत. त्यावरून काव्या[त] कोठे व कोणत्या अर्थाने आले आहेत हे पाहून त्य[ांच्या] नवेजुनेपणाचा विचार करता आला असता. प्रा. प[रांजपे] यांनी नवे म्हणून दिलेल्या ७ शब्दांपैकी ४ म[्हणजे] निम्म्याहून अधिक शब्द जुनेच आहेत, एवढे वाचकांच्या लक्षात आले तरी पुरे आहे. त्यावरून प[्रा. परांजपे] यांची विधाने कशी चुकीची व अतिशयोक्त हे कळेल. यादवकालीन वाङ्मयात न आढणारे हे शब्द, ही नवीन उपलब्धी समजायची की, त[्या] नरेंद्राचे अपूर्ण रुक्मिणी स्वयंवर काव्य, याद[व]

नंतर पुढे केव्हा तरी कोणीतरी संपूर्ण केले असण्याचा संभव आहे, असे अनुमान काढायचे, याचाही अभ्यासकांनी विचार करावा.

हे सात शब्द नवे आहेत की नाहीत याचा प्रत्यय घेण्यासाठी प्रा. परांजपे, डॉ तुळपुळे यांच्या 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथाच्या ताज्या आवृत्तीतील 'तुळपुळे कोश' पाहायला सांगतात. प्रथम एक गोष्ट त्यांच्या लक्ष्यात आणून द्यायला पाहिजे. ती अशी की, डॉ. तुळपुळे यांनी आपल्या ग्रंथाला यादवकालीन शब्दांचा 'कोश' जोडलेला नाही; ती केवळ 'शब्दसूची' आहे; आणि तीही त्यांनी आपल्या 'ग्रंथात उदाहरणादाखल वापरलेल्या' यादवकालातील शब्दांची. जे शब्द 'उदाहरणादाखल' त्यांनी वापरले नाहीत ते यादवकालीन असले तरी या सूचीत कसे आढळणार? 'सूची' आणि 'कोश' यातील हा फरक, निदान या ठिकाणी तरी परांजप्यांनी लक्ष्यात घेणे आवश्यक होते. असे असूनही प्रा. परांजपे यांनी सांगितल्याप्रमाणे, त्यांनी दिलेले ७ शब्द मी जेव्हा डॉ. तुळपुळे यांच्या सूचीत पाहू लागलो तेव्हा त्यांनी उल्लेखिलेला पहिलाच शब्द 'आट' हा मला तीत आढळला. या सूचीच्या ३६९ व्या पानावर तो आहे. त्याचे निर्वचन डॉ. तुळपुळे यांनी आपल्या ग्रंथाच्या पा. ९७, १६० व ३३३ पानावर केले आहे. ते परांजप्यांनी पाहावे व खात्री करून घ्यावी.

प्रो. परांजपे यांनी दिलेले 'जेवणखांण, जडाजोडी, पानीपाजणी, खानभात, परवाहिरी' हे नवे शब्दही ते अभ्यासकांना 'तुळपुळे कोशा'त पाहायला सांगतात. ते तेथे नाहीत यात आश्चर्य नाही, पण डोळके प्रतीतील ज्या शब्दकोशाची ते भलामण करतात त्यातही, केवळ 'पानीपाजणी' सोडून त्यांतील एकही शब्द नाही. परांजपे देतात त्याप्रमाणे 'पानीपाजणी' हा शब्दही बरोबर नाही. प्रा. डोळके यांनीं शब्दकोशात तो 'पानी-वाजनी' असा दिलेला आहे; आणि मूळ ओवीतही तो तसाच आहे. आपण जी उदाहरणे देतो तीही मूळ स्वरूपात उद्धृत करण्याची दक्षता परांजपे घेत नाहीत. याचे आणखी एक उदाहरण त्यापुढेच आहे. भास्कराच्या ग्रंथात 'काटीने काटी झडैल वाहिर-बाहिरी' असे वाक्य आहे, म्हणून ते सांगतात. त्याचे मूळ स्वरूप 'कांटिया कांटी झाडावी : वाहीरि-वाहिरी' (शिशु. ४९३) असे आहे. ग्रंथातील अवतरणे अपभ्रष्ट व व्याकरणदुष्ट स्वरूपात उद्धृत करून स्वतः चुकीची आणि अतिशयोक्त विधाने करणाऱ्या प्रा. परांजपे यांनी इतरांच्या ग्रंथातील उजवे-डावेपण ठरविण्याच्या खटाटोपात पडावे याचे आश्चर्य वाटते व खेदही होतो.

(५) यानंतर आपली वक्रदृष्टी प्रा. परांजपे यांनी कृष्णदास प्रतीचे संपादक, हैद्राबादचे श्रीकृष्णदास महानुभाव यांच्यावर व त्यांच्या आडून काही बाबतीत माझ्यावर पुन्हा वळवली आहे. श्रीकृष्णदास महानुभाव यांच्यावर ते घसरले आहेत याचे कारण 'ऋक्मिणी स्वयंवर' या काव्याची १९७० मध्ये त्यांनी प्रसिद्ध केलेली संहिता. आणि माझ्यावर ते घसरले आहेत याचे कारण, याच काव्याची मला दुसरी एक पोथी उपलब्ध झाल्यावर तिची माहिती देणारा मी लिहिलेला लेख. त्यात या काव्याच्या मुद्रित प्रतींचा वस्तुनिष्ठ दृष्टीने उल्लेख करतांना इ. स. १९७० मध्ये श्रीकृष्णदास यांनी हे काव्य प्रथम प्रकाशित केले आणि ते काव्य त्यांनी 'अभ्यासकांना उपलब्ध करून दिले याबद्दल ते धन्यवादात पात्र आहेत' असे मी म्हटले. श्रीकृष्णदास यांनी, महाराष्ट्रापासून दूर असलेल्या एका ठिकाणी राहून, हे काव्य, मूळ संहितेच्या स्वरूपात का होईना, पण १९७० मध्ये प्रसिद्ध केले ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्यावर कितीही आगपाखड केली तरी ती वस्तुस्थिती नाकारता येण्यासारखी नाही. हे काव्य श्रीकृष्णदास यांनी अभ्यासकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायचे नाही तर काय निषेध करायचा? प्रथम प्रसिद्धीच्या 'श्रेया'-साठी हपापून त्यांनी हे काव्य घाईघाईने प्रसिद्ध केले असे म्हणणे म्हणजे नुसता वितंडवाद घालणे होय. या श्रेयासाठी हपापलेल्यांची कदाचित त्यामुळे निराशा झाली असेल. तसेच, या काव्याची दुसरी पोथी उपलब्ध झाल्यामुळे आपल्या 'एकमेव प्रती'चा अभिमान बाळगणाऱ्यांना दुःख झाले असेल. एका काव्याच्या अनेक प्रती उपलब्ध झाल्या तर संशोधकांना आनंद वाटावा की दुःख?—हे जाणत्यांनी ठरवावे. ज्यांना अशा प्रकारचे दुःख झाले असेल त्यांना वास्तव संशोधनाचे महत्त्व वाटत नाही. ते केवळ आत्मप्रतिष्ठेच्या मागे धावत असतात, असे कुणी म्हटल्यास ते चूक ठरेल काय? या आत्मप्रतिष्ठांनी वास्तवाकडे काणाडोळा करून, डॉ. कोलते यांना 'हवे असलेले

प्रमेय' सिद्ध करण्यासाठी महानुभाव महंतांनी 'हव्या त्या पोथ्या मिळवून देण्याची तत्परता' आणि 'डॉ. कोलते यांच्या संशोधनासाठी वाटेल तितका खटाटोप करण्याचा उत्साह' दाखविला, अशी विधाने करून हेत्वारोप करावे व एक नवीन भ्रमजाल निर्माण करावे, यात अहंकारापोटी निर्माण झालेली त्यांच्या मनातील अनुदारताच दिसून येते.

श्रीकृष्णदास यांनी स्वतःच्या खिशाची पदरमोड करून हे काव्य प्रथम प्रकाशित केले, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. याचा निर्देश मी माझ्या लेखात दोन ठिकाणी, म्हणजे प्रा. परांजप्यांच्या मते 'वारंवार' केला, याबद्दल त्यांना वैषम्य वाटते. पण हा उल्लेख मीच पहिल्याप्रथम केला असे नाही. मी हा उल्लेख केला तो 'युगवाणी'च्या अंकात, म्हणजे प्रा. डोळके यांची प्रत प्रसिद्ध झाल्यानंतर जवळजवळ दोन वर्षांनी. पण माझ्याही पूर्वी एक वर्ष अगोदर, म्हणजे नोव्हेंबर १९७२ मध्ये 'महानुभाव' मासिकात 'नरेंद्रकवी आणि पर्शियन तेल' या आपल्या लेखात प्रा. बा. मा दाभाडे यांनी हा निर्देश केला होता. त्यांनी तेथे लिहिले होते की, "१९७० मध्ये 'ऋक्मिणी—स्वयंवर' हा ग्रंथ माझ्या वाचनात आला. मी वाचलेला ग्रंथ हा महानुभाव साहित्यातील साती ग्रंथात स्थान पावलेला ८७९ ओव्यांचा अपूर्ण 'रुक्मिणी स्वयंवर' ग्रंथ नव्हता. तो 'ऋक्मिणी स्वयंवर' ग्रंथ २९३८ ओव्यांचा संपूर्ण ग्रंथ होता. हा ग्रंथ श्रीकृष्णदास महानुभाव, गीता आश्रम, हैदराबाद, यांनी प्रकाशित केला आहे. नरेन्द्र कवीचा 'ऋक्मिणी स्वयंवर' हा ग्रंथ संपूर्ण स्वरूपात (२९३८ ओव्यांसह) छापून मराठी वाचकांच्या हाती देण्याचे सर्व प्रथम श्रेय या महानुभावाकडे आहे, हे मराठी वाचकांनी व साहित्यसंशोधकांनी टिपून ठेवावे."

प्रा. परांजप्यांना बहुधा हा उल्लेख माहीत नसावा. की माहीत असून देखील त्यांनी तिकडे सोयीस्करपणे काणाडोळा केला? 'प्रथम प्रसिद्धीचे श्रेय त्यांच्या (श्रीकृष्णदासांच्या) पदरात टाकू पाहण्याचा' हा प्रश्न नाही. ते त्यांचे श्रेय आहेच! आणि त्यांच्या प्रतीतील कितीही चुका प्रा. परांजपे यांनी दाखविल्या तरी त्यांना ते हिरावून घेता येणार नाही. मौज अशी की, कृष्णदास महानुभावांनी प्रसिद्ध केलेल्या या काव्याची मुद्रित प्रत, महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनाशी फारसा संबंध नसलेल्या प्रा. बा. मा दाभाडे यांना वाचायला मिळाली. पण याच काव्याच्या संशोधनाचा ध्यास घेतलेल्या प्रा. डोळक्यांचे तिकडे लक्षही जाऊ नये, किंवा या काव्याच्या आपल्या संपादणीतील प्रस्तावनेत त्याचा उल्लेखही त्यांनी करू नये हे आश्चर्यकारक आहे! अथवा, यात आश्चर्य ते कसले? कृष्णदास प्रतीच्या 'अनुल्लेखा'शिवाय 'अशा रीतीने गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या संशोधकांची भेट घेऊन आलेले हे हस्तलिखित या आवृत्तीच्या रूपाने पहिल्यांदाच रसिकांसमोर व अभ्यासकांसमोर ठेवण्याची संधी मला मिळत आहे हे मी माझे भाग्य समजतो' असे त्यांना कसे म्हणता आले असते? हे काव्य 'प्रसिद्ध करून अभ्यासकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल' मी श्रीकृष्णदासांचे केलेले 'अभिनंदन' (ते मी एकाच लेखात केले आहे.) म्हणजे त्यांच्या संहितासंपादनाबद्दल मी त्यांची केलेली 'प्रशंसा', असे प्रा. परांजपे समजतात आणि 'कृष्णदास' प्रतीच्या संपादनपद्धतीच्या दोषाकडे डॉ. कोलते कानाडोळा का करतात, हे कळत नाही' असे लिहितात. वस्तुस्थिती अशी आहे की, कृष्णदासांच्या, संहितासंपादनाबद्दल मी एकही शब्द काढलेला नाही. तो माझ्या लेखाचा विषय नव्हता. त्यामुळे प्रा. डोळके यांच्या संहितासंपादनाबद्दलही त्या लेखात काही लिहिण्याचे प्रयोजन नव्हते. आवश्यक तेवढी माहिती केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीने तेथें दिली आहे. 'संहितासंपादना'चे विवेचन हा त्या लेखाचा विषयच नसल्यामुळे श्रीकृष्णदासांच्या 'वाचनदुष्ट' प्रतीबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले असे म्हणणे म्हणजे जसे जाणूनबुजून आडरानात शिरणे होय, तसेच 'प्रत्येक पानाच्या छायाचित्रासह परिश्रमपूर्वक 'संपादन' केलेल्या डोळके प्रतीच्या वाट्याला हे 'धन्यवाद' येत नाहीत' असे म्हणणेही चूक होय. 'धन्यवाद' कशाबद्दल दिलेले आहेत हे न कळण्याइतपत प्रा. परांजपे भोळे आहेत असे मला वाटत नाही. पण, वेड पांघरून पेडगावला जाण्याचा वसाच त्यांनी घेतलेला दिसतो. त्यामुळेच श्रीकृष्णदासांच्या प्रतीचे प्रत्येक बाबतीत अवमूल्यन करून डोळके प्रतीचा झेंडा नाचवायला ते तयार झालेले आहेत. त्यांचे यासंबंधीचे विवेचन आता तपासून पाहू.

येथे एक गोष्ट आधीच स्पष्ट केली पाहिजे. कृष्णदास प्रतीतील उणीवांची आणि दोषांची मला पूर्ण कल्पना आहे. त्यांचे समर्थनही मला करायचे नाही.

पण ज्या भावनेने आणि हेतूने प्रा. परांजपे यांनी कृष्णदास प्रतीची अवहेलना करून डोळके प्रतीला उचलून धरले आहे त्या भावना व हेतु लक्षात घेऊनच मी हे विवेचन करण्याला प्रवृत्त झालो आहे. त्यांच्या भावना व हेतू यापूर्वीच स्पष्ट केल्या आहेत. त्यातूनच त्यांचे लेखन झाले असल्यामुळे त्याचा समाचार घेणे आवश्यक झाले आहे.

(६) प्रा. परांजपे यांचे म्हणणे असे आहे की संहितासंपादनाच्या बाबतीत कृष्णदास प्रतीने 'कोणतीही शिस्त पाळलेली नाही.' 'मूळ हस्तलिखित जसेचे तसे संपादन करण्याऐवजी १९४० च्या (अपूर्ण) कोलते प्रतीप्रमाणे परिष्करण करण्याची पद्धत त्यांनी या आवृत्तीत अवलंबिली आहे.' कोलते प्रतीत परिष्करण करण्याची पद्धत आहे, या परांजप्यांच्या आक्षेपातील अज्ञान यापूर्वीच दाखविले आहे. मुळात नसलेला कोणताही पाठ मी स्वीकारलेला नाही, आणि स्वीकारलेल्या पाठात 'परिष्करण' केलेले नाही, हे पुन्हा या ठिकाणी स्पष्ट करतो. कृष्णदास प्रतीने परिष्करण पद्धत स्वीकारलेली आहे हे दाखवण्यासाठी प्रा. परांजपे दोन उदाहरणे देतात. ती अशी :

(अ) डोळके प्रत (ओ. ५१८) जग वेढी वानीपेची
कोलते प्रत ( ) जग वेढी वालीपेची
कृष्णदासप्रत („) जग वेढी वालीपेची.

(आ) डोळके प्रत (ओ. ७५८) चांदिनेया खेव दीजत
कोलते प्रत चांदिणेया
कृष्णदास प्रत

ही उदाहरणे देऊन ते लिहितात, 'वरील उदाहरणांवरून कृष्णदास प्रत मूळ पारिमांडल्य पोथीऐवजी कोलते यांच्या १९४० च्या अपूर्ण प्रतीप्रमाणे परिष्करण करते हे स्पष्ट दिसते व त्यामुळेच मुळातील लेखनक्रिया समजून घेण्याच्या दृष्टीने कोलते यांच्या अपूर्ण पोथीप्रमाणे कृष्णदासांची 'संपूर्ण' पोथीही अनुपयुक्त ठरते.'

(अ) कोलते प्रतीत 'परिष्करण' नाही, हे पूर्वी स्पष्ट केलेच आहे. पण मूळ पाठ जसाचा तसा दिला काय किंवा परिष्करण करून दिला काय, त्या पाठावरून 'मुळातील (म्हणजे कुठली ?) लेखनक्रिया समजावून कशी घेता येणार ? 'लेखन-क्रिया' या शब्दाचा अर्थ प्रा. परांजप्यांच्या कोशात कोणता आहे ? याचा खुलासा त्यांनी केला असता तर बरे झाले असते !

(आ) पण त्यांनी दिलेल्या उदाहरणांतील व अभिप्रायातील मुख्य दोष असा, की कोलते प्रतीची डोळके व कृष्णदासप्रतींशी तुलना करणे हे मुळातच चूक आहे. कोलते प्रत ही काही पारिमांडल्य पोथीवरून सिद्ध झालेली नाही. ती त्यांना उपलब्ध झालेल्या इतर पोथ्यांवरून तयार केली गेली आहे. तेव्हा कोलते प्रतीने परिष्करण करून आपली संहिता सिद्ध केली आहे असा भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. कोलते यांच्या समोर ज्या पोथ्या होत्या त्या सर्वांत 'वालीपेची' हाच पाठ होता व तोच त्यांनी स्वीकारला आहे. डोळके यांनी पाठनोंदणीसाठी घेतलेल्या बहुतेक प्रतींत हाच पाठ आहे. (त्यांच्याजवळील क प्रतीत कोणता पाठ आहे तो मात्र त्यांनी नोंदलेला नाही. प्रस्तावनेत, नरेंद्र रुक्मिणी स्वयंवराच्या हस्तलिखितात आढळणारे—पण इतर प्रतींत फार कमी प्रमाणात आढळणारे काही 'लक्षणीय पाठ' त्यांनी नोंदले आहेत. तेथेही त्यांनी पारिमांडल्य प्रतीतील 'वानीप' पाठाचे रूप नोंदलेले नाही; हे लक्षात घेण्यासारखे आहे.) त्यामुळे तेथे परिष्करणाचा प्रश्नच उद्भवत नाही. पण केवळ कोलत्यांचा दोष दाखविण्याच्या हेतूने परांजप्यांनी येथे ही तुलना करून दाखवली आहे, तसे करताना कोलत्यांच्या १९४० च्या व १९६६ च्या दोन्ही आवृत्तीत या क्रमांक ५१६ आहे, हेही त्यांच्या लक्षात आले ओवीचा नाही. कोलत्यांनी परिष्करण केलेले आहे हा भ्रम निर्माण करण्यासाठी पारिमांडल्य पोथीतीलप्रमाणेच कोलत्यांच्या संपादणीतीलही या ओवीचा क्रमांक ५१८ आहे असे खुशाल परांजप्यांनी दडपून दिले आहे. हा केवढा अप्रामाणिकपणा आणि ही केवढी हातचलाखी !

पारिमांडल्य प्रतीतही अन्यत्र हा शब्द 'वालीप' असा आला आहे. (७५८, १२९९, व ७६४ या ओव्यांत तो आला असण्याची नोंद डोळके प्रतीतील शब्दकोशात त्या शब्दापुढे केली आहे. पण संहितेतील १२९९ व्या ओवीत हा शब्द नाही. तेव्हा ही नोंद चुकीची आहे, यात शंका नाही. (वस्तुतः तेथे १२९९ ऐवजी १९२९ अशी ती नोंद पाहिजे.) प्रा. परांजपे यांनी 'संपादनकौशल्याचा महत्त्वाचा भाग' म्हणून गौरविलेल्या शब्दकोशातील ही नोंदही त्या कौशल्याचे

एक अंग म्हणूनच मानावी लागेल !) फक्त ५१८ व्या ओवीत तो 'वानीप' असा आहे. तेव्हा येथे उघड-उघड चूक तर नसेल ना? अशा कल्पनेने, इतरत्र आलेल्या या शब्दाच्या अनुषंगाने तो कृष्णदास प्रतीत दुरुस्त करून घेतला असल्यास, त्यामुळे 'संशोधनाची शिस्त' बिघडली आहे की काय हे त्या शास्त्रातील अभ्यासकांनी ठरवावे. पारिमांडल्य पोथीतच इतरत्र आलेल्या ओव्यांतील या शब्दाच्या अनुषंगाने 'वालीप' हा शब्द स्वीकारण्यात कृष्णदास यांनी 'संशोधनाची शिस्त' बिघडवली असे प्रा. परांजप्यांनी अवश्य म्हणावे; पण छायाचित्रावरून लिप्यंतर करून मूळ जसेचे तसे छापण्याचे व्रत घेतलेल्या डॉ. डोळके यांनी मुळातील 'घानीचेपी' या सकळ संकेताचे लिप्यंतर 'वानीपेची' असे करून संशोधनाची कोणती शिस्त सांभाळेली गेली आहे? असे विचारावेसे वाटते न या सकळसंकेताचे लिप्यंतर ण असे करायला पाहिजे. ते लक्षात घेतले तर या शब्दाचे लिप्यंतर 'वाणीपेची' असे व्हावे, मग डोळके प्रतीत ते 'वानीपेची' असे का केले? महानुभावीय हस्तलिखिततील न ण च्या बाबतीतील अनिश्चितता लक्ष्यात घेऊन 'या संकेतांचे काटेकोर पालन करून वाचावयाचे ठरविल्यास एकाच शब्दात सबंध पोथीत एकसूत्रता राहत नाही' असे प्रा. डोळके म्हणतात (प्रस्ता. पा. १७). पण 'वाणीपेची' हा शब्द या सबंध पोथीत एकदाच आला आहे. त्यामुळे एकसूत्रतेचा येथे प्रश्नच उद्‌भवत नाही. 'व्यवस्थित विभाषा' या व्याकरणकारांच्या न्यायाने व मराठीच्या ध्वनिप्रवृत्तीच्या दृष्टीने, मराठी शब्दांत आद्य न (आणि मध्य न्न) दन्त्य स्वरूपात कायम ठेवणे अधिक युक्त ठरते' असे जेव्हा ते म्हणतात, तेव्हा त्यांनी घालून दिलेल्या या नियमानुसार, महानुभाव हस्तलिखितांतील न ण चे संकेत वाचताना परिष्करण करून लिप्यंतर केले पाहिजे हे ते मान्य करतात, ही गोष्ट प्रा. परांजपे यांच्या निदर्शनाला आणून देणे अवश्य वाटते. मूळ पोथीतील न ण या संकेतांचे एकसूत्रतेसाठी किंवा अन्य कारणासाठी परिष्कृत वाचन व लिप्यंतर करून शेकडो शब्द डोळके प्रतीत आहेत हे त्यांनी डोळे उघडे ठेवून पाहावे. तथापी, 'घानीचेपी' या सकळ संकेतात, मध्य न्न चा प्रश्न नाही. म्हणून आहे त्या संकेताचे संकेतनियमानुसार 'वाणीपेची' असेच वाचन होणे अवश्य होते. मग ते 'वानीपेची' असे करण्यात डोळके प्रतीने कोणती शिस्त पाळली हे प्रा. परांजपे सांगू शकतील काय? जुन्या वाङ्मयात या शब्दाचे बव्हंश ठिकाणी जे रूप आढळते त्याला धरून हे वाचन डोळके प्रतीत केले गेले, असे म्हणावे तर तसेही दिसत नाही. कारण, हा शब्द जुन्या यादवकालीन वाङ्मयात मुळी आढळनच नाही, याचा निर्देश यापूर्वी केलेलाच आहे. आढळत असल्यास डोळके प्रतीच्या संपादकांनी तो दाखवून द्यावा.

(इ) कृष्णदास प्रतीने 'कोणतीच शिस्त न पाळल्याचे' जे दुसरे उदाहरण प्रा. परांजपे यांनी दिलेले आहे ते 'चांदिनेया' या रूपाचे. येथेही कोलते प्रतीची तुलना करण्याचे कारण नव्हते, हे पूर्वीच दाखविले आहे. डोळके प्रतीत हा शब्द ज्या ओवीत आला आहे तिचा क्रमांक ७५८ असला तरी कोलते प्रतीत तो ७५६ आहे, तर कृष्णदास प्रतीत ७५९ आहे, याची नोंद न करता नुसती टिंबे देऊन सर्वत्र तो एकच आहे असे परांजप्यांनी भासविले आहे. मूळ प्रतीत ढुंकून न पाहण्याच्या त्यांच्या साक्षेपाचे हे उदाहरण नाही काय?

पारिमांडल्य प्रतीत 'पांडिणेका' असा सकळ संकेतातील शब्द 'चांदिनेया' असा वाचून डोळके प्रतीने संशोधनातील शिस्त सांभाळली, पण कृष्णदास प्रतीने त्यांच संकेताचे वाचन 'चांदिणेया' असे केल्यामुळे कोणतीच शिस्त पाळली गेली नाही असा प्रा. परांजपे यांचा आक्षेप आहे. या आक्षेपाला उत्तर देण्यापूर्वी मी त्यांना एक प्रश्न विचारतो. 'चांदिणे' हा शब्द किंवा त्याची रूपे प्रस्तुत काव्याच्या आरंभीच्या भागात ८, ४९१, ४९४, ५०१, ५१५, ५१७, ५४१, ५४५ इत्यादी ओव्यांत आलेला आहे. तेथील प्रत्येक ठिकाणच्या सकळ संकेतात या शब्दातील ण साठी सकळसंकेत ण हाच आलेला आहे. पण काही ठिकाणी डोळके प्रतीने तो 'न' असा वाचून लिप्यंतर केले आहे, उदा. चांदिने (५१५), चांदिनेया (५१७), चांदिनेयाचें (५४१) चांदनेयाचें (५४५) इत्यादी; तर काही ठिकाणी तो ण वाचून लिप्यंतर केले आहे. उदा : चांदिणें (८ ४९१), चांदिणीयाचा (४९४) इत्यादी. यात कोणती शिस्त पाळली गेली आहे याचा खुलासा परांजप्यांनी प्रथम करावा व मग कृष्णदास प्रतीने कोणतीच शिस्त न पाळल्याबद्दल तिच्या संपादकाच्या नावाने बोटे मोडावी. ण या संकेताचे असे भिन्न वाचन करून कोण

'एकसूत्रता' साधली आहे याचाही खुलासा करावा. म्हणजे तो कृष्णदासासारख्या अज्ञ वापुड्यांना मार्गदर्शक होईल. आणि लिप्यंतर करताना शिस्त कशी पाळावी याचा आदर्शपाठ त्यांना मिळेल!

(७). आता डोळके प्रतीने मूळ हस्तलिखिताशी प्रामाण्य राखल्याचे प्रा. परांजपे जे वारंवार सांगतात तिकडे लक्ष देऊ. हे सांगताना कृष्णदास प्रत 'वाचनदुष्ट' आहे असे परांजपे आवर्जून भासवतात. हा भास निर्माण करण्यासाठी परांजप्यांनी त्यांच्या दृष्टीने कृष्णदास-प्रतीतील वाचनदुष्टतेची दिलेली दोन उदाहरणे—त्यांचा आतापर्यंत विचार केला. आता डोळके प्रतीतील वाचन-दुष्टतेची आणखी काही उदाहरणे पाहा. पारिमांडल्य पोथीत सांकेतिक लिपीत लिहिलेल्या शब्दांचे माझ्या दृष्टीने असलेले यथामूल शुद्ध वाचन एकीकडे देऊन त्याच्या समोर डोळके प्रतीतील वाचन देत आहे. अभ्यासकांनी मूळ छायाचित्रावरून ते तपासून पाहावे. आरंभीच्या हजार ओव्यांतीलच उदाहरणे देत आहे.

ओवी	यथामूल वाचन	डोळके प्रतीतील वाचन
३०	पायाळपणें	पायाळुपणें. (ळ चे संकेताक्षर ल खाली असलेले टिंब उकाराचे नसून, तो पुढील ओळी-तील आंजन शब्दातील अनुस्वार होय.)
६१	लेंकुरुयें	लेंकुरुवें
१६७	कैचें	कैसें
१६६	अधर	अधरु
१९१	सृष्टी आंत	सृष्टी आंतु
१९६	जे	जें
२१०	वसती	वंसती
२४५	नीषाड	नीषाद
२६९	टीळकें	तीळकें
७७१	पामरी	पामरीं (रीं वरील म्हणून वाचलेले अनुस्वाराचे टिंब हे वस्तुतः वरील ओळी-तील कु अक्षरातील उकाराचे चिन्ह होय)
९०५	प्रयोथ	प्रकोथ
९१६	आवगल	आवगळ

मुळात 'तेह्वळी' असलेला शब्द डोळकेप्रतीत बहुतेक सर्व ठिकाणी 'तेव्हळी' असा वाचून लिहिला आहे. वाचनदुष्टतेची ही उदाहरणे केवळ प्रा. परांजपे यांच्यासाठी पेश केली आहेत. ती आरंभीच्या हजार ओव्यांतीलच आहेत हे त्यांनी विसरू नये. कृष्णदास प्रतीत वाचनाचे दोष नाहीत असे मी म्हणत नाही- बरेच आहेत, मुद्रणदोषही आहेत. पण डोळके प्रतीच्या तुलनेने तिची तुच्छतेने अवहेलना करताना डोळके प्रतीतील या उदाहरणांकडे परांजप्यांनी काणाडोळा का करावा ?

(८) डोळके प्रतीत या काव्याचे एकूण २४ प्रसंग आहेत, तर कृष्णदास प्रतीत २५ आहेत. कृष्णदास प्रतीत असे का झाले असावे याची मीमांसा करतांना माझ्या एका लेखात मी असे दाखवले की, 'मूळ पारि-मांडल्य पोथीत (प्रा. डोळके यांची प्रत. संहितेतील पान क्र. ५४ वरील छायाचित्र पाहा) २८९ ओवीनंतर समा-सात 'ऐसा देखोनि नेत्राचा अनुकारु' इत्यादी, ही ओवी लिहून तिला ९० (म्हणजे २९०) क्रमांक दिला आहे; व त्यापुढे 'प्रसंग ४' असे लिहिले आहे. त्यामुळे तेथेच ४ था प्रसंग संपवून पुढील प्रसंगांचे पोथीतील क्रमांक श्रीकृष्णदासांनी दुरुस्त करून घेतले असावेत असे वाटते. मूळ पोथीत मात्र पुढे तसे दुरुस्त करून लिहिलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे' हे माझे म्हणणे वस्तु-स्थितीचे निवेदन होय. ते समर्थन नव्हे. कृष्णदासांनी केले ते बरोबर केले की चूक केले, याविषयी मी एक शब्दही काढलेला नाही, हे संशोधकाच्या तटस्थ दृष्टीने जे पाहातील त्यांच्या लक्षात येईल. पण डोळके प्रतीच्या प्रेमाने अंध झालेल्या परांजप्यांना मात्र ते मी 'हिरीरीने' केलेले समर्थन वाटते. त्यांनी ही समजूत जाणूनबुजून करून घेतलेली आहे. कारण तिच्या आडून त्यांना माझ्यावर आणखी काही आरोप करायचे आहेत. ते लिहितात 'कृष्णदासांनी प्रकाशित केलेली मूळ प्रत डॉ. कोलते यांच्या मायक्रोफिल्म प्रतीचे केवळ लिप्यंतर आहे हे प्रकाशकांचे म्हणणे लक्षात घेतल्यास या चुकीची जबाबदारी डॉ. कोलत्यांची की कृष्णदासांची— की दोघांचीही असा साहजिकच प्रश्न पडतो; आणि कृष्णदास प्रतीतील या चुकीचे स्वतः डॉ. कोलते आपण होऊनच हिरीरीने समर्थन करू लागतात तेव्हा हा प्रश्न अधिक तीव्रपणे जाणवतो.' या विधानातील गर्भित आरोप तर्कदुष्टतेचा व विकृत मनोवृत्तीचा निदर्शक आहे.

माझ्याजवळील मायक्रोफिल्म प्रतीचे लिप्यंतर करून घेऊन कृष्णदासांनी आपला ग्रंथ प्रकाशित केला. त्यात, समजा काहीएक चूक त्यांच्याकडून घडली (ती घडली आहे की नाही ते पुढे पाहू) तर त्याची जबाबदारी डॉ. कोलत्यांवर कशी येते ? तशी ती टाकण्याचा प्रयत्न करणे, हे कोणत्या मनोवृत्तीचे लक्षण आहे ? ते पुढे लिहितात 'चूक कबूल करण्या-ऐवजी डॉ. कोलते महानुभावीय लिपि-संकेता-विषयीच्या आमच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ती चूक पारिमांडल्य पोथीच्या मूळ हस्तलिखितावर लादत आहेत' हे कशावरून ? तर 'मूळ पोथीत मात्र पुढे तसे दुरुस्त करून लिहिलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.' या माझ्या वाक्यावरून. हे वाचकांना पटावे म्हणून माझ्या विवेचनाचा जो दीर्घ उतारा त्यांनी दिलेला आहे त्याच्या शेवटी हे वाक्य आले आहे. त्याच्या आधारे. ते स्वतःच हे स्पष्ट करताना म्हणतात की "या उताऱ्याच्या शेवटी 'मूळ पोथीत दुरुस्ती व्हायला हवी होती ती झाली नाही' अशा संदिग्ध शब्दात मूळ हस्तलिखितकारावर (कोलत्यांनी) जो ठपका ठेवला आहे तो अयोग्य आहे." मला दोष देण्यासाठी माझ्या विवेचनातील शेवटचे वाक्य आपल्या कल्पनेप्रमाणे फिरवून उद्धृत करणाऱ्या या प्रकाण्ड-पंडिताच्या खोटारडेपणाला काय म्हणावे ? माझे मूळ वाक्य व परांजप्यांनी नंतरच्या परिच्छेदात तेच म्हणून, अगदी अवतरण चिन्हात दिलेले वाक्य, ही दोन्ही वर ठळक अक्षरात छापली आहेत. ती अभ्या-सकांनी पाहावी. म्हणजे माझ्या वाक्यात स्वतःच्या सोयीनुसार 'मनमानेल तसा फेरफार' करून परां-जप्यांनी वाचकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा व भ्रमजाल निर्माण करण्याचा कसा प्रयत्न केला आहे ते दिसून येईल.

(९) प्रा. परांजपे यांच्या 'लिपिसंकेताविषयीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन' 'जे नाही ते आहे असे भासवण्याचा डॉ कोलते यांचा खटाटोप आहे' असे ते म्हणतात. म्हणजे मूळ पोथीत 'प्रसंग ४' हा उल्लेख नाही, पण परांजप्यांच्या लिपिअज्ञानाचा फायदा घेऊन, तो आहे, असे भासवण्याचा कोलत्यांनी खटाटोप केला आहे, असे त्यांचे म्हणणे. 'वस्तुस्थिती डॉ. कोलते दाखवितात त्याहून भिन्न आहे' असेही ते म्हणतात. आणि गंमत अशी की, 'हा कोलत्यांचा खटाटोप व्यर्थ आहे हे दाखवतांना पुढे म्हणतात : 'मूळ हस्त-लिखितात – २८९ व्या ओवीनंतर √ अशी खूण देऊन समासात जी ओवी दिली आहे त्यातील अक्षर जसे मूळ पोथीच्या अक्षराहून भिन्न वाटते तसेच प्रसंग ४ लिहिणाऱ्याचे अक्षर आणखीच भिन्न आहे. म्हणजे ज्याने समासात ओवी लिहिली त्याने प्रसंग ४ ही खालची अक्षरे लिहिल्यासारखी वाटत नाहीत' म्हणजे मूळ पोथीत 'प्रसंग ४' ही अक्षरे आहेत तर ! जे नाही म्हणून परांजपे सांगतात ते पोथीत आहे, असे तेच दाखवतात. फक्त त्यांचे म्हणणे इतकेच की ते हस्ताक्षर समासातील ओवीलेखकाचे नाही ! नसेल कदाचित, पण प्रसंग ४ ही नोंद पोथीत आहे ना ? मला आश्चर्य वाटले ते या गोष्टीचे की, परांजपे यांना लिपिसंकेताचे 'अज्ञान' आहे, तर ही अक्षरे त्यांना वाचता कशी आली ? की आणखी कोणी संकेततज्ञाने त्यांना ती वाचून दाखवली ? म्हणजे त्यांचा बोलविता धनी आणखी दुसराच कोणी तरी असावा असा तर्क केल्यास चुकीचे होईल काय ? 'डोळके प्रतीतील छाया-चित्राच्या साह्याने सकळ लिपी जाणून घेतलेल्या अभ्यासकाला' हे सहज कळेल हे खरे, पण परांजप्यांना तर त्याचे 'अज्ञान' आहे, मग हे घडले कसे ? आणि 'प्रसंग ४' ही अक्षरे भिन्न हस्ताक्षरात आहेत हे अक्षरतज्ञांचे ज्ञान त्यांनी केव्हा व कोठे 'संपादन' केले ?

(प्रो. परांजप्यांच्या मते) भिन्न अक्षरात का होईना 'प्रसंग ४' हा निर्देश मूळ पोथीत आहे तर ! कृष्णदास प्रतीने तो वाचून आपल्या प्रतीत 'घेतला असावा' असे म्हटल्याने 'जे नाही ते आहे' असे भासवण्याचा खटाटोप कसा होतो ? आणि दुसरा प्रश्न असा की ' मूळ पोथीशी प्रामाणिकपणा राखण्याची शिस्त सांभाळली म्हणून ज्या डोळकेप्रतीच्या संपा-दकांचा ते सातत्याने गौरव करीत सुटतात त्यांनी, पोथीत असून सुद्धा, 'प्रसंग ४' या निर्देशाचा, इतकेच नाही तर, त्याच पानावर अगदी ठसठशीत मोठ्या अक्षरात 'एथील शोध मागाकडती असे : ९' असे लिहून जे खोडले आहे, त्याचा निर्देश सुद्धा केला नाही. एरवी, मुळात अमुक अमुक आहे, तेथे अशी चूक झाली आहे वगैरे सावधपणे टिपून सांगणाऱ्या या संपादकांनी, आपण ते का स्वीकारले नाही हे सांगण्यासाठी का होईना त्याची नोंदसुद्धा करू नये याचे आश्चर्य वाटते ! समासातील ओवी, त्यांच्या दृष्टीने प्रक्षिप्त असली

तरी तिची नोंद त्यांनी तळटीपात केली आहे, मग 'प्रसंग ४-' इत्यादिकांची नोंद त्यांनी का केली नाही ? त्यांच्या या शिस्तप्रिय प्राणाणिकपणावर पांघरूण घालण्याचे काम परांजपे यांच्यावर पडावे, आणि ते त्यांनी लिपिसंकेताचे अज्ञान असताना सुद्धा विस्ताराने करावे, ही दुर्दैवाची गोष्ट होय. त्यावरून कृष्णदास आणि कोलते यांच्यावर 'हिरीरीने' व सातत्याने तुटून पडून डोळके प्रतीचा झेंडा नाचवणाऱ्या, लिपि संकेताचे अज्ञान असणाऱ्या, एरवी महानुभाव संशोधनाच्या खटाटोपात न पडणाऱ्या या लेखकाच्या पाठीशी कोणातरी प्रख्यात संशोधक, लिपितज्ञ व महानुभाव वाङमयाच्या गाढ्या अभ्यासकाची छाया वावरत असावी असा संशय तीव्रतेने आल्यावाचून राहत नाही. अर्थात, हा माझा संशय कदाचित चुकीचाही असेल, पण तो जाणवतो एवढे मात्र खरे!

(१०) 'भलतें' असा एरवी लिहिला जाणारा शब्द 'भल तें' असा पदच्छेद करून (१७७१) प्रा. डोळके यांनी मार्मिक पाठ सुचवला हे कदाचित मान्य करता येईल. पण प्रा. डोळक्यांची पाठ थोपटतांना, कृष्णदासांनी नेहमीप्रमाणे 'भलतें' शब्द सलग वाचून लिहिला म्हणून त्यांच्यावर घसरून 'कृष्णदास प्रतीच्या प्रकाशकांना अभ्यासाचे फारसे महत्त्व वाटत नसावे, म्हणूनच त्यांनी मनमानेल तसे फेरफार आपल्या पोथीत केले.' 'अर्थदृष्टचा शब्दांचे योग्य ते पदच्छेद करणे कृष्णदासप्रतीच्या धोरणात बसत नसावे' असे सरधोपट अभिप्राय, आणि तेही केवळ एकाच उदाहरणाच्या आधाराने, देण्याचे काही कारण नव्हते.

पहिली गोष्ट अशी की, 'भलतें' शब्द एक मानून तो सलग लिहिल्याने कृष्णदासप्रतीत 'मनमानेल तसे फेरफार' केले असे म्हणणे चूक आहे परांजपे समजतात तसा, योग्य पदच्छेद न करण्याचा हा दोष कदाचित असेलही, पण तो पदच्छेद न केल्याने मूळात 'फेरफार' आणि तोही 'मनमानेल' तसा केल्याचा आरोप करणे हे विवेकाला सोडून आहे. दुसरे असे की; 'भल तें' असा पदच्छेद केल्याने 'योग्य अर्थ' सूचित होतो, पण 'भलतें' शब्द सलग लिहिल्याने 'अर्थाचा अनर्थ' होतो असे परांजपे म्हणतात. आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी 'भले ते = भलेते = भलते' अशी व्युत्पत्ती देऊन "अशा पद्धतीने आज घटकेस मुळाहून विपरीतार्थ दाखविणारा 'भलते.' शब्द निर्माण झाला असावा असे आम्हास वाटते." असे सांगतात. यावर असे म्हणता येईल की 'आज घटकेस भलतें' शब्दाचा अर्थ काय आहे तो पाहाण्यापेक्षा जुन्या भाषेत त्याचा अर्थ काय होत होता ते पाहिले पाहिजे. 'उदैक वीचारूनी : भल तें करूं' (१७७१) या चरणांचा 'उद्या या गोष्टीचा योग्य तो विचार करता येईल' असा अर्थ आहे. म्हणून परांजपे सांगतात. अर्थात्, भलं तें = योग्य ते, असा या पदच्छिन्न शब्दाचा अर्थ; हे बरोबर असेलही. पण 'भलतें' या सलग शब्दाचा जुन्या काळी, केवळ विपरीतार्थच होतं होता काय ? त्यांनी दिलेल्या व्युत्पत्तीवरून हा विपरीतार्थ सुचित होतो काय ? प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी आपल्या व्युत्पत्ति-कोशात 'भलतें' या सलग शब्दाचे अर्थ 'कोणतेंहि, मनपसंत, योग्य, पुष्कळ' असे दिलेले आहेत, ते त्यांनी पाहावे. जुन्या काव्याचे अभ्यासक, त्यातील शब्दांचे; आजच्या घटकेस असलेले नव्हेत, तर जुन्या काळात असलेले अर्थ लक्षात घेऊनच ओव्यांना अर्थ लावतील. केवळ 'आजच्या घटकेस' प्रचलित असलेले अर्थ लक्षात घेऊन, जुन्या काव्यातील ओव्यांचे अर्थ लावणारे प्राध्यापकच अर्थाचा अनर्थ करून सोडतील, असे प्रा. परांजपे यांच्या उदाहरणावरून दिसते. डोळके प्रतीत

'कैसी कुसूमें रजें माजींरी :
भलतेंही जाति चाइरी
तेथ वीरहिणी गेलीयां पामरीं :
तें काइ सांघों ! (७७१)'

अशी एक ओवी आहे. तीत 'भलतेंही' शब्दाचा अर्थ काय ? हा शब्द सलग लिहिल्याने 'अर्थाचा अनर्थ' होतो काय ? तो शब्द पदच्छेद करून लिहिता येणे शक्य होते काय ? इत्यादी प्रश्नांचा विचार परांजप्यांनी करावा. डोळके प्रतीत या शब्दाची जी पाठांतरे दिलेली आहेत त्यांचा त्यांना या बाबतीत उपयोग होईल, एवढेच या वेळी लिहितो. सारांश, कृष्णदासप्रतीने 'भलतें' शब्द सलग लिहिल्याबद्दल परांजप्यांनी त्यांच्यावर भरमसाट आरोप करून आकाश-पाताळ एक करण्याचे कारण नव्हते. पण कृष्णदास प्रतीचे अवमूल्यन करून डोळके प्रतीची प्रतिष्ठा वाढवण्यासाठीच जेथे प्रो. परांजपे यांनी लेख लिहिला आहे तेथे त्यांना एवढा विवेक कसा राहाणार ? आता ज्यांना 'अभ्यासाचे फार महत्त्व वाटते' त्या प्रा. डोळके यांच्या प्रतीत काय आढळते ते पाहू.

(१) 'काइहो !' असा संबोधनपर एक शब्द डोळके प्रतीतील २६३९ या एकाच ओवीत नाही तर २६४३ या आणखी एका ओवीत आढळतो. म्हणजे या दोन ओव्यांत तो आलेला असून दोन्ही ठिकाणी सारखाच सलग छापला आहे. 'काइहो' हे कोणत्या एका शब्दाचे संबोधनात्मक रूप आहे, हे परांजपे सांगतील काय ? 'काइ हो' असे हे दोन शब्द आहेत, आणि तसाच पदच्छेद करून ते लिहायला पाहिजेत. 'काइहो' हा सलग शब्द मानून कोणता मार्मिक अर्थ निघतो तो त्यांनी स्पष्ट करावा 'अर्थदृष्टचा शब्दांचे योग्य ते पदच्छेद करणे' हे डोळके प्रतीच्या धोरणात असते की नाही, याचाही खुलासा परांजप्यांनी करावा.

(२) डोळके प्रतीत पुढील ओवी आली आहे

'सांघता प्रथकाकार अळंकारू :
प्रबंध होइल अती चारू
म्हणौनि मूद्रीत सारोधारू :
वोलत आसें (२७३६)'

डोळके प्रतीतील या ओवीचा अर्थ काय होतो ? 'अळंकार प्रथकाकार सांघता' म्हणजे अलंकारांचे वर्णन पृथक पृथक केले तर, एकेका अलंकाराचे वेगवेगळे वर्णन केले तर, प्रबंध 'अती चारू' = फार सुंदर होईल; म्हणून 'मूद्रीत सारोधारू (सारांश) वोलत आसें' असा अन्वय. 'मूद्रीत' या शब्दाचा अर्थ प्रा. डोळक्यांच्या शब्दकोशात नाही. (त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ देता यावा, एवढ्याचसाठी हा निर्देश केला आहे). सं. मुद्रा = मर्यादा; त्यावरून 'मुद्रित' मर्यादित; म्हणजे थोडक्यात. याच काव्यात हा शब्द ६८७ व्या ओवीत आला आहे त्यावरील 'टीपा'त 'मुद्रित=तोकडेया बहुत जाणणे' असा अर्थ दिला आहे. तेव्हा, 'मुद्रित = थोडक्यात,' हा अर्थ मान्य व्हायला हरकत असू नये. 'सारोधारू' या शब्दाचा अर्थ डोळके प्रतीच्या कोशात 'सारांश' असा दिला आहे. तेव्हा 'मुद्रीत सारोधारू' म्हणजे थोडक्यात, सारांश. 'अलंकारांचे वर्णन पृथक पृथक केले तर, म्हणजेच एकेका अलंकाराचे वर्णन वेगवेगळे केले तर प्रबंध' अती चारू (= फार सुंदर) होईल, म्हणून ते थोडक्यात सारांश रूपाने वोलतो.' असा डोळके प्रतीतील या ओवीचा अर्थ होईल. आता प्रश्न असा की, अलंकारांचे वर्णन 'प्रथकाकार' = वेगवेगळे, म्हणजेच विस्ताराने केल्याने जर प्रबंध 'अती चारू' म्हणजे फार सुंदर होत असेल तर कवीने आपण ते 'थोडक्यात, सारांश—रूपाने' करीत आहोत असे का म्हणावे ? कवीच्या विधानात हा परस्परविरोध नाही काय ? विस्तार होऊ नये म्हणून आपण ते सारांशरूपाने सांगतो, असे म्हणणे योग्य झाले असते. महानुभाव वाङ्मयात हीच कल्पना अन्यत्र आली आहे. उदा:

(१) तरी ज्ञान यें दोनिचि अक्षरें :
विस्तारितां शब्दब्रह्म अपुरें ।
मणौनि मुद्रीत सारोधारें :
सांगेन आइका ।। (ज्ञानप्रबोध ६५.)

(२) यापरी पांचै अवतार :
मीयां नमीले प्रतक्षाकार ।
तें मुद्रीत सांधंन सारोधार :
एकी वोवीयमाजी ।। (मूर्तिप्रकाश. २६)

यावरूनही, विस्तार होऊ नये म्हणून थोडक्यात सांगतो, हा अर्थ लक्षात येईल. पण डोळके प्रतीतील ओवीत तर 'प्रथकाकार सांघता' (म्हणजेच विस्तारपूर्वक सांगितल्याने तर प्रबंध 'अती चारू' होणार आहे, असे कवी म्हणत असल्याचे दिसते, आणि म्हणून 'थोडक्यात सारांशरूपाने' सांगण्याला तो प्रवृत्त झाला आहे, हे कसे ? हा अर्थ कवीला अभिप्रेत असणे, शक्य नाही. हा 'अनर्थकारक अर्थ' निष्पन्न होतो तो डोळके प्रतीत 'अतीचारू' या एकाच सलग शब्दावर, त्याचा अयोग्य ठिकाणी पदच्छेद करून (किंवा त्यात मन मानेल तसा फेरफार करून ?) त्यावर 'अत्याचार' केल्यामुळे !

प्रस्तुत ओवीतील दुसरा चरण 'प्रबंध होइल अतीचारू' असा पाहिजे. 'अती चारू' असा पदच्छेद करण्याचे कारण नाही. 'अतिचार' म्हणजे मर्यादातिक्रमण, उल्लंघन; अर्थात, विस्तार. या अर्थाने भास्करभट्ट वोरीकर यांच्या शिशुपाळवध काव्यात हा शब्द वापरला आहे. उदा.

लाजेचीए बुंथीभीतरि :
गुप्तांगें लपवीति तिया सुंदरी ।
हा भावो वाणितां जासी अतिचारीं :
तरि रसीक कोपती ।। (७१८)

या ओवीवरील 'टीपा'त 'अतिच्यारी = विस्तारीं' असा अर्थ दिलेला आहे, तो पाहावा. (कल्पनासाम्याच्या दृष्टीने, नामा पाठक कवीच्या 'भरतभेट' या आख्या-

नातील 'प्रथुकांकारे सांगता : तरी वीस्तारा जाईल कथा'–२३० प्राचीन मराठी कविता. संपादक : ज. शा. देशपांडे, पान ७६.—या ओळी लक्षात घेण्यासारख्या आहेत). 'प्रथकाकार अळंकारू सांघता प्रवंघ अतीचारू होईल, म्हणजे प्रवंधाचे मर्यादातिक्रमण होईल,' प्रवंधाची मर्यादा वाढेल, अर्थात, फार विस्तार होईल,' म्हणून मी थोडक्यात सारांशरूपाने त्यांचे (अलंकारांचे) वर्णन करतो.' असा या ओवीचा माझ्या दृष्टीने अर्थ आहे. पण 'अती चारू' असा पदच्छेद केल्यामुळे नेमका उलटा अर्थ होऊन अनर्थ झाला आहे. कृष्णदास प्रतीतही या ओवीत 'अती चारू' असाच पदच्छेद केला आहे. तेव्हा त्यांच्या प्रतीलाही हा दोष लागू होतो. ज्यांची मातृभाषाही मराठी नाही त्या श्रीकृष्णदासांना काय दोष द्यायचा ?. पण जिला 'अभ्यासाचे फार महत्त्व वाटते,' आणि संशोधनाच्या दृष्टीने जी 'शिस्तप्रिय' आहे त्या डोळके प्रतीची ही अवस्था ! तेव्हा, प्रा. परांजपे यांनी कृष्णदासांना अर्पण केलेल्या अहेराचे शेलापागोटे डोळके प्रतीच्या संपादकांच्या शिरावर त्यांनी आपल्याच हाताने बांधायला हरकत नाही.

(११) 'नरेंद्राचे २९३९ ओव्यांचे रुक्मिणी स्वयंवर' असे मी आणि इतर संशोधकांनीही अनेकदा म्हटले आहे. तेथे 'नरेंद्राचे' हा शब्दप्रयोग वाच्यार्थाने घ्यायचा नाही. कारण, इ. स. १९४० पासून मी म्हणत आलो आहे की, २९३९ चे संपूर्ण रुक्मिणीस्वयंवर काव्य आरंभीच्या ८७९ ओव्या सोडून दिल्या तर नरेंद्राचे नव्हे. आरंभीच्या ८७९ ओव्यांखेरीज त्यातील इतर भाग प्रक्षिप्त असला पाहिजे. याची चर्चा १९४० साली प्रसिद्ध केलेल्या 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याच्या प्रस्तावनेत मी केली आहे. 'नरेंद्राचे २९३९ ओव्यांचे रुक्मिणीस्वयंवर' असा उल्लेख ज्यावेळी मी करतो तेव्हा हे गृहीत धरलेले असते. 'युगवाणी'च्या १९७४ च्या दिवाळी अंकात "आतापर्यंत नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर म्हणून २९३९ ओव्यांचे एकच काव्य आहे अशी अभ्यासकांची समजूत आहे" असे मी लिहिले, याचा अर्थ २९३९ ओव्यांचे हे संपूर्ण काव्य त्याचा ८७९ ओव्यांच्या पूर्वभाग लिहिण्याऱ्या नरेंद्राचेच आहे असे मला मान्य असल्याचे समजण्याचे कारण नाही. हे लक्षात घेऊनच त्याच लेखात 'नरेंद्राचे किंवा नरेंद्राच्या नावावर असलेले संपूर्ण रुक्मिणीस्वयंवर म्हणून एकच काव्य आहे, या समजुतीला........तडा गेला आहे." असे मी विधान केले आहे, ते प्रा. परांजपे यांनी निदर्शनाला आणलेच आहे. तेव्हा माझ्या मते २९३९ ओव्यांच्या काव्यातील आरंभीच्या ८७९ ओव्यानंतरचा भाग नरेंद्राचा नव्हे. तो तसा आहे हे गृहीत धरून प्रा. डोळके यांनी संपादन केले आहे. तेव्हा तो नरेंद्राचा आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांची आहे.

दुसरे असे, की १८८५ व १९१२ या राजधर व नागराज प्रतीतील नरेंद्राच्या नावावर असलेले संपूर्ण रुक्मिणीस्वयंवर हे काव्य नरेंद्राच्या नावावर कुणीतरी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला'–असे ते (कोलते) स्पष्टच सांगतात, असे विधान जेव्हा प्रा. परांजपे करतात तेव्हा ते हालचलाखी करतात. माझे मूळ विधान 'नरेंद्राच्या अपूर्ण रुक्मिणी स्वयंवराचा पुढील भाग स्वतंत्रपणे, पण नरेंद्राच्या नावावर लिहून तो ग्रंथ पूर्ण करण्याचा कोणीतरी प्रयत्न केला असावा असे त्यावरून सूचित होत असावे असे वाटते' असे आहे, आपल्या सोयीसाठी प्रा. परांजपे इतरांच्या विधानांची मोडतोड कशी करतात, हे यावरून लक्षात येईल.

(१२) २९३९ ओव्यांच्या ह्या काव्याची दुसरी पोथी मला उपलब्ध झाल्यावर 'युगवाणी'च्या लेखात मी लिहिले होते की–"या संपूर्ण काव्याचे 'एकमेव' हस्तलिखित उपलब्ध आहे याही समजुतीला तडा देणारी परिस्थिति आता निर्माण झाली आहे" यावर वकिली डावपेच लढवून डोळके प्रतीचे जुनेपण निर्विवाद सिद्ध होते, असे प्रा. परांजपे सांगतात. हे त्यांनीच कशाला सांगायला पाहिजे ? मी स्वतःच हे दाखविले होते, की 'पारिमांडल्य हस्तलिखित जुने असून आता मला मिळालेले नागराज हस्तलिखित हे त्यानंतर साधारणपणे साडेसहा वर्षानंतर लिहिले गेले.'

(१३) पण प्रा. परांजपे यांना केवळ हेच सांगायचे नाही. 'नागराजप्रत ही पारिमांडल्य पोथीचीच जुन्यातली जुनी नक्कल आहे,' असे त्यांना सांगायचे आहे. आणि म्हणूनच 'ती नक्कल नसून एक नवी पोथी आहे...ते सिद्ध करण्याचे काम डॉक्टरसाहेबांचे आहे.' असे ते म्हणतात. यावर मला एवढेच सांगायचे आहे की, मला नवीन पोथी उपलब्ध झालेली आहे. ती पारिमांडल्य प्रतीपेक्षा साडेसहा वर्षानंतरची आहे, एवढ्यावरून ती पारिमांडल्य प्रतीचीच नक्कल आहे हे सिद्ध होऊ शकत नाही. कदाचित असेलही किंवा नसेलही, कदाचित या दोन्ही प्रतींची प्रमाणप्रत एक निराळीच असेल. तीवरून

दोघांनी स्वतंत्रपणे आपापल्या प्रतिलिपी तयार केल्या असतील. आणखी पोथ्या मिळाल्याशिवाय हे सांगणे कठीण आहे पण प्रा. परांजपे ज्या अर्थी नागराज प्रत ही पारिमांडल्य-प्रतीची नक्कल आहे असे ठासून विधान करतात तेव्हां ते सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांची आहे. ती या प्रतीची नक्कल नाही हे सिद्ध करण्याचे आव्हान देणाऱ्याच्या लक्षात ही साधी गोष्ट येऊ नये ?

पण येथेच ते थांबत नाहीत. आणखीही काही भरमसाट विधाने ते करतात. 'प्रा. डोळके यांच्या-जवळच्या पारिमांडल्य पोथीची नक्कल...डॉ. कोलते यांनी करून घेतली होती.' असे ते म्हणतात. हे त्यांना कोणा कर्णपिशाचाने सांगितले ? प्रा. डोळके यांनी नक्कल करून घेण्यासाठी आपल्याजवळची पोथी मला कधी दिली ? आणि तिची नक्कल मी कधी करून घेतली ? हे धादांत खोटे विधान आहे. वस्तुस्थिति अशी आहे की पारिमांडल्य पोथी १९४० साली जशी माझ्या-जवळ होती तशी १९५४ मध्ये व १९५५ च्या मार्च महिन्यापर्यंत ही माझ्याच जवळ होती. माझ्यांजवळून परत घेतल्यानंतर त्या पोथीचे मालक कै. श्रीकृष्णराज पारिमांडल्य यांनी ती प्रा. डोळके यांना दिली असावी. त्यापूर्वीच मी तिचा सूक्ष्मपट (मायक्रोफिल्म) काढून घेतला होता. त्या सूक्ष्मपटावरूनच त्याची छायाचित्रेंही काढून घेतली होती. या सूक्ष्मपटाला व छायाचित्रांनाच प्रा. परांजपे 'नक्कल' म्हणत असतील तर गोष्ट वेगळी. 'नक्कल' कशाला म्हणतात हे परांजप्यांना कळू नये याचे आश्चर्य वाटते. पण यात आश्चर्य कसले ? आपल्याला 'हवे असलेले प्रमेय' सिद्ध करण्यासाठी या कोलांटउड्या मारण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते.

(१४) 'ही आवृत्ती (डोळके प्रत) प्रसिद्ध होण्याचा अवकाश, की इतके दिवस महानुभाव महंतां-जवळ पडून असलेल्या तीन-चार पोथ्या जणु वाट पाहत असल्याप्रमाणे एकामागोमाग एक भराभर बाहेर आल्या-' 'या साऱ्या प्रकरणात महानुभाव महंतांची हव्या त्या पोथ्या मिळवून देण्याची तत्परता'-इत्यादी उल्लेखातील परांजप्यांना अभिप्रेत असलेला हेत्वारोप अत्यंत खेदजनक आहे. १५ वर्षे 'या शोधात घालवून' प्रा. डोळके यांना 'या काव्याची दुसरी प्रत मिळू शकली नाही', आणि त्यांची प्रत प्रसिद्ध झाल्यावर कोलत्यांना मात्र त्या हुकमी मिळाल्या'-केवळ याबद्दल-चेच वैषम्य परांजप्यांना वाटते असे नाही, तर त्यामुळे 'डोळके प्रतीच्या श्रेयाचे मार्ग त्यांनी (त्या पोथ्यांनी) निरुद्ध करून टाकले' हे त्यांच्या पोटात सलणारे शल्य आहे. हा निरुद्ध झालेला श्रेयाचा मार्ग मोकळा करण्या-साठी प्रा. परांजपे यांच्या लेखाचा खटाटोप आहे. तो कितपत मोकळा झाला ते त्यांनी ठरवावे. मी एवढेच लिहितो की, या पोथ्या मला अशा 'हुकमी' मिळालेल्या नाहीत. त्या कशा मिळाल्या यासंबंधीचा वृत्तांत त्या त्या लेखाच्या आरंभी मी दिला आहे. प्रा. डोळके यांना पोथ्या मिळू शकल्या नाहीत याबद्दल मला खेद वाटतो. पण महंतांच्याकडून पोथ्या मिळविण्या-साठी त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो, हे त्यांना मी सांगायला पाहिजे काय ? हा विश्वास त्यांनी संपादन केला आहे काय ? यांनी स्वतःलाच विचारावे. पोथ्यांच्या शोधात ज्या महंत मुरलीधरशास्त्री आराध्यांचे प्रा. डोळके यांना बहुमोल साहाय्य झाले, ते स्वतः आपला विदारक अनुभव लिहितात.

"त्या श्रीकृष्णचरित्राच्या ८२ लीळा आहेत व ते तळेगावकर शाखेचे असल्यामुळे ते त्या शाखेकडेच उपलब्ध आहे. मात्र सध्या ती पोथी प्रा. श्री. सुरेश म. डोळके यांच्या तिजोरीत आहे. मी पोथी मिळविण्यासाठी भालोद येथील तळेगावकरांच्या मठात गेलो असता तेथील महंतांनी अत्यंत दुःखपूर्ण मुद्रेने सांगितले की, श्रीकृष्णचरित्राचे संपादन करतो म्हणून प्रा. श्री. सुरेश म. डोळके यांनी ती पोथी नेली. मात्र ती परत तर करीत नाहीतच नाही, पण साधे पत्राचे उत्तर देण्याचेही सौजन्य दाखविण्यास तयार नाहीत.

मला त्यांचे म्हणणे स्वानुभवामुळे खरे वाटले. कारण १५ वर्षांहून अधिक काळ लोटला. तेव्हापासून ते श्रीकृष्णचरित्राचे संपादन करण्याचे म्हणत आहेत. मी पण त्यांना श्रीकृष्णचरित्राच्या म्हणजे पीढीपाठाच्या ५-६ पोथ्या मिळवून दिल्या. कित्येक वर्षे झाली तरी वाऱ्याफेऱ्या घालून दोन पोथ्या परत मिळविल्या बाकीच्या अजूनही त्यांचाकडे तशाच राहिल्या आहेत.

पूर्वी आम्ही महानुभाव लोक कोणाला सहसा पोथी देत नव्हतो. आता आमच्यातील काही नवविचार-वाल्यांची प्रवृत्ती बदलली आहे. आम्ही स्वतःजवळच्या पोथ्या तर देतोच देतो, पण इतरांच्याकडून देखील मिळवून देतो. मात्र काही संशोधक उलटया मार्गाने

[पृष्ठ २१ वर]

कालिदास आणि हाफिज : कवीच्या आत्मप्रौढीचे मूळ

देवीसिंग चौहान

कालिदास हा संस्कृत भाषा व भारताचा सर्वश्रेष्ठ महाकवी मानण्यात येतो. त्याचा काल आता सामान्यः पणे शक ३२५ च्या सुमाराचा मानण्यात येतो. हाफिज हा फार्सी (ईराणी) भाषा व ईराण देशाचा सर्वश्रेष्ठ महाकवी आहे. त्याचा देहान्त शक १३११ (हिजरी ७९१) मध्ये झाला. गुलबर्गा येथून राज्य करणाऱ्या महमूदशाह बहमनीने त्याला आपल्या दरबारी येण्याचे निमंत्रण दिले व पैसेही पाठविले. त्याप्रमाणे हाफिज ईराण देशातील होरमूज बंदरापर्यंत आलाही होता. पण वादळ झाल्यामुळे तो शीराज या आपल्या मातृ-नगरास परतला. दोघेही आपापल्या देशातील एक-मेवाद्वितीय असे श्रेष्ठ कवी आहेत. मी दोघांचाही सखोल अभ्यासक नाही. कालिदासाची साहित्यसंपदा सर्वांना ठाऊक आहे. हाफिजने महाकाव्य किंवा एखादे प्रदीर्घ काव्यही लिहिलेले नाही, परंतु तो गजलसम्राट आहे. त्याच्या गजलांची संख्याही फार मोठी नाही. त्याने साधारणतः ६०० गजला व अगदीच थोडेसे स्फुट काव्य लिहिलेले आहे.

दोघेही श्रेष्ठ कवी असल्याने त्यांच्यात काव्यगुण आहेतच. त्यांची तुलना मला करावयाची नाही. 'जातीच्या सुंदराला काहीही शोभते' यासंबंधीचा शाकुन्तलातील हा श्लोक–

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ।। १.१७ ।।

सहजसुंदर व हृद्य आहे. जात्याच सुंदर असलेल्यांना अलंकरणाची गरज नाही असे कालिदास म्हणतो. नेमका हाच आशय हाफिजने गजलेच्या एका श्लोकार्धात सांगितला आहे. तो म्हणतो–

ज़ इश्के–नातमामे–मा जमाले–या मुस्तग्नी अस्त
ब–आबो–रंगो–खालो–खत चिह हाजत रूए–जेबा रा ।

अर्थः–माझ्या या अपूर्ण प्रेमाने माझ्या प्रेयसीचे सौन्दर्य अधिक संपन्न थोडेच होणार आहे. जे स्वरूप सुंदर आहे त्याला गुलाब–अत्तर (आब, सं. आप्) रंग, साल–वस्त्रप्रावरण (म. साल, सं. छर्दिस्, छल्ली) आणि चित्रानुलेपन यांची काय गरज आहे.

अशी हृद्य व काव्यमय समान स्थळे बरीच दाखविता येतील. परंतु प्रस्तुत प्रसंगी दोघांतील एका वेगळ्या साम्यविरोधाकडे लक्ष वेधावयाचे आहे. कालि-दास हा महाकवी असूनही त्याच्या अंगी, या महान् पदाला शोभेल असाच विनय बाणलेला होता. परन्तु हाफिजच्या अंगी असा विनय वसत नसल्याचे दिसून येते. त्याने आत्मप्रौढीचा प्रमाद केलेला नसला तरी आत्मविश्वासाचा अतिरेक म्हणता येईल अशी त्याच्या मनाची बैठक होती असे मात्र म्हणता येण्यासारखे आहे. अशी त्याची मनोभूमिका का बनली हेही शेवटी पाहावयाचे आहे.

कालिदासाने आपल्या पहिल्या मालविकाग्निमित्र या नाट्यकृतीत रसिक समीक्षकाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊन बऱ्यावाईटाचा अभिप्राय शहाण्याने द्यावा असे आवाहन केलेले आहे.

पुराणमित्येव न साधु सर्वं,
न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।
सन्तः परीक्ष्यान्यतरद् भजन्ते,
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।। १–२ ।।

जे जुने आहे ते सगळेच चांगले असते असे नव्हे आणि जे नवीन आहे ते सर्वच निर्दोष, निर्वंद्य नव्हे. ते परीक्षून त्याचा स्वीकार करावा. अशी कालिदासाने रसिकांकडे अपेक्षा व्यक्त केलेली आहे. आपले तिसरे व शेवटचेच नाटक शाकुंतल यात त्याने म्हटले आहे–

आ परितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ।। १–२ ।

आपले हे नाटक श्रेष्ठ प्रतीचे आहे असे त्याला मनोमन वाटत होते. परंतु रसिकश्रेष्ठांचा तसा परितोष व

अभिप्राय येईपर्यंत मी तसे म्हणणे युक्त नाही अशी कालिदासाची भूमिका आहे. ही कृती सर्वश्रेष्ठ असूनसुद्धा तसे म्हणण्यास आपले मन कचरते असे त्याला वाटते. आपण चांगले शिक्षित असूनसुद्धा आपल्या मनात तसा आत्मविश्वास नाही हे जणू त्याने वेगळ्या पद्धतीने मांडलेले आहे. जगात अप्रतिम ठरलेल्या नाट्यकृतीबद्दलची स्वतः कवीची ही धारणा मोठी विचारणीय व त्याच्या नम्रतेची प्रतीक आहे, असे म्हणावे लागते. रघुवंशातील आपल्या काव्यगुणाची कालिदासाची प्रस्तावना प्रसिद्धच आहे. रघूचा वंश जगद्विख्यात व प्रसिद्ध आहे मी मात्र अगदी किरकोळ कवी आहे असे त्याने प्रतिपादिले आहे. रघुवंश हे संस्कृत भाषेतील व कालिदासाचेही सर्वश्रेष्ठ महाकाव्य आहे. असा भारतीय व युरोपीय विद्वानांचा अभिप्राय आहे. असे असूनसुद्धा कवीने मात्र आपली लीनता सोडलेली नाही. आपल्या श्रेष्ठत्वाची जाणीव त्याला होती. म्हणूनच त्याने रसिक समीक्षकांस–

तं सन्तः श्रोतुमर्हन्ति सदसद्व्यक्तिहेतवः ।
हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ॥१.१०

असे आवाहन केलेले आहे. माझे हे कृतिसुवर्ण अग्नीत घालून ते बावनकसी उतरले किंवा त्यात काही भेसळ आहे ते पाहावे असे बऱ्या–वाईटांचा आढावा घेणाऱ्या समीक्षकांना त्याने जतावले आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे अशी ग्वाही सर्वांनी दिलेली आहेच. पूर्वसूरींना वंदन करून वाटचाल करण्याची विनयशीलता कालिदासाच्या अंगी बाणलेली होती, हेच यावरून दिसून येते. साहित्यसृजन हा सरस्वती–गणपतीचा प्रसाद आहे, असे भारतीय कविपरंपरा सांगत आलेली आहे.

आता हाफ़िज़

आता महाकवी ख्वाजा हाफिज याची स्वतःच्या काव्याबद्दल काय भूमिका होती हे पाहू. हाफिजने एखादेही महाकाव्य अथवा दीर्घकाव्य लिहिलेले नसले तरी आपल्या गजलांमधून आपल्या काव्याबद्दलचा त्याचा अभिप्राय जागजागी व्यक्त झालेला आहे. एका गजलेत तो म्हणतो–

गर मतरबे–हरीफाँ ईं पारसी बि–ख्वानद
दर रक्सो–हालत आरद पीराने–पारसा रा ।

अर्थ–माझ्या प्रतिस्पर्ध्यांची महफिल जर माझ्या पार्सी (फार्सी) कवितेचे वाचन करतील तर, त्यांच्यातील जे महान् संयमी व निष्काम असतील, तरी ते देखील (माझ्या काव्यरस आस्वादनाने) बेहोश होऊन नाचावयास लागतील.

आपापल्या काव्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल कालिदास व हाफिज यांनी घेतलेल्या भूमिकांत फरक आहे हे वाचकांच्या सहजच ध्यानी येईल. आपले काव्य श्रेष्ठ आहे असे दोघाही महाकवींना नोंदवावयाचे आहे. ते त्यांनी केलेले आहे. परंतु हाफिजच्या शब्दयोजनेवरून त्याला आपले प्रतिस्पर्धी अभिप्रेत आहेत हे उघडपणे दिसून येते. आपले काव्य त्यांना वेड लागण्याइतपत श्रेष्ठ व निर्वंद्य आहे असे तो सांगतो. कालिदासाने मात्र सदसद्विवेकबुद्धीला आवाहन केलेले आहे. आपले काव्य श्रेष्ठ, असे तो कधीही म्हणत नाही.

दिल्लीनिवासी अमीर खुस्त्रो हा फार मोठा कवी होता. त्याचा देहान्त शक १२४७ (हिजरी ७२५) मध्ये झाला. त्याने आठ–नऊ महाकाव्ये, फार मोठा गजलसंग्रह मागे ठेविलेला आहे. हाफिज हा खुस्त्रोनंतर झाला. खुस्त्रोच्या मोठेपणाची कीर्ती हाफिजच्या कानावर सारखी आदळत होती. या पार्श्वभूमीवर हाफिजने केलेले, एका गजलेतील एक-विधान मोठे लक्ष्य आहे. हाफिज म्हणतो–

शक्कर–शिकन् शवन्द हमह् तोतियाने–हिन्द
जी कन्दे–फारसी कि बिह् ब–बंगालह् मी–रवद ॥

अर्थ– माझी ही फार्सी शर्करा, जी अधिक चांगली आहे, जेव्हा बंगाल्याकडे जाऊन पोचेल, तेव्हा भारताच्या सगळ्या शुकपक्ष्यांनी आपल्या साखरेचा त्याग केल्याचे दिसून येईल. (सगळे भारतीय शुकपक्षी

[पृष्ठ १९ वरून]

जात आहेत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. कारण त्यांच्याकडे पोथी गेली की ती पुनः परत मिळण्याची आशा खुंटते. म्हणून पूर्वस्थिती न यावी ही भीती वाटू लागली आहे" (महानुभाव, नोव्हेंबर १९७३, पान १६).

कोलत्यांना पोथ्या मिळतात (आणि डोळक्यांना त्या मिळत नाहीत) याबद्दल कुत्सित उल्लेख करणाऱ्या प्रा. परांजपे यांनी हे वाचावे. आणखी काय लिहावे ?

□ □

शर्करामंजक बनतील) हा संदर्भ दिल्लीनिवासी अमीर खुस्त्रो याला अनुलक्षून आहे; असे समीक्षकांचे म्हणणे आहे. ते काही असो. आपले काव्य भारतीय फार्सी काव्यापेक्षा श्रेष्ठ आहे असे हाफिजनेच येथे नोंदविले आहे. माझ्या काव्याच्या गोडीपुढे भारतीय काव्य (अर्थात् फार्सी) अगदी नीरस आहे, असा हाफिज कवीचा आशय अगदी सुस्पष्ट आहे. मला येथे भारतीय काव्याशी हाफिजची तुलना अभिप्रेत नाही, तर आपल्या काव्याविषयी त्याचा स्वतःचा काय अभिप्राय आहे हे पाहावयाचे आहे. कालिदास व हाफिज या दोघांचा आपापल्या काव्याविषयीचा अभिप्राय भिन्नभिन्न आहे हेच येथे लक्षात घ्यावयाचे आहे.

आणखी एका ठिकाणी हाफिजने असेच मत व्यक्त केले आहे.

ब–शिअरे–हाफिजे–शीराज मी–रक्सन्द ब मी–गल्तन्द
सियह–चश्माने–काश्मीरी व तुर्काने–समरकन्दी ॥

अर्थ– शीराजनिवासी हाफिज कवींच्या काव्य-रसाने, काश्मीरच्या कृष्णनयन युवती व समरकन्दची तुर्क पोरे, नाचतात व लोळू लागतात. येथेही आपले काव्य, काश्मीर व समरकन्द येथे आजपावेतो (हाफिजच्या काळापर्यंत) लिहिल्या गेलेल्या काव्यापेक्षा अधिक सरस आहे. असा अभिप्राय हाफिज कवीने व्यक्त केला आहे.

भेदाचा परिणाम

कालिदासाशी तुलना करून महाकवी हाफिज याच्या मनोभूमिकेत आत्मप्रौढीचा अंकुर कसा वावरत होता हे आपणाला दिसून येते. मोठ्या महाकवीला हा कलंक शोभत नाही असे आम्हाला वाटते. भारतातील संस्कृत व नव्य भारतीय भाषांतील अनेकानेक कवि-श्रेष्ठांत हा आत्मप्रौढीचा दुर्गुण मुळीच दिसून येत नाही. परंतु हा दुर्गुण ईराण देशाच्या मध्ययुगीन काव्यात मात्र बद्धमूल झालेला होता, हे सर्वत्र आढळून येते. फार्सी साहित्येतिहासाचे लेखक ई. जी. ब्राऊन याने या दोषाकडे बोट दाखविले आहे. मध्ययुगातील बहुतेक कवी ईराणात चालू असलेल्या परकी तुर्की राजांच्या दरबारांशी सम्बद्ध होते व म्हणून परकीय बादशाहाला खुश करण्याच्या हेतूने ही अनिष्ट प्रथा जोपासली. तिचे बी ईराणातून आलेल्या व भारतात साहित्यनिर्मिती करणाऱ्या कवीतही जोपासले गेले. भारत व ईराणमधील मध्ययुगीन फार्सी काव्यातील हा दोष प्रामुख्याने पुढे येतो.

फार्सीच्या दुधावर पोसल्या गेलेल्या दक्खिनी हिन्दी किंवा मध्ययुगीन उर्दू साहित्यावर या आत्मप्रौढी दुर्गुणाची काळीकुट्ट छाया पसरलेली आहे. या सगळ्या प्रश्नाची चर्चा आम्ही आमच्या इब्राहीम नामा ग्रंथाच्या भूमिकेत सविस्तरपणे केलेली आहे. (पृ. ९२ ते ९५). त्याच्या पुनरुच्चाराची गरज नाही. केवळ एक नमूना म्हणून वजही या कवीचा दुर्गंधयुक्त दर्पोक्तीचा थोडासा उल्लेख करून हे प्रारूड संपवू.

वजही हा चांगला साहित्यिक होता.' त्याचा सबरस हा गद्य ग्रंथ उर्दू शैलीच्या विकास समीक्षणाच्या दृष्टीने आजही महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचा लेखनकाल शक १५५७ (हिजरी १०४५) आहे. वजही आपल्या एकमेव कथाकाव्यात म्हणतो–

न निपजे न निपज्या हे गुन ग्यान में
सो तोती मुंज ऐसा हिन्दुस्तान में ॥
कि बातें या सुन कर मिरे ग्यान क्याँ
रह्या थक हो कमन्यां खुरासान क्याँ ॥
जिते शाअिराँ शाअिर हो आइंगे
सो मुंज ते तरज शिअर का पाइंगे ॥

भारतात, गुण व ज्ञान या क्षेत्रात, माझ्या तोडीचा शुक निपजलेला नाही आणि निपजणारही नाही. (तोती या शब्दाने वजहीला हाफिज व अमीर खुस्त्रो यांची आठवण करावयाची आहे की काय न कळे) माझ्या ज्ञानाच्या या गोष्टी ऐकून खुरासानमधील (समरकन्द ही खुरासनाची राजधानी होती) सगळ्या मैना थक्क होऊन राहिल्या आहेत. जेवढे म्हणून कविसाहित्यिक यापुढे निपजतील ते माझ्यापासून नवीन शैली प्राप्त करून घेतील. एवढेच म्हणूनच वजही थांबत नाही. तो पुढे म्हणतो–

अगरा गोते लक बर्स गौवास खाए
तो यक गोहर इस धात अमोलिक न पाए ॥
यो मोती नहीं वो जो गौवास पाएँ ।
यो मोती नहीं वो जो किस हात आएँ ॥

(समुद्रात बुडी मारून मोती काढणारा) गौवास जरी एक लाख वर्षे डुबक्या मारीत राहिला तरी, अशा

[पृष्ठ २४ वर]

ती जेवली नाही ?

महावीर जोंधळे

: १ :

हातातला कप खाली ठेवीत त्यानं मोलकरणीला विचारलं–

'ती जेवली ?'

'नाही.'

'का ?'

'तू नाही जेऊ घातलंस.'

'प्रयत्न केला !'

'तरीही ती जेवली नाही.'

'खरंच नाही.'

'खरं–खोटं मला नकोय्. मी वकील नाही. हे घर म्हणजे कोर्ट नाही आणि तू म्हणजे पिंजऱ्यातील साक्षीदार नाहीस.

ती गप्पच.

तो तिच्यावर खेकसतो.

अंगाची आग करून घेतो.

'ती जेवली नाही.'

'नाही'

'पण का ?'

'तुम्ही जेवण केल्याशिवाय तोंडात एक घासही घेण्याची तयारी नाही त्यांची.

'मी जेवल्याशिवाय ...'

'..................'

'दुसरं असं की...'

'सांगा सांगा.'

'त्या म्हणतात मला आज गुरुवारय्'

'गु...रु...वा...र'

पुन: मोठ्यानी हासतो तो. खूप खूप मोठ्यानं, त्याच्या हासण्याच्या आवाजानं ती दचकली. अन् त्याच्या खोलीजवळ आली.

'तुम्ही कऽऽवा आला'

तो काहीच बोलत नाही. तिच्याजवळ जातो. केसावरून हात फिरवतो. विजेचा झटका बसावा तसा तो हात केसातून बाहेर घेतो. क्षणभर दिवाणखान्याच्या छताकडे पहातो. झुंबरं...रंगीबेरंगी.

तो परत खाली बसतो. झुंबरं हालतात. झुंबरं बोलतात. झुंबरं गातात सुद्धा. त्याला राहवत नाही. तो तिला पुन: विचारतो.

'तू जेवली नाहीस ?'

'मी ! मी, ना खूप खूप जेवले.'

'खोटं,'

एकदमच ती ओरडते.

'नाहो, नाही मला किनई आज गुरुवार आहे !'

'कशासाठी ? कोणासाठी ??'

तिनं कसली तरी खूण केली. तो हसला आणि दुसऱ्या खोलीत निघून गेला.

: २ :

ती दिसते तर नक्षत्रासारखी. गोरीपान. बांधाही सुडौल आहे. पण ही अशी का ? बंगल्याच्या पायऱ्या उतरून ती खाली आल्यावर हाताची बोटं मोजून चिरकते काय ? पुन: शांत होते काय ? सारंच अजबय्, ही बोटं मोजताना आठच बोटं मोजते. दोन आंगठे सोडून देते. आठवड्याचे एवढे दिवस असताना ही गुरुवार का म्हणून करते. हिला दत्ताचं तर वेड नाही ना ? हां, हिला कुत्र्याचं फार वेड आहे. दारात बांधलेल्या कुत्र्याशी ती फार खेळते. ही बाई त्या कुत्र्याशी काय बोलते म्हणून ऐकावं म्हटलं तर ती कुत्र्याशी बोलत होती–

'पिंट्या ! बेटा, मी की नाही आज गुरुवार केलाय,' यावेळी साला कुत्राही शेपटी हालवीत असतो.

'पोट नाही भरलं तुझं'

कुत्रा लाळ गाळतो.

ती कुत्र्याला खेळवीत खेळवीत झोपी जाते.

: ३ :

ऑफिसच्या कामाच्या फाईल्स घेऊन तो भरा-भरा पायऱ्या उतरतो.

बुटांचा आवाज.
ड्रायव्हरची घाई.
पट्टेवाल्याची धडपड.
फाटक उघडल्याचा आवाज.

गाडीत बसताना त्यानं खिडकीकडं पाहिलं. ती कुत्र्याजवळ आराम खुर्चीवर झोपली होती आणि कुत्रा लाळ गाळीत होता तिच्या पायावर.

बंगला, पोपटी रंगाचा. भवती भवती अशोक वृक्ष आहेत. भलं मोठं तारेचं कुंपण आहे. समोरच चौपाळा बांधलेला. त्यावर बसलं की माणसं झुंबरा-सारखी डोलतात. इथल्या झाडांच्या पानाला सुगंधाचा वास येतो. इथलं पाणी खारंटय्. कारंजा आहे ना समोरचा त्यातलं पाणी निळसर आहे. ते कुत्रं आहे ना ते याच पाण्यात आंघोळ करतं. माणसाला वातावरण स्मशानासारखं पण कुत्र्यांना हे घर म्हणजे स्वर्ग आहे स्वर्ग. माणसं साचेबंद आहेत या बंगल्यातली. इन मिन-तीन. साली दगडं, माळ रानावरची. सेंदूर फासला की मंदिरात ठेवावीत अशी. नाही तरी देव सुद्धा दगडच असतो की.

'हा' घरमालक.
'ही' घरमालकीण.
अन् ही मोलकरीण

मोलकरणीपासून मालकिणीपर्यंत अन् नोकरा-पासून मालकापर्यंत सगळे–गोटे आहेत गोटे. गोदा-वरीतले.

: ४ :

हॉर्न वाजला. तशी ती दचकली धावतच गच्ची-वरून घरात गेली. बंगल्याच्या फाटकातून गाडी बंगल्यात आली. एक गोरापान माणूस खाली उतरतो. हा म्हणजे तो.

गोरापान, काटकुळा. गालावरचे कल्ले. हनुवटीला टेकलेले. डोळे लाल गुलमोहरासारखे.

तो भराभर पायऱ्या चढून वर येतो. पायातले बूट काढत–काढतच मोलकरणीला हाक. हॉर्न वाजलेला असतो तेव्हाच तिनं चहाचं आधन चढवलेलं असतं. हातातलं भेट आलेलं घड्याळ पहात. ती येते ती चहाच घेऊन. कसाबसा चहा पिऊन तो खिडकीकडे येतो. गजाशी चाळे करतो. इतक्यात वीज चमकते. ढग गड-गडतात. अंगावर बारीक काटा उभारतो. पोटात कळ येते. तो खिडकी बंद करतो. कोचावर बसत असतानाच

झुंबरं हालतात.
झुंबरं बोलतात.
झुंबरात ग्लास दिसतात.
झुंबरात ती दिसते.
तिचे केस दिसतात...

तो सुन्न होतो. जवळच असलेला टेपरेकॉर्डर सूर घेतो.

'दिये जलते हैं...'

: ५ :

ती माणसाला बघितलं की भीते. थरथरते. त्याला टाळता येईल तेवढं टाळते. ती हल्ली अशीच वागते. त्या दिवसापासून.

तो दिवस.

डांबरी रस्ता सुसरीसारखा मरगळून गेलेला होता. अंधाराची फिरती तबकडी फिरत होती. मस्तवाल

[पृष्ठ २६ वर]

[पृष्ठ २२ वरून]

प्रकारचे अमूल्य असे एकही मोत्ये त्याच्या हाती लागणार नाही. डुबक्या मारणाऱ्याला प्राप्त होणारे हे मौक्तिक नव्हे. हे मौक्तिक कोणाही गव्वासाच्या हाती लागणारे नव्हेत.

या चर्चेचे प्रयोजन असे की एखाद्या दुष्ट प्रथेला मोठ्या व्यक्तीचा आशीर्वाद मिळाला तर तिच्या प्रसाराला गती मिळते. कवींच्या आत्मप्रौढी व दर्पोक्तीच्या प्रथेला महाकवी हाफिज याने किंचित असा बीजरूपाने आश्रय दिला. त्यामुळे इतरेजन कवि-वर्गांस प्रोत्साहन मिळाले. सर्व ईराणभर ही प्रथा पसरली. किंवा सुरू झालेल्या अनिष्ट प्रथेला महाकवी हाफिजदेखील बळी पडला. कवींच्या दर्पोक्तीचे हेच लोण दक्खिनी हिन्दीच्या कविसाहित्यिकात दोनशे वर्षां-पूर्वीपर्यंत चालू होते. □ □

साहित्य अकादेमी आणि भारतातील बोलभाषा

त्रि. बा. प्रभुदेसाई

साहित्य अकादेमीने फेब्रुवारी १९७५ मध्ये कोकणी बोलीला 'भारताची एक स्वतंत्र वाङ्मयीन भाषा' (Independent Modern Literary Language) म्हणून मान्यता देण्याचा ठराव संमत केल्यामुळे तेव्हापासून महाराष्ट्रात ह्याचे अनेक पडसाद उमटत आहेत. मार्च १९७५ मध्ये उमरखेड येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या एकतीसाव्या संमेलनाने एका ठरावाद्वारे या मान्यतेबद्दल खेद व्यक्त करून अकादेमीला आपल्या कोकणीसंबंधीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याचीही विनंती केली आहे. प्रस्तुत संमेलनाचे उद्‌घाटन करताना सुप्रसिद्ध संशोधक डॉ वि. भि. कोलते यांनी असाही इशारा दिला की, मराठीतील प्रत्येक बोलीने स्वतंत्र झेंडा उभारून जर अशीच फुटून निघून वेगळे होण्याची मागणी केली तर मराठी भाषेची फार मोठी हानी होईल. तेव्हा, सर्वांच्या कुतूहलाचा विषय झालेल्या बोलभाषांना मान्यता देण्याच्या या प्रश्नाचे नेमके स्वरूप काय आहे त्याचा साधार प्रपंच या लेखात करण्याचा मानस आहे. अकादेमीची इतिवृत्ते हा मूलाधार आहे.

'साहित्य अकादेमी' ही भारत सरकारने १९५४ साली स्थापन केलेली एक स्वायत्त संस्था असून तिचे दुसरे नाव 'नॅशनल ॲकाडेमी ऑफ लेटर्स' असे आहे. अखिल भारतातील निरनिराळ्या भाषांतील साहित्यिक उपक्रमांचा समन्वय करणे, त्या साहित्याच्या वाढीला प्रोत्साहन देणे, उत्कृष्ट साहित्यकृतींना पारितोषिके देणे व या सर्व उपक्रमांच्या द्वारा भारताच्या सांस्कृतिक ऐक्याला हातभार लावणे ही उद्दिष्टे अकादेमीच्या निर्मितीमागे होती [The Government of India Resolution which set forth the constitution of the Akademi described it as, "a national organisation to work actively for the development of Indian letters and to set high literary standards, *to foster and coordinate literary activities in all the Indian languages and to promote through them all the cultural unity of the country*."]

अकादेमीच्या घटनेतील उद्दिष्टे स्पष्ट करणारा हा मूळ इंग्रजी उतारा येथे मुद्दामच उद्धृत केला आहे. भारतातील विविध भाषांमधील उत्कृष्ट साहित्याला प्रोत्साहन देणे हे अकादेमीचे मुख्य उद्दिष्ट दिसते. भारतातील असंख्य बोलींना 'स्वतंत्र भाषा' म्हणून मान्यता देऊन त्यांच्यामध्ये कलागत लावण्याच्या भानगडीत पडण्याचे अकादेमीला वास्तविक तसे काहीच कारण नव्हते. मूळ घटनेत तसा उल्लेखही आढळत नाही. तरीपण, अकादेमी ही एक स्वायत्त संस्था असल्याने तिला आपल्या घटनेत वारंवार बदल करण्याचा अधिकार आहेच म्हणा. या संस्थेचे एकंदर धोरण व कार्यक्रमाची मूलतत्त्वे निश्चित करण्याची कामगिरी परिषदेने (General Council) पार पाडल्यावर ते सर्व प्रत्यक्ष अमलात आणण्याची जबाबदारी कार्यकारिणीवर (Executive Board) असते. प्रत्येक भाषेसाठी सल्लागार मंडळेही (Advisory Boards) नेमली जातात.

अकादेमीचे सुरुवातीचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू हे होते. मे १९६४ मध्ये पंडितजींच्या निधनानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे तिचे अध्यक्ष झाले आणि फेब्रुवारी १९६८ मध्ये डॉ. झकीर हुसेन यांनी अध्यक्षपद भूषविले. त्यानंतर मे १९६९ पासून डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांच्याकडे जी अध्यक्षपदाची सूत्रे आली ती त्यांनी अद्यापही आपल्या हातात घट्ट पकडून ठेवली आहेत! त्यांच्याविषयी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकांनी लिहिले आहे, "श्री. सुनीतिकुमार चटर्जी हे या अकादेमीचे अध्यक्ष असून ते अनेक भाषाकोविद आहेत. परंतु ते कमालीचे वृद्ध झाले असल्यामुळे त्यांनी अकादमीला योग्य रीतीने मार्गदर्शन केले असेल असे म्हणवत नाही. शिवाय अपंग, विकलांग होऊनही अधिकाराच्या वा मानाच्या जागा सोडावयाच्या

नाहीत, हा आपला बाणा असल्यामुळे सुनीतिकुमार चतर्जीही त्यास अपवाद नाहीत."

६. 'गोमन्तक'चे संपादक श्री. माधव गडकरी यांचे प्रत्यक्ष अनुभवाचे बोल काय आहेत पाहा :– "श्री. चटर्जी इतके पक्षपातीपणे वागले की गोमंतक मराठी भाषा परिषदेच्या शिष्टमंडळास भेटण्यासही ते आधी तयार नव्हते. कोकणीसाठी अनेक शिष्टमंडळे आली आहेत, अशीच भाषा त्यांनी टेलिफोनवर केली. मराठीची बाजूच साहित्य अकादमीच्या या कमिटधांत येणार नाही, अशी त्यांनी व्यवस्था केली. श्री. चटर्जी हे ८४ वर्षांचे म्हातारे गृहस्थ थोर भाषाशास्त्रज्ञ असतील, परंतु सारासार विचार, लोकशाही वागणूक, न्याय वगैरे गोष्टींबाबत त्यांच्यात थोडाही काटेकोरपणा उरलेला नाही. भाबडेपणाने त्यांनी कोकणीची तळी... उचलून धरली. साहित्य अकादेमी म्हणजे साऱ्या लेखकांचा मानबिंदू; परंतु तिचा अध्यक्ष...दुसऱ्याच्या मतांकडे असा दुर्लक्ष करतो याचे जे चित्र पाहिले, ते अकादेमीबद्दलच्या सर्व आदराच्या भावना नष्ट करणारे आहे." [साहित्य अकादेमीने 'कोकणीला' स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता देण्याआधी 'गोमंतक मराठी भाषा परिषदे'चे जे एक शिष्टमंडळ दिल्लीला गेले होते त्यात श्री. माधव गडकरी यांचा समावेश होता आणि प्रश्नाची भाषाशास्त्रीय बाजू मांडण्याची कामगिरी डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्याकडे होती]

भारतीय घटनेत समाविष्ट असलेल्या १५ भाषांच्या जोडीला बोलभाषांनाही 'स्वतंत्र भाषा' म्हणून मान्यता देण्याची प्रथा अकादेमीने १९६६ साला-पासून सुरू केलेली दिसते. या प्रक्रियेला अनुसरून आतापर्यंत मैथिली (१९६६), डोगरी (१९७०), मणिपुरी, राजस्थानी, नेपाळी आणि कोकणी या बोल-भाषांना व इंग्रजीलाही अकादेमीने 'स्वतंत्र भाषा' (independent modern literary language) म्हणून मान्यता दिली' आहे. ही मान्यता देण्यासाठी अकादेमीने स्वतःच तयार केलेले पाच निकष पुढील-प्रमाणे आहेत–

1. Whether structurally a language is an independent language or is a part of a system of a given language.

2. Whether it has had a continuous literary tradition and history.

3. Whether a sufficiently large number of people use it today as a vehicle of literary and cultural expression.

4. Wherher it is recognized by the state concernd and/or by some Universities.

[पृष्ठ २४ वरून]

प्रासादात रंगबेरंगी प्रकाश. शपथा, आणा, भाका. शपथेचा राग, पेकाटात लाथ, गचांडी. बोलण्यात वेग, कणाकणात व्हिस्कीची जाग. एक आर्त किंकाळी. धडपड तडफड.

इवलिशी ती.
रसातळाला जाते.
वर उरतो फक्त फेस.
व्हिस्कीच्या ग्लासातला.
आणि खाली सांडलेला असतो गर्भ,

कोवळा लुसलुसीत आवाज. ग्लासात अडकलेले दोन्ही हात...

तुझ्या वासनेच्या समुद्राला लाव आग,

अंधाराची तवकडी फिरतच राहाते. वाकडी तिकडी.

: ६

नेहमीसारखंच ती धावत, धापा टाकीत पिंट्याजवळ आली, तिनं हाताची बोटं मोजली. अन् ती ओरडली. अन् तशीच खुर्चीत बसली पिंट्याशी खेळू लागली. त्याला गोंजारू लागली. गोंजारता गोंजारता ती झोपी गेली. आणि थोड्याच वेळात ती एकदम ओरडतच उठली, 'नको रे, साऱ्या स्त्री जातीची शपथ आहे तुला.

कुत्र्यानं फक्त शेपटीच हालवली यावेळी.

□ □

as a medium of instruction and/or as a separate subject of study.

5. The number of people using the speech, the current literature that is being produced in it (fiction, essays, other literature, journals etc.) should also be considered.

या सर्व निकषांच्या कसोटीवर भोजपुरी, नेपाळी व कोकणी या बोलभाषा उतरतात व खासी तेवढी उतरत नाही, अशा प्रकारचा निर्णय डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पाच भाषाशास्त्रज्ञांच्या समितीने दिला होता. दि. २०-१२-१९७३ रोजीच्या या बैठकीत अध्यक्षांव्यतिरिक्त डॉ. टी. पी. मीनाक्षीसुंदरन व डॉ पी. बी. पंडित हे भाषाशास्त्रज्ञ उपस्थित होते. डॉ. बाबू राम सक्सेना व डॉ. ए. एम. घाटगे हे उपस्थित नव्हते. या समितीसमोर डॉ. उदय नारायण तिवारींनी भोजपुरीची, डॉ. पारसमणी प्रधानांनी नेपाळीची व डॉ. जॅक द सिकैरा यांनी कोकणीची बाजू मांडली (यांपैकी डॉ. सिकैरा हे 'डॉक्टर' आहेत ते औषधांचे, भाषेचे मुळीच नव्हेत! सिकैरांच्या 'डॉक्टर' उपाधीचा उपयोग अध्यक्षांनी अकादेमीच्या सदस्यांची फसवणूक करण्यासाठी तर केला नाही ना? श्वा, युवा आणि मघवा यांना एकाच पंक्तीला बसवण्याचा हा प्रकार बाकी वैयाकरणांना शोभूनच दिसतो म्हणा!)

डॉ. ए. एम. घाटगे (पुणे येथील डेक्कन कॉलेज संशोधन संस्थेचे संचालक) हे बैठकीला उपस्थित नसले तरी त्यांनी आपला लेखी अभिप्राय अकादेमीला कळविला होता तो असा—

"Konkani may be recognised for non-administrative purposes." याच डॉ. घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या '*A Suruey of Marathi Dialects*' या मालिकेत अनेक कोकणी बोलींचे अभ्यास प्रकाशित झाले आहेत. यांपैकी Konkani of South Kanara या ग्रंथाच्या Introduction मधील डॉ. घाटगे यांचे पहिले वाक्य पाहा:—"*By the name konkani is meant a number of Marathi dialects* which are spoken along the west coast of Maharashtra, Goa and parts of Mysore, with small pockets reaching the west of kerala," एकाच विद्वानाच्या या एकाच बोलीविषयीच्या दोन विधानांमध्ये थोडी तरी सुसंगती आढळते काय? जी गोष्ट डॉ. घाटगे यांची तीच विसंगती डॉ. चटर्जी यांच्या कोकणीसंबंधीच्या विधानात देखील आढळते. स्वतंत्र भाषा म्हणून कोकणीला आता मान्यता देणारे विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. सु चाटुर्ज्या (चट्टोपाध्याय) हे आपल्या '**भारत की भाषाएँ और भाषासंबंधी समस्याएँ**' या पुस्तकात काय लिहितात पाहा:—"मराठी दक्षिणकी प्रमुख आर्यभाषा है। इसका उच्च श्रेणी का साहित्य है। कोंकणी भाषा इससे सम्बन्धित है, अंशतः इसे मराठी उपभाषा कहा जा सकता है। गोवा के देशी रोमन-काथलिक ईसाइयों में रोमन अक्षरों में कोंकणी में साहित्य तैयार हो गया है। लेकिन कोंकणी को मराठी की प्रतिस्पर्धी साहित्यिक भाषा के रूप में खडा करने की चेष्टा उतनी सफल नहीं हुई है। इसका प्रधान कारण है, बोल-चालकी कोंकणी में पांच-छै रूपभेद पाये जाते है।" (द्वितीय संस्करण, इलाहाबाद १९५७ पृ. ७०).

प्रस्तुत उताऱ्यात डॉ. चटर्जी यांनी कोकणीचे पाच-सहा प्रकार असून ती 'मराठी'ची एक 'उपभाषा' असल्याचे स्पष्टच विधान केले आहे. तर मग त्यांनी 'स्वतंत्र भाषा' म्हणून मान्यता दिली ती कोणत्या कोकणीला?

वास्तविक 'कोकणी' नावाची कोणतीही एकच मुख्य बोली नसून भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील कोकणपट्टीत ज्या अनेक बोली आहेत, त्यांना 'कोकणी बोली' असे समुदायवाचक नाव आहे. उत्तरेकडे वसईपासून दक्षिणेकडे कोचीनपर्यंत पसरलेल्या या कोकणातील सर्वच बोलींचे सर्वसामान्य स्वरूप एकसारखे नसून त्यांच्यांत अनेक 'स्थलभेद' व 'स्तरभेद'ही आढळतात. उत्तर कोकणी, राजापुरी, मालवणी, गोमंतकी, कारवारी, मंगळुरी हे 'स्थानिक भेद' किंवा 'देशिक भेद' तर अगदी ठळक स्वरूपाचे आहेत. संरचनात्मक भाषाविज्ञानाच्या (Structural Linguistics) दृष्टीने या प्रमुख 'कोकणी बोली'चा सर्वांगीण अभ्यास अद्याप व्हावयाचा आहे. अशी परिस्थिती असताना अकादेमीने 'स्वतंत्र भाषा' म्हणून मान्यता देण्याची घाई करावी यात राजकारणाने भाषाविज्ञानावर कुरघोडी केली असेच म्हणावे लागते.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांचे प्रतिनिधित्व करणारे प्रा. वसंत बापट, श्री. रणजित देसाई, डॉ. रा. शं. वाळिंबे, श्री. पु. ल. देशपांडे व डॉ. स. गं. मालशे हे नामांकित साहित्यिक अकादेमीचे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे कोकणी बोलभाषेशी संबंधित असे महाराष्ट्र राज्य आहे. या सर्वांनी कोकणीला मान्यता देण्या न देण्याच्या संदर्भात आपली मते लेखी स्वरूपात अकादेमीला वेळीच कळविण्याची दक्षता घेतली होती काय? कर्नाटक (म्हैसूर) राज्याने आपला अभिप्राय वेळेवर कळविल्याचा निर्देश अकादेमीच्या दप्तरात आढळतो; पण महाराष्ट्राचा उल्लेख नाही. वेळीच सावधगिरी न बाळगता मागाहून हाकाटी करून काय उपयोग?

भाषाशास्त्रज्ञांच्या समितीने नेपाळी, भोजपुरी व कोकणी या बोलभाषांना मान्यता देण्याची शिफारस केली होती खरी. पण अकादेमीच्या कार्यकारी मंडळात (Executive Board) मतदान होऊन कोकणीला तेवढी मान्यता दिली जाते व भोजपुरीला मात्र विरोध होऊन तिला मान्यता मिळत नाही. नेपाळीला विशिष्ट राजकीय कारणासाठी मान्यता दिली जाते ती भारत सरकार व पश्चिम बंगालचे सरकार यांच्या खास आग्रहावरूनच. हा सगळाच मामला मोठा अजब वाटतो!

अकादेमीने मान्यता दिलेल्या भाषांची संख्या एकसारखी वाढत असताना सरकारी अनुदानात मात्र त्याप्रमाणात भर पडलेली दिसत नाही. वर सांगितलेल्या २२ भाषांच्या जोडीला पाली, तिबेटी इत्यादी भाषांतील ग्रंथनिर्मितीलाही सक्रिय हातभार लावीत असते. मान्यताप्राप्त भाषांची ही चढती भाजणी लक्षात घेऊन अकादेमीसमोर एक वास्तववादी प्रस्ताव मांडण्यात आला होता तो असा :—

"The problem of recognition of languages by the Sahitya Akademi is both academic and practical. The academic aspect is comparatively simple. If a language is admitted by experts to be a separate and independant linguistic entity, it is an academic opinion to be respected. But whether such recognition must necessarily lead to its inclusion in the limited list of major languages, in which the Akademi's programme, relating to translations, publications, Awards etc. is regularly implemented is a practical matter, which has not only to depend largely on the availability of resources, but has to be examined with caution for it has a definite impact on curbing the programme in other languages, financial resources remaining the same."

सरकारने आपले अनुदान न वाढविल्यामुळे अकादेमीला आपल्या नेहमीच्या अत्यावश्यक अशा अनेक योजना पैशाच्या अभावी स्थगित ठेवाव्या लागल्या, वर्षोनवर्षे विविध भाषांच्या सल्लागार मंडळाच्या बैठका घेणेही शक्य झाले नाही, या सगळ्या सदस्यांचे भत्ते व मानधन देणेही अशक्य झाले अशा प्रकारच्या रास्त तक्रारी करून अकादेमीच्या आर्थिक सल्लागाराने (Financial Adviser) आर्थिक स्थितीत सुधारणा होईतो नवीन भाषांना मान्यता अजिबात देऊ नये अशी वारंवार कळकळीची विनंती केल्याचे निर्देश आढळतात. पण वास्तवाकडे पाठ फिरवून व विकारांनी विवेकावर मात करून नवीन भाषांची खोगीरभरती करण्याचा सपाटाच अकादमीने अखंड चालू ठेवलेला दिसतो! अकादेमीचा राजकीय आखाडा झाला आहे तो असा.

अकादमीचे एक मान्यवर सदस्य श्री. एम. राजन यांनी यावतीत आणखी एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले आहे ते असे:—

"The unfortunate fact that language enthusiasm often turns out to be a first step to territorial chauvanism and the fillip given to any language outside the list of languages given in the Constitution causes a set-back to the emotional integration and consolidation of the country. Recognition of a language is not confined to literary or academic aspects, but has political implications that may have far reaching effects.

Yet another difficulty in implementing some of Sahitya Akadami's programmes in the newly recognized languages has been the non-availability of sufficient number of writers and critics. It requires

about eighty to hundred writers and critics of standing in a language to operate the various stages of the Awards procedure."

मराठी भाषा व कोकणी बोली यांच्या परस्पर-संबंधाचा भाषाशास्त्रीय दृष्टया सूक्ष्म विचार आतापर्यंत अनेक विद्वानांनी केला आहे. डॉ. सु. मं. कत्रे यांचा 'द फॉर्मेशन ऑफ कोकणी' हा इंग्रजी भाषेतील प्रबंध, डॉ. ना. गो. कालेलकर यांची 'भाषा आणि संस्कृती' व 'भाषा, इतिहास आणि भूगोल' ही पुस्तके, प्रा. अ. का. प्रियोळकर यांचा 'ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली' हा कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेतील सहा व्याख्यानांवर आधारलेला ग्रंथ हे या संदर्भात उल्लेखनीय आहेत. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्या 'सतराव्या शतकातील गोमंतकी बोली' या प्रबंधातही "गोमंतकी बोलीचा ग्रांथिक मराठीशी असलेला संबंध" साधार व तपशीलवार पद्धतीने स्पष्ट करण्यात आलेला आहे. वर्णनात्मक (synchroni) भाषाशास्त्रीय विचाराच्या जोडीला ऐतिहासिक (diac-chronic) परामर्शही महत्त्वाचा ठरतो, याबदल आधुनिक भाषावैज्ञानिकांमध्येही दुमत असण्याचे कारण नाही.

अकादेमीने स्वतःच अपेक्षिल्यानुसार या नव-मान्यताप्राप्त कोकणी वगैरे स्वतंत्र भाषांमध्ये शंभर तरी दर्जेदार साहित्यिक व समीक्षक आहेत काय? या भाषांना विद्यापीठांनी माध्यम म्हणून स्वीकारले आहे काय? असे अनेक सवाल उपस्थित करता येतील की ज्यांची उत्तरे देताना संबंधितांना नन्नाच्या पाढ्याचा आश्रय घ्यावा लागेल. भाषाभाषांमध्ये सामंजस्य निर्माण करणे, त्यांच्यातील परस्पर देवाण-घेवाणीला हातभार लावणे, सांस्कृतिक व भावनिक ऐक्य घडवून आणणे इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी म्हणून साहित्य अकादेमीची स्थापना करण्यात आली होती. पण ज्या बोलभाषांविषयी भाषाशास्त्रज्ञांमध्ये तीव्र मतभेद आहेत, अनेक मान्यवर साहित्यिकांचा व संबंधित राज्यांचा विरोध आहे त्यांना केवळ बहुमताच्या जोरावर 'स्वतंत्र भाषा' म्हणून मान्यता देऊन अकादेमीने आपल्या मूळ भावनिक ऐक्याच्या उद्दिष्टाला हरताळच फासला नाही काय? साऱ्या लेखकांचा मानबिंदू असलेल्या अकादेमीने आत्मपरीक्षण करण्याची वेळ निश्चितच येऊन ठेपलेली आहे.

□ □

सूचना

- 'युगवाणी'चा प्रत्येक अंक टपाल-कार्यालयाचे प्रमाणपत्र घेऊन पाठविला जातो. तरी अंक न मिळाल्यास आमच्याकडे पत्र पाठविण्यापूर्वी कृपया, आपल्या टपाल-कार्यालयात चौकशी करावी.

  अंक शिल्लक असल्यासच पुन्हा पाठविता येईल.

- बरेचदा अपुऱ्या वा चुकीच्या पत्त्यामुळे अंक गहाळ झालेले दिसतात. तरी संबंधित व्यक्तींनी आपापले योग्य पत्ते 'सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीतावर्डी, नागपूर ४४००१२' या पत्त्यावर पत्र पाठवून कळविण्याची कृपा करावी.

॥ क वि ता ॥

साद . . . सुशीला पाटील

एकलव्या ... !
पूजितोस तू –
त्या पाषाणी द्रोणास
चिन्मय समजून,
नत होतोस
त्या मूर्त धनुर्वेदासमोर !
बोलतं करतोस तू . . .
त्या अवाच्या शिलाखंडालाही –
आपल्या अंगीच्या अपार श्रद्धाशक्तीनं !
अन् झेपावू बघतोस गगनावेरी
पोखरलेल्या या दगडी पायवाटेनं !
गाठू पाहतोस पैलतीर –
ह्या स–छिद्र नावेच्या आधारानं !
एकलव्या ! !

एकलव्या . . . !
गुरूला अवांछित अशा कृपाछत्रावाचून
साकार होतो –
तुझा एकाग्र ध्यास –
केवळ जिद्दीतून . . . !
अद्वितीयी तू . . .
गोंदवितोस स्वतःला आत्मगुरू म्हणून . . .
महाभारत प्राङ्गणी
पाषाण मात्र निमित्त करून . . . !
पण हवाय ना
तुलाही तो पाषाणगुरूच . . .
एकलव्या ! !

एकलव्या . . . !
आपल्या आराध्याला
अवचित समोर पाहून
हरखतोस तू . . .
दृष्टिपथ आंथरून
सर्वांग–स्वागताच्या पताका उभारून . . . !
फुलारत जातोस सबंध पाकळ्यांनिशी . . . !
सिद्ध होतोस
त्याच्या आतिथ्यासाठी सर्वस्व वेचून–
परिपूर्ण उदारतेचं–
माती हाती घेऊन
एकलव्या ! !
पण . . . पण . . .

एकलव्या !
शिष्यत्व पायदळी तुडवून
अन् सूडाची चूळ भरून
क्रूरता शिरी बांधून
याचना होते गुरुदक्षिणेची–
तुझ्या उज्ज्वल–ऊर्जित–उजव्या अंगठ्याची !

धनुर्वेदाचा मूलाधारच–
निपटून काढणारी आसुरी ईर्ष्या
खदखवते. . . !
एकट्या अर्जुनाच्या–
भक्कम यशस्वितेसाठी–!
गुरूच्या एकमेव
साक्षात् शिष्यासाठी
एकलव्या ! !

एकलव्या–!
तूही 'सोलीव दान' बनून
सजगतेनं गुरूचं ईप्सित
पुरवतोस. . . !
'तथास्तु' म्हणतोस–
मुकाट वेडेपणानं !
पणं का ?
स्वत्वाचं हे व्यर्थ समर्पण का ?
त्या पाषाणी मूर्तीच्या प्राणासाठी ?
गुरुसाठी. . . ?
शिष्यत्व आचवून
पंगुत्वाचं दान करणारं हे गुरुत्व !
पूज्यातून स्रवणारं. . .
पार्थिव भेद–अभेद चक्र !
मंत्राविनाच–
गुरुदक्षिणेचा हा अशिष्ट स्वीकार. . .
दिव्यत्वालाही काळोखी फासणारं–
अधमत्व. . . हे गुरुत्व ?
संकुचित ममतेच्या पिंजऱ्यात–
स्वतःला कोंडून उजळलेलं हे शत्रुत्व !
गुरुचक्षूंनाही तेजस्विता लाभावी–
अशी तुझी कुशलता. . . ! !
म्हणून तर नव्हती ना–
ही पाशवी याचना
तुझ्या आत्मकेंद्री गुरूची. . . ?
एकलव्या ! !

एकलव्या !
श्रद्धेच्या भावपुष्पांनी–
वाहवलीस तू अमृतमय यत्नगंगा–
महाकाय पर्वतराशीतून–
ओबडधोबड पाषाणशिल्पातून–!
पण प्राशिली गेली ती गंगा–
विषदग्ध गुरुदक्षिणेनं !
बगडांच्या फुलांनी–
वाहवलेत पाट तुझ्या करुणेचे !
अन् तू मात्र त्यागलंयस सर्वस्व
अर्जितालाही सहजी डावलून. . . !
आदर्शाची पूजा बांधलीस
तू जन्मजन्मांतरी–
पण
अखेर आदर्शच त्यालंय् असलं क्षुद्रत्व
पाषाणशिल्पाच्या–
अशा जिवंत मृतास–
आपलं सारं कौशल्य
प्रदान करून. . .
हरवलास तू. . .
भारताच्या या किर्रऽऽऽ रानात !
एका भळभळत्या वेदनेला–
अखंड जागतं ठेवून. . . !
आमचीही हृदयपटलं–
कायमची विदीर्ण करून. . .
एकलव्या ! ! ! !

* *

सुगी : मधुकर वाकोडे

कर्पूरस्पर्शीत स्वप्नारती रचतांना
वितळत गेलेली श्वासरेखा आभाळभर,
आषाढवर्खीत मृद्गंध प्यालेली.

गर्भजडित दिशांचे उसवलेले शारदीय टाके न्याहाळतांना
तुझी व्ययालये वेष्टीत गेली,
क्षितिज अनंतपार.

आभाळभेरीवर भलरी गातांना
चांदण्यांचे सुकलेले कमलकंठ, आणि. . .
पाठीपोटी अंधार सावरीत,
तूं मात्र सुगीच्या जाणीवेत क्षणभर.

* *

आपला वर्ग : सुधाकर म्हाळणकर

टाके तू उसवू नकोस कापड हवे फाडून घे
पाणवठ्यावर चुंबळ विसर घागर मात्र भरून घे.

पुस्तक सारे वाचू नकोस तुला अन्वय लागणार नाही
दुनिया सारी चतुर शाळा आपला वर्ग शोधून घे.

भलेबुरे काम कर, झडतीच्या वेळी सारे कबूल कर
बोटावर थुंकी लावण्याआधी आपली नखे कापून घे.

सूर्याला चंद्राला तारण ठेवून या मातीवर प्रेम कर
वाघसिंहाच्या तावडीत सापड, माणूस मात्र पाळून घे.

जगात स्वतःला विकण्याआधी आपला भाव विचारून घे
माडी बांध किंवा बांधू नकोस, जमिन मात्र नांगरून घे.

* *

माझे डोळे हरविले : धर्मराजा निमसरकार

माझे डोळे हरविले
तो ऋतु कोणता होता बरे !
मी एकदाच
डोळ्यांना ठेवले होते सावरून
कड्यावरून कोसळून पडलेले
सगळे पक्षी मी अुचलून ठेवले होते
येवढंच आठविते मला !
भुयारातन् सळसळत धावून गेला
वारा तेवढंच जाणवलं
होतय् मला–
आता हा उध्वस्त प्रदेश
येथे कसा उभा राहिला
अंधार सांडतोय क्षणाक्षणाला
तो निमूटपणे साचतो–
ह्या डोहात उन्मळून पडतात
समुद्रपक्षी ते कुठे जातात–
समुद्रपक्षाचे डोळे
मी माझ्या ग्रंथालयाला लावले नव्हते
सगळे ग्रंथालय राख झाले
ही राख चिमूटभर सुद्धा
सापडली नाही
सगळेच कसे
माझ्या हरविलेल्या डोळ्यासारखे–

* *

राखण : डब्ल्यु. कपूर

आग झोकून तृप्तलेली सूर्यफुले
सावल्यांचे भग्न लेणे विद्रोहलेले
ओंजळीतील गंधही पंखाळलेला
श्रांत आता भंगलेली राऊळें

सर्व जुनी नातीं कालच तोडली
अंधार–हाडें नि नभाला टांगली
आजची ही सूर्यपुजा संपतांना
दो दिशांची लांब यात्रा 'भाग'लेली

पुनश्च पिंजऱ्याने गांधार छेडलेले
कवडशांचे शिल्प पायीं विखुरलेले
रुजलेला अग्नीगोळा येथे उद्याचा
राखणीला स्वैर मी एक कुत्रे सोडले

* *

थिट्यावरच्या सावलीला शोधीत

चित्रसेन शबाब

अवकाश हातांनी विकलेली फुले डोळ्यात चमकून
डबडबला सागर पापणीभर पाणवठ्यावर
ओसाड गावचा वड ओघळला थिट्यावर, आणि
अनंत हातांनी वेचीत राघुमैनेची आरक्त फळं
पारावर उसळली मध्यान्ह; जिथें दोघीही थांबल्या होत्या
ओढ्यावर येतांना कुजबुजत...
लाटावर हिंदखळणारी एक वाट पिंजून फेकून दिलीस–
आणि मलासुद्धा दुसऱ्याच महिन्यात
मळमळून उलटी झाली...
फळांची खूप इच्छा होतेय,
ओटीभर फुलांनी माझाही गांव गंधाळलाय; आता ये–
ये, ह्या वाटेला सांगून ठेवतेय–
थिट्यावरच्या सावलीला शोधीत मृगासक्त डोळ्यात....

* *

मनस्विनी : मीनल केळकर

तुझा विरह,
तुझी व्याकुळता,
नको वर्णूस इतकी.
तुझ्या डोळ्यात
ती वाचता येतेय् मला.
" हा क्षण, हे सुख,
अशा उसळत्या आनंद उर्मी "
का बोलतोस इतकं खळखळ ?
स्पर्शात काहीच का जाणवत नाही ?
रागावलास बघ चटकन्
कसं सांगू तुला ?
तुझी मनस्विनी
नुसत्या शब्दांच्या झालरींना
भुलायची नाही कधी.

* *

सूर्य नावाचा माणूस : नयना एस. गुरव

एक माणूस माझ्या स्वप्नात आला;
अवचित मध्यरात्री.
त्याच्या डोळ्यांना स्वप्नांचे व्रण होते,
त्याचे हात,
कोपरापासून कलम करण्यात आले होते.
आणि पावलांना,
पोलादाची चाके चिकटवलेली—
एक माणूस माझ्या स्वप्नात आला,
दिशाहीन काळोखाचे गाणे गात.
त्याला, झुलणाऱ्या आकाशाचा आशीर्वाद हवा होता.
तो म्हणाला—मी, एका अज्ञात देशाचा रहिवाशी आहे.
माझ्या स्वप्नांना कधी न संपणाऱ्या
चकव्याचा शाप आहे.
मी तुझ्यातूनच नव्हे, तर इथल्या साऱ्या माणसांच्या
हृदयात उमलत होतो.
कधी काळी...
आता इतकेच कर
माझ्या चकव्याचा शाप आपण वाटून घेऊ.
स्वप्नाच्या पंखांनी अज्ञातात
झुगारून देऊ.
एक माणूस माझ्या स्वप्नात आला
अवचित मध्यरात्री;
आणि म्हणाला—
तुला स्वयंप्रकाशी होता येईल.
खरेच...मी सूर्य आहे.

* *

दान : अशोक लोखंडे

तू पाखडत असतेस
सुपात घेतलेला जोंधळा
तेव्हा......तुझ्याभंवती
भुकेनं वखवखलेला
तुझ्याच लेकराचा गोतावळा
आई ऽऽ गं आई ऽऽ
भूक लागली...भाकर दे !
म्हणून रडत असतो
काढून गळा...
कुठून तरी त्याचवेळी
गहिऱ्या काळ्या रंगाचा...
लालबुंद डोळ्यांचा...
एक येतो डोमकावळा...
तुझ्या चंद्रमौळी घराच्या
आड्यावर...कांव कांव करीत
तुझी वरती जाते करडी नजर
अन फेकतेस जवळचा खडा वर
चल हट मेल्या जा दूर
म्हणून ओरडतेस आभाळभर
तुझं मन चुकचुकते
पुढच्या अनिष्टासाठी..
जोंधळ्यातला कोंडा जसा
पडतो सुपाबाहेर
तसा...तुझ्या पोटातील
आठ महिन्याचा गर्भ...देतो आठवण
आता तीस आणिख नव दिवस

उणपुरे राहिलेत शिल्लक
त्याचवेळेस चांचपडत अडखळत
एक आंधळा...' देवोऽमाय '
' आंधळयाला कोरभर कुटका 'चे
शब्दं ललकारीत येता पुढयात
तुझ्या काळजाला ते रुततात शब्द
नकळत तुझे हात...
सुपातल्या जोंधळयात स्थिरावतात
मुठभर दाणे वाटीत त्याच्या...
टाकून निमूटपणे धन्य होतात
सुपात राहिलेल्या जोंधळयांत
तुझ्या लेकरांची भूक शमणार नाही
ह्याची तुला जाणीव असूनही
तुझे आंतडे तुटते दानासाठी...
आंतील चक्राकार फिरणाऱ्या...
आशीर्वादाने पावन होऊन जन्मा येणाऱ्या
नव्या जीवनासाठी...तृप्ती घेऊन.

* *

समजूत मात्र हिरवी : अशोक सोनवणे

अंधाराला कसमसून कवटाळावं
काळंजर्द काजळगर्द रक्त ठिबकेस्तो—
रक्ताला समजावा
आपसूकच प्राक्तनभर अंधारथेंब टपकेस्तो.
त्यानंतर वाटांना वाट द्यावी आणि
जमलीच तर नजरेला नजर आपणच आपल्या.
घरटी डोक्यावर घेत जावी आणि
शक्य होईस्तो पंजांची सारी पिसं निळाईत भिर्कावीत
आपणहून.
अस्तु.
तेजोगोलानं खदखदून घ्यावं विराटकाय सार्वभौम
तांबडलाल होईस्तो—
बर्फाला पाझरणं विघंळणं हेच यथाक्रम—
नंतरही बाष्पाधीन जाईस्तो.
त्यानंतर स्थित्यंतरं होत जातील आणि
होत जातील एक एक गात्र गहाळ. पायरीपरत्वे.
मुखावर मुखेनेंव बहिर्गोल काच पेलीत जावी आणि
अंधुक होईस्तो दुःखांच्या साऱ्या प्रांतभर पसरीत जावे.
दुधी काचाच्छादनं.
स्वतःला उधळून देत जावं—क्षणभर;
पालटून बदलून घेत जावं आणखीनच आपल्याला.
अधूनमधून.
आपणच आपली कळी खिलवून घ्यावी, घ्यावी फुलवून.
आपणच आपला सुगंध लुटून घ्यावा, घ्यावा लुचून.
कोणी नको ना फुलारोत—पिसारोत; शेत तसे निझूरच
समजूत मात्र हिरवी करून घ्यावी. बांधिलकीतली !!

* *

कर्तव्याचा दीप : बबन सराडकर

कर्तव्याचा दीप करोनी अंधूक
विलासाची भीक मागू नको
अज्ञान काजळी टाक झटकून
श्रद्धा जागवून अंतरात
होवूनिया दीप मग प्रज्वलित
स्पष्ट होते वाट कल्याणाची
आणि गुप्त होते विनाशाचे काटे
संशयाचे फाटे फुटूनिया
जीवनाची वेल अंती बहरते
आत्मसुख देते पुण्य—फुले.

थवा : हेमंत उजगरे

पाण्यावरून विरळ लाटांचा थवा असा
संथ वहात आला अन् मी शहारलो.
समोरच्याच उत्तरणीवर विसावला तसा
पायथ्याचा दगड ओलावला अन् मी सुखावलो.
एक थवा शवांचा असाच वहात आला
शेजारच्याच खडकावर कवर पाहून मी थरारलो.

* *

□ □

अनुभव, अनुभूती व अभिव्यक्ती

प्रभावती हातवळणे

हे " तिन्ही " एकवटले
तेथ शब्दब्रह्म कवळले
ते मियां गुरुकृपा नमिले
आदिबीज

मानवाचे संपूर्ण जीवन तर्कानुभव, कर्मानुभूती व कलाभिव्यक्ती या तीन शब्दांत सामावले आहे. अनुभव आणि अनुभूती विविध प्रकारची असू शकते. अनुभव भावनात्मक असेल किंवा बौद्धिक असेल, स्थूल असेल किंवा सूक्ष्म असेल, साकल्यस्वरूप असेल किंवा पृथकात्मक असेल. या अनुभवाची अभिव्यक्ती हे मानवाचे वैशिष्टय आहे. ही अभिव्यक्ती शाब्दिक असेल किंवा अशाब्दिक असेल. कर्मकलाप, संस्कारविधी व कला या अशाब्दिक माध्यमाद्वारेही माणूस काहीतरी व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. आधी अनुभव व नंतर अनुभवाची अभिव्यक्ती असा क्रम लावल्यास तो विपर्यस्त होईल. शब्दयुक्त किंवा अन्य माध्यमाद्वारे माणसाचा अनुभव आकार धरीत असतो. माणसाचा मेंदू हा केवळ संदेशवाहक नाही तर अनुभवाचे रूपांतरण सांकेतिकरीत्या करणारा परिवर्तकही आहे.[1] म्हणजे असे की अनुभव घेत असतानाच त्याचे सांकेतिक रूपांतरण होत असते व या सांकेतिक रूपांतरणाद्वारे मी अनुभव घेत असते.

सुझान लँगर हिचा संकेतन सिद्धान्त 'सांकेतिक रूपांतरणा'बद्दल (Symbolic Transformation) आहे. तर्क (Reason), कर्मसंस्कार (Rite) व कला (Art) या तिहींमध्ये सांकेतिक रूपांतरणाचे सूत्र गोवले आहे, असे तिला म्हणावयाचे आहे. साधारणतः तर्कचिन्हे व कर्मधर्मप्रतीके परस्परवर्ज्य मानली जातात. पण तिचे म्हणणे असे आहे की ह्या परस्पर–विरुद्ध समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये खरे तर विरोध नाही. त्या सर्वांमध्ये संकेतनतत्त्व आहे. जेथे वाणी अप्राप्य-मनसासह माघारी फिरते, तेथे संकेत वा प्रतीक शब्दयुक्त नसतात. त्यात तर्कचिन्हे, शब्दसंकेत किंवा कर्मधर्मप्रतीके या सर्वांचा समावेश करावा लागेल. 'संकेतनतत्त्वमीमांसा' असे तिच्या सिद्धांताचे एका शब्दात अतिसंक्षिप्तीकरण करता येईल. लँगरचा मूलसिद्धांत जनकसिद्धांत म्हणून गौरविला जातो. अनेक उपतथ्यांना तिच्या सिद्धांतामुळे चालना मिळते. तिच्या मूलसिद्धांताला ती तत्त्वज्ञानाचा 'नवपड्जाधार' म्हणून गौरविते.

लँगरने संकेतांचे वैभाषिक व अवैभाषिक संकेत असे प्रधान वर्गीकरण केले आहे. वैभाषिक संकेत तर्कनिष्ठ तसेच भावनानिष्ठही आहेत. त्यामधून तर्कयुक्त व प्रस्थापनयुक्त विचार जसा व्यक्त होतो, तसाच भावनायुक्त व तर्कविरोधी विचारही व्यक्त होतो. सर्व उद्गामी विज्ञानात अशा तर्कयुक्त वैभाषिक संकेतांनी विचार मांडला जातो. काव्यामध्ये किंवा ललित वाङमयात वैभाषिक संकेतनाचा भावनानिष्ठ अर्थ असतो. शब्दांच्यामार्फत सूचित केले जाते, ते निराळेच काहीतरी. "राजहंस माझा निजला" या शब्दांद्वारे सूचित केलेला अर्थ भावनायुक्त व लाक्षणिक आहे.

कर्म, कला व भाषा ह्या भावनार्थप्रधान आहेत. या भावनार्थप्रधान संकेतरूपांचा प्राथमिक विचार प्रस्तुत लेखात केला आहे. प्रथम कर्मसंस्कारांचे उदाहरण, नंतर कलातत्त्वाचे विवरण व अखेरीस भाषासंकेतनाचे स्वरूप व स्पष्टीकरण असा क्रम या लेखात योजिला आहे.

संकेतनव्यापार म्हणजे मूळ वस्तु किंवा विचार ह्यासाठी कृत्रिम चिन्हे वापरून वस्तुविचाराच्या अनुपस्थितीतही त्या वस्तुविचाराचा उठाव करणे किंवा उपसूचन करणे. तर्कचिन्हांच्या द्वारे हे कार्य होते, तसेच मनातील भावभावनांसाठी निसर्गात अस्तित्वात असलेल्या वृक्षसरितादींची योजना संकेत म्हणून योजतानादेखील संकेतन व्यापाराचा अवलंब केला जातो. संकेतन–व्यापारामध्ये मानवाच्या चिरप्रवृत्तीचे दर्शन होते. चंचल, विनाशी स्थित्यंतरापलीकडे जाऊन शाश्वत रूपे पाहण्यास माणसाची स्थिरप्रवृत्ती व चिरप्रवृत्ती धडपडत असते. पुराणे आणि धर्म यांत हीच प्रवृत्ती आढळते. या प्रवृत्तीद्वारा परिस्थितीचे विश्लेषण स्थिर-

मूल्यांच्या आधारे व कालातीत प्रकारे केले जाते. अनादी असे पौराणिक कुतूहल व चिरचैतन्याची मानवी ओढ गूढ आवरणाने भारलेली व रहस्यमय आहे.[१] दानवी किंवा दैवी, यातु–विधीसंबंधीचे (चेटूक, जादूटोणा इ. संबंधीचे) कुतूहल किंवा जीवनमृत्यू-विषयी वाटणारे भयाकर्षण, ईश्वराच्या अस्तित्वा-संबंधी अनेक प्रश्नोपप्रश्न पुराणप्रवृत्तीत अभिव्यक्त होतात. अज्ञात भावविश्वाचा सांकेतिक आविष्कार माणसाच्या चिरप्रवृत्तीमध्ये आढळतो. माणसाला पहिले द्वैत 'अस्ति–नास्ति' स्वरूपात भासले नसेल तर ते 'आस्तिक–नास्तिक' स्वरूपात भासले असेल. अर्थात्; ते देव–दानव स्वरूपात, सुष्ट–दुष्ट स्वरूपात अथवा भद्राभद्र स्वरूपात भासले असेल. महाभारत व रामा-यण यांमधील व्यक्तिमत्त्वाचा आशय व अर्थ नैतिक मूल्यांचे संकेत म्हणून केला नाही तर विपर्यास होतो. हे 'सत्य' तार्किक सत्य नव्हे, वैज्ञानिक सत्याची कसोटी तेथे लावणे अनिष्ट ठरेल. पुराणात सत्याचे स्वरूप तर्कातीत, अतार्किक व वैश्विक असते. मनातील आशयाला व अर्थातील चिरप्रवृत्तीला अभिव्यक्त केल्या-वाचून मानवाला राहवत नाही. पण त्याचा अर्थ 'सांकेतिक' असतो, 'वास्तव' नसतो, कर्म–संस्काराचा अर्थ असाच सांकेतिक आहे. स्त्रिया वटसावित्रीला वडाची पूजा करतात. हा वड 'वड' नाही तर चिरं-तनत्त्वाचे प्रतीक आहे.[१] पारंब्यापारंब्यामधून नवीन वृक्ष निर्माण करण्याची क्षमता असलेल्या अजरामर वटवृक्षाची पूजा 'चिरंतनत्त्वाचे प्रतीक' म्हणून केली तर त्यात काय वावगे आहे? त्यात कसला खुळचट-पणा? या अभिव्यक्तीचे मूल्य सांकेतिक आहे हे सर्वच स्त्रियांना (व पुरुषांनाही) कळण्याची आवश्यकता काय? हळदीकुंकू 'सौभाग्याची लेणी' आहेत, मणी-मंगळसूत्र 'मंगल' आहेत. किंवा 'अक्षता' म्हणजे तांदूळ आहेत असे नाही. 'श्रीफल' म्हणजे नारळ नव्हे. किती म्हणून उदाहरणे द्यावीत? शब्द म्हणजे काही नुसत्या रेघोट्यां, वेलांट्या नव्हेत, तद्वतच हे. शब्दांमध्ये जसे रेघोट्या–वेलांट्या यांच्या पलिकडे जाऊन विचाराकडे आपण लक्ष देतो, तसेच प्रतीकांद्वारा सूचित होणाऱ्या विचारांकडे आपले लक्ष वेधावयास हवे. कर्मसंस्कार हे 'संकेत' आहेत व खुद्द संकेत संकेतापलिकडील अर्थ सूचित करतात. कर्मसंस्कार किंवा धर्मविधी ह्यांचा विचार माध्यम म्हणूनच व्हावयास हवा.

आदिवासींमध्ये हे कर्मसंस्कारांचे प्रमाण सुशि-क्षितांपेक्षा अधिक आहे. कितीतरी ठिकाणी धगधगत्या अग्नीवरून चालत जाणे किंवा गालांमधून आरपार बाण घालणे असे अघोरी प्रकार दृष्टोत्पत्तीस पडतात.[४] येथे 'अघोरी' म्हटले खरे पण अघोरी पंथाचे तंत्र, मंत्र व तत्त्वज्ञान काही निराळेच आहे. कर्मामधील क्लेशाची मीमांसा करावयाची तर ती सांकेतिक अभिव्यक्ती असते व त्यात अज्ञातास आवाहन असते असे परोपरी म्हणावे लागते.

माणूस वैज्ञानिकतेचा व तर्कनिष्ठतेचा कितीही आव अंगात आणो, पण अज्ञातापुढे तो विनम्रच असतो. हिमखंडाप्रमाणे त्याच्या जीवनाचा अधिकांश हिस्सा अज्ञानात व अज्ञातात दडलेला असतो. त्याच्या व त्याच्या मामकांच्या जीवनाचा विचार करताना त्याचे मन अति हळुवार झाले असते. भावनांची अभि-व्यक्ती करण्यासाठी त्याचे मन धडपडत असते. अर्थात्; भावनांची ही अभिव्यक्ती सांकेतिक असते. त्यामध्ये प्रत्यक्ष भावना नसते तर भावनेचा 'अर्थ' असतो. ह्या मध्ये विमूर्तन केवळ ज्ञेयवस्तूचे नसते तर भाववृत्तीचे-ही असते. प्रत्येकजण या क्रिया–व्यापारात मग्न असतो. पुराणप्रवृत्तीमध्ये जशी भावावस्था भिन्न, सत्यही भिन्न, तद्वतच कर्मकलापात व संस्कारविधीमध्येही आपले आविष्करणही भिन्न.

संस्कारविधी व कर्मकलाप कोणाला चुकले आहेत? पृथ्वीतलावर कोठेतरी चुकले आहेत का? पण त्यांचे मर्म व त्यातील तत्त्व ध्यानात न आल्यामुळे हे विधी म्हणजे निव्वळ स्तोम आहेत किंवा आपल्या 'अडाणीपणाचे प्रदर्शन' आहेत असा ताशेरा तथाकथित सुशिक्षितांकडून (विशेषत: बायकांना) पदोपदी ऐकावा लागतो. नैमित्तिक कर्मसंस्काराद्वारे आवाहन केले जाते ते या स्थिर प्रवृत्तीला. सत्यनारायण कोण-त्याही प्रासंगिक निमित्ताने असो, पण त्यात आवाहन केले जाते ते चिरंजीवित्वाला. बरे, हे आवाहनही सांके-तिक. सांकेतिक धर्मातील कर्मसंस्कारांना मूल्य आहे. या प्रसंगांना सांकेतिक मूल्य आहे असे समजल्यासच त्या-मधील रहस्य उमजते व त्यातील पुनरावृत्तीचा अर्थ उमगतो. कोणत्याही कर्मसंस्कारामध्ये; कलेमध्ये किंवा पुराणकथेमध्ये पुनरावृत्ती अनेकशः प्रकट होते. कविते-मधील ध्रुवपद, संगीतामधील लयतत्व किंवा संस्कार-विधी मधील पुनरावृत्ती या सर्वांना ठशांचे किंवा

बुट्टयाचे (Motif) मूल्य प्राप्त होते. तेच ते करावयाचे, तसेच करावयाचे व पुनःपुन्हा करावयाचे या सर्वांना आशय आहे. त्या योगाने अज्ञातासंबंधीचे काहूर, मनातील हुरहूर व तर्काच्या परखड चौकटी-मध्ये न सामावणारे आपले मन अनेकश: प्रगट होत असते. पुनरावृत्तीमध्ये मंत्रशक्ती जागृत होते असे आपणास जाणवते.

अनुभवाची तात्काळ प्रतिक्रिया मनावर भिन्न प्रकारे होत असते. त्यापैकी भावनाशून्य प्रतिक्रियेलाच वास्तव म्हणावयाचे हे एकांगी होईल व सौंदर्य-शास्त्राच्या दृष्टीने तर हानिकारकच ठरेल. 'वारा जसा' 'वातावरणातील हालचाल' म्हणून आपणास जाणवतो तसाच तो 'दैवी शक्तीचा आविष्कार' म्हणूनही भासतो. वादळ म्हणजे 'दैवी क्रोध' भासणे किती स्वाभाविक आहे! मनाच्या या भिन्न पण तेवढ्याच प्रांजळ प्रति-क्रिया आहेत. पहिल्या प्रकारच्या जाणिवेमधून शास्त्र-शुद्ध, वैज्ञानिक प्रवृत्ती विकसित होईल. उलट दुसऱ्या प्रकारच्या प्रक्रियेमधून 'गूढ' किंवा 'दैवी' 'रहस्ययुक्त' भावप्रक्रियेला उठाव मिळेल. या भिन्न प्रवृत्ती परस्प-रोपकारक नसल्या तरी परस्परपूरक आहेत. अज्ञान व अज्ञात प्रस्तरांवर विज्ञानामुळे पडत आहेत व त्यामुळे ज्या घटनांबद्दल वर्षानुवर्षे रहस्ययुक्त कुतूहल वाटत आले आहे व ते व्यक्त करण्यासाठी सांकेतिक माध्यमाची आवश्यकता भासत आली आहे, त्या घटना आता वैज्ञानिक प्रांगणात आल्या आहेत व रहस्यमय कुतूहल त्यामुळे ओसरू लागले आहे असे वाटते. पण असे कसे होईल? जीवन संपूर्णतया विज्ञानाच्या प्रांगणात आले आहे व 'ज्ञेय' असे काहीच शिल्लक नाही असे स्वप्न सुद्धा वैज्ञानिक पाहू शकत नाहीत व हे स्वप्न पडलेच कोणाला तर ते आकर्षक आहे असेही म्हणता येत नाही. जीवनमृत्यूचे भयाकर्षण वाटणारच, अनेक ग्रहमाला आपल्याला वाकुल्या दाखवणारच. तेव्हा अज्ञाताची सांकेतिक अभिव्यक्ती आपण अनेकशः करणारच. पण वैज्ञानिकप्रवृत्तीच्या ऐवजी आपण केवळ भावप्रवृत्तीचे अवलंबन केले तर मात्र आपले आचरण विज्ञानविरोधी व म्हणून विघातक ठरण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, आपणास देवी (Small pox) कशामुळे येतात ते आता ज्ञात आहे. त्या मानाने आपली नवसावरची श्रद्धा कमी राहणारच. ह्या साथीच्या रोगाबद्दल आपल्या मनात भयभावना असल्यामुळे त्या रोगाला आपण 'देवीचा कोप' मानले, एवढेच नव्हे तर त्या विकृतीचे नावच आपण 'देवी येणे' असे ठेवले, ती आता विज्ञानाच्या 'ज्ञात प्रांगणात' वऱ्हांडी आली आहे. देवी न होऊ देण्यासंबंधी आपण जागरूक राहिले पाहिजे ह्या संबंधीची वैज्ञानिक कारणमीमांसाही केली गेली आहे. अर्थातच आपली विज्ञानप्रवृत्ती अधिक प्रबल झाल्यामुळे भावप्रवृत्ती त्या मानाने शबल झाली आहे. तरीदेखील आपल्या नातेवाईकांपैकी कोणास यदाकदाचित देवी झाल्याच तर आपण कसे वागू हे सांगता येत नाही. उगीचच माणसाची व्याख्या 'तर्क-शील प्राणी' म्हणून केली आहे!

कला–प्रांतातही माणूस 'काहीतरी' सांगण्याचा प्रयत्न सांकेतिकरीत्या करीत असतो. कला निर्मितीचे हे दालन सांकेतिक का याचे संक्षिप्त विवेचन करू या.

केवळ एक 'लीला' किंवा 'छंद' असे सुटसुटीत व पानचट स्पष्टीकरण फिके वाटावे असे गंभीर गहन वर्तन कर्मकलापात, विधिसंस्कारात व कलेतही होते. प्रत्येकालाच काही कलामाध्यमाचा आधार घेता येत नाही. कलावंत होण्यासाठी इतरही काही बंधने आहेत. कलेमध्ये जी अभिव्यक्ती आहे तीच कर्म-संस्कारात आहे असेही म्हणता येत नाही. कला निराळी व 'कर्म' निराळे. नित्यनैमित्तिक काम्य व निषिद्ध कर्मांचे मूल्य सांकेतिक आहे असे परोपरीने जाणवल्या खेरीज त्यांचे रहस्य आपणास उमजणार नाही. पालथे उताणे पडून व रात्रीचा दिवस करून अविरत परिश्रमाने वर्षानुवर्षे कलावंत लेणी कोरतात ते काही केवळ मनोविनोदार्थ नव्हे. काहीतरी अघटित व अघोर करून अज्ञाताला आवाहन करण्याची आकांक्षा तेथेही मानवाच्या मनात असते. कॅसिरर नावाचा विसाव्या शतकातील वैज्ञानिकतत्त्वज्ञ तर म्हणतो की अज्ञाताला आवाहन करण्याच्या रहस्यपूर्ण जाणि-वेतूनच माणूस कधीतरी व केव्हातरी कलावंत झाला असावा.[५] कलापूर्ण क्रिया किंवा कृती करावी ही जाणीव ठेऊन मागाहून त्याचे वर्तन झाले असावे असे म्हणणे चुकीचे ठरेल. अज्ञाताला आवाहन करण्याच्या प्रक्रिये-मधून काहीजण कालावंत झाले असावेत. कलानिर्मिती ही गंभीर बाब आहे व ती सांकेतिक आहे.

कोणत्या तरी संकल्पनेला उठाव देण्यासाठी आपण कलानिर्मिती करीत असतो. कलानिर्मितीचे स्वरूप 'आशयघन रूप' निर्माण करणे हे असते. (हे आशयघन रूप म्हणजे काय ? इत्यादी अनेक प्रश्न तेथे उद्भवतील परंतु त्यांचे विवेचन एका स्वतंत्र लेखातच करावे लागेल.) कलेचे कार्य केवळ सुखद अनुभव देणे नाही, तर अर्थपूर्ण व आशयघन रूपे निर्माण करणे हे कलेचे प्रयोजन आहे. कलेमध्ये प्रत्यक्ष ऐन्द्रियात्मक सुख नसते. अधिक गंभीर, गहन व अप्रत्यक्ष अनुभव कलेमध्ये असतो. कविता, संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला इ. सर्वच कलांत संकल्पनेचा उठाव हे प्रमुख कार्य असते. कला म्हणजे केवळ कौशल्य नव्हे.

संगीताचे उदाहरण घेऊन हा मुद्दा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करू. संगीताचे वैशिष्टच असे आहे की त्यामधील सुरांचे सरल भाषांतर करता येत नाही. वैभाषिक संकेतांचे असे शाब्दिक भाषांतर शक्य आहे. पण अवैभाषिक संकेतात (चित्रकलेत, नृत्यात किंवा संगीतात) असे भाषांतर शक्य नाही हे उघड आहे. संगीतातील आशय एकात्म, संकलित व संश्लेषणात्मक असतो. संगीताचा 'अर्थ' व्याप्तर्थयुक्त व गुणार्थयुक्त नसतो, तर तो भावनार्थ असतो असे म्हणणे योग्य होईल. केवळ आत्माविष्कारासाठी कलात्मक रूप निर्मिण्याची आवश्यकता नाही. मृत बालकाच्या मातेचा विलाप कलायुक्त आहे असे कोण म्हणेल ? पण 'राजहंस माझा निजला' ही पंक्ती कलात्मक आहे. उत्कट भावनांना वर्तनाद्वारे वाट करून देणे म्हणजे काही कला नव्हे. रघुवंशातील 'अजविलाप' हे काव्याचे उदाहरण आहे. कारण त्यात साक्षात् भावना नाही तर भावनेचा अर्थ आहे (येथे 'रससिद्धान्तां'ची आठवण होणे अपरिहार्य आहे). संगीतकला अर्थयुक्त आहे. ती साक्षात् नाही. म्हणजे भैरवीमध्ये कारुण्य नव्हे तर करूणरस आहे. गीताच्या माध्यमातून कलाकार रसिकांना कारुण्याचा 'अर्थ' सांगत आहे. एरव्ही, पाहिजे तेव्हा, ठराविक वेळी, ठरवून अनेकांसमोर गायक गातो याची उपपत्तीच लागत नाही.

ज्या अर्थाचे आकलन आपणाला शब्दाच्या साहाय्याने करता येत नाही असा 'अर्थ' आपण संगीतामधून व्यक्त करतो. गायकाला हा अर्थ सांगता येतो व रसिक श्रोत्यांलाही हा अर्थ उमजतो. अर्थाकलनाचे शब्द हे एकमेव साधन आहे असे म्हणणे चुकीचे आहे. संगीतामध्ये शब्दांचे अवमूल्यन होते, किंबहुना संगीत शब्दाला पूर्णतः ग्रासून टाकते.[५] जे संगीत शब्दांच्या आधारे उभे आहे ते खरे संगीतच नव्हे. 'रवीन्द्र संगीता'त असे आढळते. सुराला शब्द दिला नसून त्या संगीतात शब्दाला सूर दिला असतो. म्हणून, 'संगीत' म्हणून या गीतांचे मूल्य दुय्यमच राहणार.

'भावनांची भाषा' नेहमीच स्पष्ट करून सांगता येणार नाही. ह्या अनामिक भावनांचा अर्थ कलेच्या माध्यमातून व्यक्त होतो व रसिकाला 'समाधान' प्राप्त होते. हे अर्थमर्म व्यावहारिक जीवनात उपेक्षित राहते. त्याच्या व्यक्तीकरणासाठी कलेच्या माध्यमाची आवश्यकता आहे म्हणून त्याचे मूल्य सांकेतिक आहे असे म्हणावयाचे.

भाषा हे मानवी निर्मितीचे सर्वात आश्चर्यकारक व तेवढेच व्यापक साधन आहे. शब्दाबद्दलचे आपले कुतूहल निगूढ असावे यात काय नवल ? अनुभव घडवण्याचे व अनुभव व्यक्त करण्याचे सर्वात सुलभ माध्यम म्हणजे तो शब्दांकित करावयाचा हे आहे. अनुभव व अनुभूतीची अभिव्यक्ती या आदिबीजाच्या साहाय्यानेच होणार. तर्कनिष्ठ व भावनानिष्ठ अनुभवास वा अनुभूतीस सांधणाऱ्या सेतुबंधाप्रमाणे भाषेचे संकेतन आहे. कर्म व कला यांमध्ये व्याप्तर्थाऐवजी भावनार्थाचे महत्त्व आहे. पण भाषासंकेतनामध्ये व्याप्तर्थ व भावनार्थ या उभयार्थांना महत्त्व आहे. प्राण्याच्या क्रोधाविष्ट गुरकावण्यापासून क्षुल्लक वाटणाऱ्या शब्दापर्यन्त मानव्याचा सर्व इतिहास लिहिला आहे. माणसात शब्दसंकेत निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे म्हणूनच नर म्हणजे वानर नव्हे.[७] प्राण्यांची इंद्रिये माणसापेक्षा तीक्ष्ण असतात पण संकेत निर्माण करण्याच्या सामर्थ्यापासून ते वंचित असतात. म्हणून आपण त्यांच्यावर वर्चस्व मिळवू शकतो. प्राण्यांच्या प्राथमिक वर्तनातून भाषेचे रहस्य आपणास उमगणार नाही, तर ते ह्या संकेतन प्रक्रियेत सापडण्याची संभाव्यता अधिकतर आहे.[८] भाषेच्या उपपत्तीसंबंधी, उत्पत्तीसंबंधी समस्त प्रश्न आज उत्तरित आहेत या भ्रमात कोणी राहू नये व असल्या प्रश्नांचा नादच आपण सोडून द्यावा अशी सूचना सापीर या सुप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञाने केली आहे. (भारतीय तत्त्वज्ञानामध्येही भाषोद्भवाचे रहस्य अनेकशः जाणवते.)

शब्दांचा व्याप्तर्थ ही भाषेची खऱ्या अर्थाने सुरुवात आहे. शब्दसंकेतामार्फत शब्द वस्तूपासून पूर्णतः विलग करणे व या वस्तूचा केव्हाही व कोठेही उठाव करणे हे अतिशय मोलाचे कार्य व्याप्तर्थाने साध्य झाले आहे. मी 'हत्ती' हा शब्द संकेत उच्चारण्याचा अवकाश की मला कोणता अगडबंब प्राणी विवक्षित आहे ते सहज समजू शकते. वस्तुस शब्दसंकेतात बंदिस्त करून त्याचा हुकुमी उठाव करण्याचे बहुमोल कार्य शब्दसंकेताने केले आहे. तरीही प्रथम शब्दांना भावनार्थ निर्माण झाला असला पाहिजे. कर्म व कला ह्यांना जसा केवळ भावनार्थच आहे, तसा भाषेला आधी केवळ भावनार्थच असला पाहिजे. शब्दांना व्याप्तर्थ निर्माण होणे ही भाषेची अधिक उत्क्रान्त अवस्था आहे. समजा, आपण स्टेशनवर गेलो. तेथील गजबज, गोंधळ, गर्दी, लगबग व आगगाडीचे धूड, कर्कश शिट्या, तेथील मर्ढेकर – वर्णित कलियुगातील 'पोलादी कृष्ण', 'धगधगते अंगार' या सर्वांचा एक संबोध म्हणून 'स्टेशन' संकेत झाला. हा संकेत भावनाविरहित असणे शक्य नाही. बाह्यपरिस्थिचा निदर्शक म्हणून बालक जेव्हा शब्दसंबोधाशी व त्या परिस्थितीशी प्रथम परिचित होते तेव्हा त्याचा हा परिचय भावनाविरहित असणे संभवनीय नाही.

जन्म–मृत्यु, विजयोन्माद याचे निदर्शक म्हणून माणसाने कर्मसंस्कारादि व नृत्यादि सांकेतिक उठाव केले असतील. पुन्हा तद्वत प्रसंग निर्माण झाल्यास पुन्हा तसेच वर्तन करावयाचे व तेच निरर्थक उच्चार करावयाचे. असे करता करता असे झाले असेल. त्या प्रसंगावाचूनही या उच्चाराद्वारा ती मनाची अवस्था सूचित केली गेली असेल. म्हणजे शब्दसंकेत हे प्रथम भावनार्थ सूचित करतात व नंतर व्याप्तर्थ.

मराठीतील एक सुप्रसिद्ध उदाहरण घेऊन हाच मुद्दा अधिक विशद करू या. केशवसुतांच्या 'झपूर्झा' कवितेत 'झपूर्झा' हा शब्द असाच भावनार्थी आहे व म्हणूनच त्याचे आगळे वैशिष्टच आहे. हा शब्द त्यांनी स्वतः तयार केला आहे हे विशेष. अविकृत मनस्थितीचा निदर्शक प्रतिशब्द म्हणून तो आवाज प्रयुक्त केला आहे असे 'समग्र केशवसुत' ह्या प्रा. भ. श्री. पंडित यांनी संपादित केलेल्या टीपेत म्हटले आहे' मला स्वतःला हा शब्द निर्विशेष निरहंकार मनस्थितीस लावला आहे हे पटत नाही (मग खुद्द केशवसुत कांही स्पष्टीकरण देवोत). मुली झिम्मा खेळताना एक-मेकींच्या हातावर हात मारून (टाळी देवून) तोंडाने 'जा पोरी जा' असा उच्चार करीत असतात. त्या खेळात त्या मुली तन्मय झाल्या की 'झपूर्झा' असा आवाज ऐकू येतो. ही बेभानावस्था म्हणजे काही स्थित-प्रज्ञावस्था नाही. माझ्या मते ह्या चिंतनिकेत एकूण तीन कल्पना आहेत. (चिद्घन चपला ही जाते,) (१) स्थित-प्रज्ञावस्था (हर्ष खेद ते मावळले), (२) अज्ञाताचे अंतर्दर्शन व (३) बेभानवस्था या तीनी विलग पण उत्कट मनःस्थितींचा एक संकेत म्हणून केशवसुतांनी 'झपूर्झा' हा संकेत योजिला आहे हा एक संकेत भासतो पण तो अनेकार्थी असल्यामुळे तत्त्वतः एक नाही. गाडी बंद असता शिटीचा अर्थ 'गाडी चालू करणे' होतो पण त्याच शिटीचा अर्थ गाडी चालू असता गाडी बंद करणे' हा होऊ शकतो. तद्वत शब्दसंकेत तोच, पण, त्याचे अर्थ निराळे. कै. ह. ना. आपटे ह्यांनी ह्या श्रेष्ठ कवितेवर केलेल्या अन्यायासंबंधी तर बोलणेच नको. पण 'झपूर्झा' भावस्थितीचा संकेत असल्यामुळे त्या संकेताच्या अर्थकडा सुस्पष्ट नसल्या तरच तो अधिक शोभतो. संकेत अनेकार्थी असला तरी तेथे श्लेष नाही. उलट ह्या धुंद, तल्लीन, द्वंद्वातीत बेभाना-वस्थेत, उन्माद, आनंद या कल्पना अंतर्भूत आहेत. ही भावावस्था आपल्या अनुभूतीकक्षेतील आहे. कविता अनेकदा अर्थधूसर व अर्थसंदिग्ध असते. खुद्द केशवसुतांनी या गीतावरील टीपेत भगवद्गीता ज्याला 'स्थितप्रज्ञ' म्हणून संबोधते त्यालाच ते 'महात्मा' म्हणतात, असे म्हटले आहे. सुखदुःखाची अतीव उत्कटता येथे अभिप्रेत आहे. स्थितप्रज्ञावस्थेत मनाच्या उदासीन अवस्थेचे वर्णन आहे. हे एक दुर्लभ, दुष्प्राप्य ध्येय आहे. अशा ठिकाणी 'अत्याशयदोष' संभवतो. कवी, लेखकां-कडून व विशेषतः रसिक समीक्षकांकडून अनेकदा हा दोष घडतो. 'आभासयुक्त निर्मिती' हे काव्याचे कार्य आहे.'

शब्दाचा नेमका अर्थ देण्याचा सोस वाढला की, कवितेची खुमारीच नष्ट केल्यागत होते. म्हणून तर चांगले वाङमय 'पाठ्य' म्हणून नेमणे एवढे विघातक ठरते. 'झपूर्झा' शब्दाचा नेमका अर्थच नाही. (कोणत्याच शब्दाला नेमका एकच, सर्वांना सारखाच उमजणारा अर्थ नसतो.) अस्तित्वात असलेल्या शब्दांनी सूचित न होणारी ती एक मनाची अवस्था आहे व अवस्था

प्रतिशब्दात रूपांतरित होणे अवघड आहे. व्याप्तर्थाशिवाचून शब्दसंकेत उभा राहतो व त्यातून मनाची अवस्था प्रगट होऊ शकते, हे येथे दिसून येते. केशवसुतांनी 'झपूर्झा' 'शब्दात हे साधले आहे. झपूर्झा' शब्दांची ती खरी, अपूर्वाई आहे, असे मला वाटते. मुली झिम्मा खेळताना रंगल्या व धुंद झाल्या की शीघ्र तर लयीमुळे 'जा पोरी जा', 'झपूर्झा' प्रमाणे ऐकू येते. या बेभान मोदावस्थेचा, उन्मनावस्थेचा संकेत म्हणजे 'झपूर्झा' हा शब्द आहे. येथे प्रथमच मनाच्या अवस्थेचा व आपल्या मनातील भाववृत्तीचा उल्लेख नवीन शब्दसंकेत निर्मून केला आहे हे त्या शब्दाचे वैशिष्टच व नाविन्य आपण लक्षात घेतले पाहिजे. कुमार गंधर्वांनी नवराग निर्मून 'लगन गांधाराने' संगीताच्या क्षेत्रात जे साधले व मनातील आशय सांकेतिकद्वारा प्रगट करण्याचा जो प्रयत्न केला तोच केशवसुतांनी काव्याच्या प्रांगणात 'झपूर्झा' शब्दाद्वारे केला आहे."

'सत्य', 'वास्तव' व 'काल्पनिक' यामधील सापेक्षतेचा दुवा संकेतनव्यापारे सांधण्याचा मौलिक प्रयत्न कॅसिरर व लँगर ह्यांनी केला. भिन्न काळी व भिन्न भिन्न प्रसंगी निरनिराळचा दिसणाऱ्या वस्तु-संवेदनांमधून एकाच प्रकारची अर्थ–प्रतीती होते. हे कसे? या 'सत्याचे' स्वरूप काय? चांगल्या उजेडात पांढरा दिसणारा कागदाचा कपटा अंधारात पांढरा मानला जातो व त्यासच आपण सत्यस्थिती मानतो. सर्वच गायी रात्री अंधारात काळ्या दिसतात, पण त्या तशा मानल्या जात नाहीत. सत्याचे केवळ संवेदनसापेक्ष स्वरूप आपण स्वीकारत नाही. सत्य हे संवेदनसापेक्ष नाही तर केवळ संवेदनांचे रूपान्तरण करून त्यामधून 'अर्थाकलन' करणे हे आपल्या सत्यप्रक्रियेचे आद्यलक्षण आहे. ह्या संकेतन व्यापाराचे तात्त्विक विश्लेषण केल्यास असे आढळते की त्यामुळे मूल वस्तु व तिचाच संकेत यामध्ये संघटन निर्माण होते. त्यातून एकार्थ–प्रतीती तर साधली जाते, पण वस्तू व संकेत-प्रतीक यामधील मूल द्वैत कधीही नाहिसे होत नाही. संवेद्य, प्रेरक व त्याचा अर्थ बोधावस्थेत सांधला जातो तो या संकेतनव्यापारामुळे. अर्थनिर्मितीचे कार्य संवेद्य व प्रेरकापलीकडे जाऊन प्रेरकाचा 'आशय' लक्षात आणून देणे हे आहे. ह्यामध्ये 'अनुभव' आला व 'अनुभूतीही' आली.

अनुभवाच्या संकल्पनीकरणाची (Conceptualisation) प्रक्रिया व अनुभवप्राप्तीसाठी पूर्वसिद्ध प्रवर्गाचे (Categories) प्रस्थापन ह्यासंबंधी कांटला जिज्ञासा होती." अनुभवामध्ये एकत्व व सुसंगती निर्माण होण्यासाठी संकल्पनप्रक्रियेची व या प्रवर्गाची आवश्यकता आहे हे खरे पण अनुभवात 'अर्थ' निर्माण होण्याचे मुख्य कारण त्या सर्वांत संकेतन आणि सांकेतिक प्रातिनिधित्व असते हे होय. केवळ विज्ञान' आणि उद्गामी शास्त्रे यामधेच हे आढळते असे नाही तर पुराणप्रवृत्ती, धर्म, भाषा, कर्म, संस्कार, कला, इतिहास या सर्वांत ते प्रतीत होते. संकेतनत्व व सांकेतिक प्रातिनिधित्व मानवी बोधावस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. 'माणूस हा तर्कशील प्राणी आहे' असे त्याचे लक्षण करण्याऐवजी 'माणूस हा संकेतशील प्राणी आहे' असे त्याचे लक्षण करणे अधिक योग्य होईल असे कॅसिरर म्हणतो"

या लेखात तर्कसंकेतांचे विवरण केले नाही. तर्कसंकेतन कोणत्याही वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पुस्तकात आढळेल. संकेतनसामर्थ्य तर्कपूर्व आहे पण तर्कविरोधी नाही. कॅसिरर व लँगर इत्यादी विचारवंत एका बहुमोल प्रकल्पात गुंतले आहेत. कान्टच्या तत्त्वज्ञानाचे अधिक विस्तरण करून व भावनाशीलतेला योग्य ते महत्त्व देऊन, अनुभव, अनुभूती व अभिव्यक्ती परस्परांत कशी गुंतली आहेत हे दाखविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. लँगर तर म्हणतेच की, 'जीवनोत्क्रांतीच्या व्यापारात भावजीवनाच्या विशिष्ट अवस्थेत तर्काचा उदय झाला असावा.' या उपतथ्याची संभाव्यता ती पारखून पाहात आहे."

तत्त्वज्ञान हे विज्ञान नव्हे. तत्त्वज्ञानामध्ये विज्ञानाचे एकमेव प्रतिरूप (Model) नजरेसमोर ठेवून मार्ग चोखाळल्यास तत्त्वज्ञानातील सारतत्त्व (Essence) नाहीसे होते. तत्त्वज्ञानात समस्येच्या उत्तराएवढेच समस्या कशी मांडली आहे, समस्येतील संबोध व संकल्पना यांचा परस्परसंबंध काय आहे इकडे लक्ष केंद्रित झाले असते. संकेतनसमस्येत संकल्पनांचे विशिष्ट स्थान व अनुभवाचा अर्थ सांकेतिक आहे हे उपतथ्य बहुमोल आहे. संपूर्ण जीवन आत्मनिष्ठ गूढ अर्थाने व्याप्त आहे. कर्म, कला व भाषा या तिन्ही दालनांत ही संकेतशीलता कशी आढळते हे दाखवण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे. विशेषतः मराठी

भाषिकांना सुपरिचित उदाहरणे घेऊन काही मुद्यांचे विश्लेषण करण्याचा प्रस्तुत लेखाच्या मर्यादेत प्रयत्न केला आहे. या विषयावर अधिक विस्तारपूर्वक लिहायला हवे होते याची लेखिकेला जाणीव आहे. परंतु विशिष्ट स्थलमर्यादेमुळे ते येथे शक्य झाले नाही. पुढे केव्हा तरी त्याचा अधिक विचार स्वतंत्रपणे करावा लागेल, एवढेच येथे नमूद करते.

१. लँगर, सुझान के, '*Philosophy in a New Key*", pp. 41-42. Cambridge, Mass: Harward Universlty Press, 1960.

२. कॅसिरर, अर्न्स्ट., "*Philosophy of Symbolic Forms Vol. II*" pp. 8, 23, 38, 61, 63. New Haven: Yale University Press, 1963.

३. साने (गुरुजी), पां. स., "भारतीय संस्कृती."

४. Brewster, Paul G., *Illustrated Weekly of India*, Vol. XCV, 30, Sep. 22, 1974.

५. कॅसिरर, अ., "*An Essay on Man*", Chapter on Art, New Haven: Yale University Press, 1944.

६. लँगर, सु. के., "*Feeling and Form*" p. 152, London: Routledge & Kegan Paul, 1965.

७. चेस, स्टयुअर्ट, "*Tyranny of Words*", pp. 46-56. 1938.

८. सापिर, ई., "*Language*" *in Encyclopaedia of Social Sciences*, Vols. IX-X, New York: McMillan & Co., (1937), 11th Printing, 1954.

९. पंडित, म. श्री., संपादक, "समग्र केशवसुत" पृ. २१९, ३४०-४१. पुणे: व्हिनस प्रकाशन, १९७०.

१०. लँगर, सु. के, "*Problems of Art*" pp. 5-6, 87. London: Routledge & Kegan Paul, 1957.

११. हातवळणे, प्रभावती, "लगनगंधाराच्या निमित्ताने। कलानिर्मितीचे स्वरूप" नवभारत, जुलै १९६९.

१२. लँगर, सु. के., "*Theory of Language and Myth*", *in* "*The Philosophy of Ernst Cassirer*" pp. 381-400. P. A. Schilpp, Editor, New York: Tudor Publishing Co., 1958.

१३. कॅसिरर, ई., "*An Essay on Man*" p. 26, New Haven: Yale University Press, 1954.

१४. लँगर. सु के., "*Problems of Art*", p. 124, London: Routledge & Kegan Paul, 1957.

□ □

सूचना

वि. सा. संघाचे सभासद व युगवाणीचे वर्गणीदार यांना पाठविलेल्या अंकातून, १८ अंक पोस्टातून परत आले. त्यावर पोस्टाचा असा शेरा होता की त्या पत्यावर ते सध्या राहत नाहीत. तरी कृपा करून ज्यांचे संघात पूर्वी दिलेले पत्ते बदलले असतील, त्यांनी संघाच्या कार्यालयास ताबडतोब सध्याचा नवीन पत्ता कळवावा. नवीन पत्ता मिळेपर्यंत त्यांना पुढील अंक पाठविण्यात येणार नाही. सर्व सभासदांना व वर्गणीदारांना विनंती की त्यांनी संघात दिलेल्या त्यांच्या पत्यात जर बदल झाला असेल तर कार्यालयास तसे ताबडतोब कळवावे.

— कार्यकारी संपादक

विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

एप्रील १९७४ ते मार्च १९७५

लेखकांची सूची

कथा

कविता

टिपणे–पत्र

नाटिका–एकांकि

लेख

ललित लेख

समीक्षा–परीक्षणे–परामर्श

साहित्याची सूची

कथा

कविता

टिपणे—पत्र

नाटिका—एकांकिका

लेख

ललित लेख

समीक्षा–परीक्षणे–परामर्श

मुखपृष्ठ :

छायाचित्रे :

(खालील व्यक्तींच्या / संस्थेच्या सौजन्याने प्राप्त)

रेखाटने :

□ □

साभार पोच

[दि. १–४–७४ ते ३१–५–७५ पर्यंत युगवाणीला भेट म्हणून आलेल्या पुस्तकांची पोच खाली दिली आहे. परंतु या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या युगवाणीच्या अंकांत ज्या पुस्तकांची पोच आधीच दिली आहे त्यांचा समावेश केलेला नाही.]

१. मौज प्रकाशन गृह, खटाववाडी गिरगाव, मुंबई ४.

ढग : सखा कलाल, पृष्ठे ७ + १४५ किंमत रु. १४.

गंधरेखा : पु. शि. रेगे, पृष्ठे ३ + ६५ किंमत रु. ७.

आनंद ओवरी : दि. बा. मोकाशी, पृष्ठे ७४, किंमत रु. ८

सात सक्कं त्रेचाळीस : किरण नगरकर, पृष्ठे २०८, किंमत रु. २१

राजा लिअर : अनुवादक विंदा करंदीकर, पृष्ठे २७१ किंमत रु. २०

श्री. ना. पेंडसे–लेखक आणि माणूस : एक मित्र पृष्ठे ८ + ४६४ किंमत रु. ५५.

महाराष्ट्र साहित्य परिषद टिळक रस्ता, पुणे, ३०

मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा, भाग पहिला, १८७५ ते १९२० कालखंड संपादक प्रा. रा. श्री. जोग, पृष्ठे १२ + ५०७, किंमत रु. ३०.

मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा भाग दुसरा, १८७५ ते १९२०, कालखंड संपादक प्रा. रा. श्री. जोग, पृष्ठे १५ + ४६० किंमत रु. २५.

मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड तिसरा, १६८० ते १८०० कालखंड, संपादक प्रा. रा. श्री. जोग पृष्ठे १५ + ६८८ किंमत रु. ३०.

मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चवथा, १८०० ते १८७४ कालखंड, आवृत्ती दुसरी,संपादक प्रा. रा. श्री. जोग, पृष्ठे १३+ ६८२ किंमत रु. ३०.

मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, इसामिया बाझार, हैद्राबाद–७.

टीप कागद : रंगा कोल्हटकर, पृष्ठे ५१, किंमत रु. ४·५०.

केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल गिरगाव नाका, मुंबई–४

दुसरे महायुद्ध : वि. स. वाळिंबे, पृष्ठे ४ + २९६ किंमत रु. २५.

गुंतता हृदय हे : शं. ना. नवरे, पृष्ठे ११२ किंमत रु. ७.

जोगीण : सुभाष भेंडे, पृष्ठे ११५ किंमत रु. ९.

हे तो श्रींची इच्छा : गोपाळ नीलकंठ दांडेकर पृष्ठे १८१ किंमत रु. १२.

पायवाट : नरहर कुरुंदकर, पृष्ठे ४ + १९२ किंमत रु. १५.

दलितांचे राजकारण : दादूमिया, पृष्ठे ८ + १९५ किंमत रु. १५.

विद्यापीठ प्रकाशने

विष्णुदास नामाकृत मलोपाख्यान : मधुकर रामदास जोशी, नागपूर विद्यापीठ, पृष्ठे ३ + ४७.

राजगोपाल विलास : संपादक माणिक धनपलवार, मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद, पृष्ठे ४० + १४१ किंमत रु. १२.

अप्रकाशित तांबे : व. दि. कुळकर्णी व जयंत वष्ठ, कुलसचिव मुंबई विश्व विद्यालय, फोर्ट, मुंबई ३२. पृष्ठे ८ + १०४.

नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर १२

झळई : प्रा. कृष्णा चौधरी, पृष्ठे १५ + ४८ किंमत रु. ३.

हरवलेला गवसला : सौ. यमुना शेवडे, पृष्ठे १४६ किंमत रु. ६.

रक्तपंख : वसंत चिंचाळकर, पृष्ठे १५३ किंमत रु. १२.

सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे–नागपूर

खाडिलकरांची तीन नाटके : गंगाधर गाडगीळ, पृष्ठे १५ + ८३ किंमत रु. १२.

सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि. १७२, मुंबई ग्रंथ स. प्र. मार्ग, दादर मुंबई १४.

आभाळाचे मन : मनोहर सरदेसाई, पृष्ठे ६४ किंमत रु. ३·७५.

जित्याची खोड : सुभाष भेंडे, पृष्ठे १२७ किंमत रु १६.

इतर प्रकाशने

तेवत असलेली एक जीवन ज्योत : खंड पहिला गोपाळराव पाठक, प्रकाशक सौ. विमलाबाई गोपाळ पाठक, गणेशबाग, उमरेड रोड नागपूर २. पृष्ठे १० + २३२ + १५ किंमत रु. ८.

केशवसुतांची भावंडे व त्यांचा परिवार : द. मो. दामले. प्रकाशक प्रभाकर देगावकर १९६, गोल्डफिंच पेठ श्रमसाफल्य शारदा मुद्रणालय, सोलापूर, पृष्ठे १०+ २० किंमत ७५ पैसे.

रान फुले : शं. वा. उमराणीकर, प्रकाशक: सौ. उमा उमराणीकर, वासुदेव कुटी, निपाणी, पृष्ठे ८ + ५५ + ३ किंमत रु. १ २५.

चांगदेव पासष्टी : वा. का. उमराणीकर, प्रकाशक शे. वा. उमराणीकर, वासुदेव कुटी, निपाणी पृष्ठे १० + ४० किंमत रु. २.

गीतामृत : वा. का. उमराणीकर, प्रकाशक सौ. उमा उमराणीकर, गीतामंडळ, निपाणी, पृष्ठे ४० किंमत ५० पैसे.

ईशावास्योपनिषद : शे. वा. उमराणीकर, प्रकाशक, टिळक पाठशाळेचे हिंदी विद्यालय, निपाणी, पृष्ठे ७ + ६२ किंमत ५० पैसे.

नाटककाराची कला : जे. वी. प्रीस्टले. अनुवादक वसंत हरी गोळे. कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे, ३०. पृष्ठे ५+१४९० किंमत रुपये ७.

पऱ्यांची शाळा सुमाप वसेकर, प्रकाशक त्र्यंबक वसेकर, भाग्यनगर सावली, नांदेड पृष्ठे ७ + २३ किंमत रु. ३.

इतिहास विचार तरंग दि. के. देशपांडे, प्रकाशक प्र. दि. देशपांडे, कॉन्टीनेंटल प्रकाशन वैद्य बंगला, टिळक रोड, न्यू प्लाटस एरिया अमळनेर जि. जळगाव पृष्टे ११२ रु. किमत ८.

चंद्रास्त : प्रभाकर श्रावण चौधरी, प्रकाशक सौ. शोभा चौधरी, रसयात्रा प्रकाशन, ३४ विद्यानगर, जळगाव पृष्ठे २४ किंमत रु. ५.

मतिप्रकाश : पां. कृ. सावळापूरकर, प्रकाशक प्र. मु. सकदेव, हिंदुधर्म संस्कृती मंदिर, इंदिरा निवास, धंतोली, नागपूर. पृष्ठे ८ + १६० किंमत रु. १२.

गांधी दर्शन : प्रा गुलाम मुस्तफा देशमुख, प्र. श्री. रामसिंग चुनावाले, श्री प्रेस चिखली. पृष्ठे ९ + ५५ किंमत रु. ५.

मी एक कार्यकर्ता विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे, प्र. स. आ. गुळवणी कोरे षष्ठ्द्वि समिती. पृष्ठे १२ + २८० किंमत रु. १०.

वैदर्भीय बोलीचा शब्दकोश : प्रा. दे. गं. सोटे प्रकाशक, डॉ. सौ. कविता सोटे, रामनगर, वर्धा, पृष्ठे ९ + २४८ किंमत रु. १८.

समर्थ चरित्र : संपादक ग. वि. अकोलकर, प्रकाशक अनिरुद्ध अनंत कुळकर्णी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३० पृष्ठे ४० + २७७ किंमत रु. १५.

लागेबांधे : बाबासाहेब मांड, प्रकाशक सौ. आशा मांड, धारा प्रकाशन, बन्सीलाल नगर, औरंगाबाद पृष्ठे २ + १३० किंमत रु. १०.

संगीताच्या छायेत : कवि यमुनासुत (यादव खैरे) कविमंडळ नासिक प्रकाशन, नासिक, पृष्ठे ५१ किंमत रु. ६.

तारांगण : काव्यरसिक मंडळ, र. म. भागवत, काव्यरसिक मंडळ स्वानंद, टिळकपथ, डोंबिवली (पूर्व), पृष्ठे ८ + ९२ किंमत रु. ५.

कविता फुलते अशी संपादक वा. रा. ढवळे ओरियन्टल लॉगमन लि., कामाणी मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई ३८ पृष्ठे १० + ६७. किंमत रु. ९.

विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे मा. श्री. शिंदे, युवराज प्रकाशन, मराठवाडा, पृष्ठे २६ + ११० किंमत रु ७.

मृत्युचे चुंबन घेणारा महाकवी-साने गुरुजी आचार्य प्र. के अत्रे, साधना प्रकाशन. ४३० /३१ शनवार पेठ पुणे ३०, पृष्ठे १४ + १२० किंमत रु. ८.

जोड्यात्रा : खंड दुसरा : श्री. ना. बनहट्टी; सुविचार प्रकाशन मंडळ, ४६१ /४ सदाशिव पुणे ३०. धंतोली, नागपूर १२ पृष्ठे १४ + २७८ किंमत रु, १८.

हॅरोल्ड लॉस्की नागरिकांचे हक्क : अनुवाद श्री. प. सोहोनी, समाज प्रबोधन संस्था, पुणे ३०, पृष्ठे ५ + ५५, किंमत रु. ३ २५.

स्पर्श : जयवंत दळवी, मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई ४ पृष्ठे १७२ किंमत रु. १५.

अन्तर्राष्ट्रीय युद्ध : श्रीकांत मंडलेकर, प्रकाशक श्रीकांत मंडलेकर, इंदोरा, भण्डार मोहल्ला, नागपूर ४, पृष्ठे ३१ किंमत रु. १.

अनवांछित अरविंद गोखले, कान्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०, पृष्ठे ८ + १६८ किंमत रु. ७.

माझ्या आजोळीची वाट : प्र. श्री. नेरूरकर अभिनव प्रकाशन, मुंबई १४, पृष्ठे १० + १२६ किंमत रु. १०.

साहित्य अभिनाटच काही समस्या : डॉ. रा. शं. वाळिंबे गौरवग्रंथ संपादक डॉ. भीमराव कुळकर्णी, सौ. मीना जेस्ते, जोशी लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता पुणे ३०, पृष्ठे २ + ३४० किंमत रु. २५.

विचार जागृती : डॉ. वा. दा. गाडगोळ प्रकाशक-मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबाद, पृष्ठ संख्या ५ + १७५, मूल्य रु. १२.

आगरकर निबंध (नामविषयक सूची) संकलक प्रतिमा ठिपसे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, नगर, गुलटेकडी पुणे पृष्ठे २ + १२९ किंमत रु. ६.

चांगदेव पासष्टी : अनुवादक श्रीबाबाजी महाराज पंडित, श्रीज्ञानेश्वर मयुरा द्वैसांप्रदायिक मंडळ अमरावती, पृष्ठे २ + ५६ किंमत रु. १.

स्वप्नात नाही आले : सौ. संजीवनी देशमुख, श्रीविशाखा प्रकाशन, ५८, शनवार पेठ, पुणे ३०, पृष्ठे ११६ किमत रु. ६.

अंतहीन संघर्ष : आनंद हार्डीकर, श्रीप्रकाशन ४९५,४९६ शनिवार पेठ, मेंहुबपुरा पुणे ३०, पृष्ठ १४७ किमत रु. ७.

गाव कुसाबाहरील कविता वामन निंबाळकर अस्मितादर्श प्रकाशन ३७, लक्ष्मी कॉलनी, छावणी औरंगाबाद, पृष्ठे ४+३४ किमत रु. ४.

भक्तिरस नवनीत : संपादक पंडित श्रीपादशास्त्री किंजवडेकर, मॅजेस्टिक प्रकाशन, ३१६, प्रसाद चेंबर्स मुंबई ४ पृष्ठे ३२८ किमत रु. ५.

कोंडवाडा : दया पवार, मागोवा प्रकाशन, १२५९/२ जंगली महाराज रस्ता, पुणे ४ पृष्ठे २१+६० किमत रु. ५.

भारताचे परराष्ट्रीय धोरण : संपादक सुनील दाते, विचार प्रकाशन २, समाधान कॉलनी सशब्द-कोटी मार्ग, औरंगाबाद, पृष्ठे २२४ किमत रु. १२.

कल्लोळ : चंद्रकांत कल्लोळी श्रीशब्द प्रकाशन द्वारा अनिल किणीकर श्रीशब्दालय. १६९१, सदाशिव पुणे ३० पृष्ठे ४०. किमत रु. ३.

महानुभावाचा हिंदुत्वावर आक्रमण : डॉ. रा. बों. मेश्राम, डॉ. मेश्राम, काचीपूरा, इतवारी, नागपूर. पृष्ठे ४+१२६ किमत रु. ५.

अश्वत्थाची पाने : डॉ. सदाशिव अंबादास डांगे, हिंदुधर्म संस्कृती मंडळ, इंदिरानिवास, धंतोली, नागपूर १२. पृष्ठे २४+२६२ किमत रु. ३०.

कविवर्य तांबे–साहित्यविचार : संपादक वा. रा. ढवळे : रा. अ. काळेले. श्री. अ. अं. कुळकर्णी राजकवी तांबे स्मारक समिती. महाराष्ट्र साहित्य सभा भवन, ४८४ महात्मा गांधी मार्ग, इंदूर, (म.प्र.) १ पृष्ठे २७६ किमत रु. १५.

भारत ईराणी संश्लेष : श्री. देवीसिंग व्यंकटसिंग चौहान, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, राष्ट्रभाषा भवन, नारायण पेठ, पुणे ३० पृष्ठे १५+२९९ किमत रु. १५.

सामान्य माणसाचे सुबोध तत्त्वज्ञान : ल. ज. खरे, समाज संशोधन संस्था, ४३०/३१ शनवार पेठ, पुणे ३० पृष्ठे ८+६४ किमत रु. ३.७५.

साहित्य संशोधन मंजिरी : ना. ब. जोशी नवसाहित्य प्रकाशन. समादेवी रस्ता, वेळगाव, पृष्ठे ११+२३२ किमत रु. १७.५०.

□ □

क्षमस्व !

युगवाणीच्या दिवाळी १९७४ च्या अंकात ३४० पानावर 'प्रतिस्पर्धी रात्र' या कवितेवर कवीचे नाव मनोहर वाकोडे ऐवजी **मधुकर वाकोडे** आणि अंक ११–१२ (माघ–फाल्गुन) मध्ये पान ३८४ वर 'वैभव' या कवितेवर कवियत्रीचे नाव कु. 'नीर' चांदूरकर ऐवजी कु. 'नीर' **चांदेकर** असे हवे. झालेल्या मुद्रण दोषाबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

— कार्यकारी संपादक

विदर्भ साहित्य संघ

बावन्नाव्या वर्षाचे कार्यवृत्त १ एप्रील १९७४ ते ३१ मार्च १९७५

१९७४–७५ साली वि. सा. संघास ५२ वर्षे पूर्ण झाली. बावन्नाव्या वर्षाचा सर्वांगीण अहवाल खालीलप्रमाणे–

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ सभासद संख्या वर्ग	१९७५ मार्च अखेर
उपकर्ते	९
आश्रयदाते	४
सहाय्यक	१
हितचिंतक	३
आजीव सभासद	२५२
साधारण सभासद	९१६
एकूण	११८५

१.२ शाखा अकोला, आकोट, उमरखेड, खामगाव, चंद्रपूर, दारव्हा, बुलढाणा, यवतमाळ, वणी या ठिकाणी संघाच्या शाखा आहेत.

१.३ संलग्न संस्था : रंजनकला मंदिर नागपूर, गंधर्वकला मंदिर, नागपूर, रंगरेखा नागपूर, आणि नवरंग नागपूर अशा चार संस्था संलग्न आहेत.

१.४ वार्षिक साधारण सभा

वार्षिक साधारण सभा रविवार दि. २८ जुलै ७४ ला गडकरी सभागृहात संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांचे अध्यक्षते खाली सायंकाळी ४ वाजता घेण्यात आली. या सभेत २९ सप्टेंबर '७३ ला झालेल्या साधारण सभेने नेमलेल्या हिशेब चौकशी समितीचा अहवाल प्रस्तुत करण्यात आला. साधारण सभेने तो त्यात ज्यांची जबाबदारी येते त्या व्यक्तीकडे, त्यांचे त्यावर काय म्हणणे आहे हे कळविण्यासाठी पाठवावा असे ठरविले. ह्याच सभेत १९७४–७५ चा अर्थ संकल्प मान्य करण्यात आला. तो युगवाणीच्या जून–जुलै ७४ च्या अंकात छापला आहे.

१.५ कार्यकारी मंडळाच्या सभा

वृत्तातांच्या काळात एकूण ८ सभा झाल्या. दि. २८ जुलै ७४ ला सकाळी ८॥ वाजता भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत वि. सा. संघातर्फे मराठी साहित्य महामंडळावर पाठवावयाच्या प्रतिनिधी बद्दल चर्चा झाली. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे हे महामंडळावर पदसिद्ध प्रतिनिधी आहेत, श्री. त्रि. गो. देशमुख आणि प्रा. यशवंत मनोहर यांना अधिक दोन प्रतिनिधी म्हणून निवडण्यात आले.

कार्यकारी मंडळाच्या दि. २४-११-७४ च्या सभेत प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी दिलेले कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचे व युगवाणीच्या संपादकपदाचे त्यागपत्र स्वीकारण्यात आले. त्या रिकाम्या झालेल्या जागी डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर यांची का. का. मंडळाचे सदस्य व युगवाणीचे संपादक म्हणून अविरोध निवड झाली.

कविभूषण श्री. ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांनी का. का. मंडळाच्या सदस्यत्वाचे त्यागपत्र दिल्यामुळे त्यांच्या जागी वि. सा. संघ घटना कलम १३ प्रमाणे अध्यक्षांनी डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांची ७-२-७५ ला नियुक्ती केली.

कार्यकारी मंडळाची विशेष सभा दि. ९-२-७५ ला सायंकाळी ४ वाजता झाली. श्री. बाबुराव चिमोटे यांनी हिशेब चौकशी समितीच्या प्रतिवृत्ता संबंधी लेखी निवेदन देण्यास नकार दिल्याने त्यांच्या विनंती प्रमाणे त्यांना तोंडी निवेदन करण्याची संधी दिली होती. त्याप्रमाणे श्री. चिमोटे यांनी केवळ २-३ मुद्यासंबंधी त्रोटक माहिती दिली व सप्रे प्रकरणा संबंधी लेखी निवेदन देण्याचे मान्य केले. परंतु आजपर्यंत ते त्यांनी दिले नाही.

१.६ विश्वस्त मंडळ

विश्वस्त मंडळाच्या एकूण चार सभा झाल्या.

दि. २-७-७४ ला मुंबईला श्री. ना. ल. अभ्यंकर कार्यकारी विश्वस्त यांचे निवासस्थानी पहिली सभा झाली. या सभेत विश्वस्त न्या. मू. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी काही अपरिहार्य कारणामुळे त्यागपत्र दिले. त्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांची विश्वस्त म्हणून नेमणूक करण्यात आली.

विश्वस्त मंडळाची दुसरी सभा दि. २३-८-७४ ला नागपूरला झाली. विश्वस्त मंडळाची तिसरी सभा दि. ८-२-७५ ला नागपूरला झाली. या सभेत वि. सा. संघ व धनवटे रंगमंदिर येथे होत असलेल्या दुरुस्तीचा व कार्याचा आढावा घेण्यात आला. विश्वस्त मंडळाची चवथी सभा दि. १६-३-७५ ला नागपूरला झाली. या सभेत रंजनकला मंदिर वापरत असलेल्या जागे संबंधी विचार विनिमय झाला. त्यांचे मत का. का. मंडळाच्या सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात येईल.

२. दिवंगतांना श्रद्धांजली

वृत्तांताच्या कालात निम्नलिखित दिवंगत व्यक्तींना आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नानासाहेब फाटक	–	मराठी रंगभूमीचे एक भूषण
सखारामपंत जोशी	–	वैदर्भीय रंगभूमीवरील उत्कृष्ट कलावंत, दिग्दर्शक आणि शिक्षक.
सुधीर आयलवार	–	तरुण कलावंत.
डॉ. रा. ग. हर्षे	–	सुप्रसिद्ध लेखक व संशोधक.
श्रीमती सगुणाबाई देशमुख	–	संघाचे उपकर्ते सभासद.
वा. पु. काळे	–	संघाचे आजीव सभासद.
डॉ. शं. दा. पेंडसे	–	संघाचे पूर्वाध्यक्ष, संतवाङ्मयाचे प्रगाढ अभ्यासक, उत्कृष्ट वक्ते.
कृष्णाजी व्यंकटेश पेशकार	–	कार्यकारी मंडळाचे माजी सदस्य, अमरावती महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक.
विनय डांगरे	–	संघाचे सभासद व नागपूर आकाशवाणीचे कलाकार.
वा. ना. देशपांडे	–	साहित्यिक, कवी समीक्षक आणि युगवाणीचे आद्य संपादक.
य. वा. शास्त्री	–	दैनिक तरुण भारताचे संबंधित पत्रकार.

३. संघाचा वर्धापनदिन

संघाचा ५२ वा वर्धापनदिन दि. १४ जानेवारी ७५ ला साजरा करण्यात आला. या प्रसंगी रुक्मिणी स्वयंवर या महानुभावीय हस्तलिखिताची अपूर्व संशोधन आवृत्ती काढणारे प्रा. सुरेश डोळके यांना डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल शाल व श्रीफल देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक श्री. वि. स. उपाख्य भाऊसाहेब खांडेकर तसेच हिंदी भाषेचे सुप्रसिद्ध लेखक श्री. जैनेंद्रकुमार यांची या समारंभाचे प्रसंगी उपस्थिती होती हे या वर्धापन सामारंभाचे वैशिष्टच होते. या दोन्हीही मान्यवर साहित्यिकांची भाषणेहि झाली. तसेच निपाणी येथील सौ. आशावती काटकोळ यांनी कविवर्य रेंदाळकर यांचे मोठे चित्र संघास भेट म्हणून आणून दिले. त्याचें अनावरण श्री. भाऊसाहेस खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. भ. श्री. पंडित यांनी कविवर्य रेंदाळकरांच्या काव्यावर भाषण केले.

४. मान्यवर साहित्यिकांचा सन्मान

४.१. मराठीतील विविध वाङमय प्रकारातील उत्कृष्ट साहित्यकृतीलां दरवर्षी महाराष्ट्र शासनाकडून पुरस्कार दिले जातात, १९७२–७३ या वर्षात प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट साहित्यकृतींना जे पुरस्कार मिळाले त्यात वैदर्भीय साहित्यिकांच्या साहित्यकृती समाविष्ट होत्या. त्या अशा—

प्रा. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे	–	नागपूरी बोली–भापा–शास्त्रीय अभ्यास
श्री. प्रभाकर पुराणिक	–	अडकित जाऊ खिडकीत जाऊ
सौ. प्रमिल वसंत कुळकर्णी	–	असे साकारले शिल्प
श्री. केशव मेश्राम	–	हकिकत आणि जटायु.

४.२ नागपूर विद्यापीठाची डाक्टरेट पदवी प्राप्त झालेले मानकरी असे श्री. ल. रा. कुळकर्णी, श्री. वि. स. जोग, श्री. श्री. मा. घटाटे आणि श्री. सुधाकर मोगलेवार.

४.३ महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त व डाक्टरेट पदवी प्राप्त झालेल्या उपरिनिर्दिष्ट व्यक्तींचा संघातर्फे दि. २४–१०–७४ ला भारताचे कृषिमंत्री माननीय बाबु जगजीवनराम यांचे शुभहस्ते शाल व श्रीफल अर्पण करून सत्कार करण्यात आला.

५. अभिष्ट चिंतन

५.१ ज्येष्ठ कवी श्री. य. दि. पेंढरकर (कवी यशवंत) यांना ९ मार्च ७४ ला ७५ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त संघातर्फे त्यांचे अभिष्ट चिंतन करण्यात आले.

५.२ श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर, साहित्यिक, पत्रकार व संघाचे पूर्वाध्यक्ष यांनी २८–१२–७४ ला पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण केले. त्यांचे संघाने अभिष्ट चिंतन केलें.

५.३ आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या अमृत महोत्सवा निमित्त दि. १८ जून ला श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली अभीष्ट चिंतन समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभाला स्वत: दादा उपस्थित नव्हते पण त्यांचे सुपुत्र न्या. मू. चंद्रशेखर व स्नुषा उपस्थित होते. डॉ. दादासाहेब वालिंगे, सर्वश्री अ. गो. शेवडे, आनंदराव कळमकर, वा. कृ. चोरघडे, त्रि. गो. देशमुख यांची भाषणे झाली.

५.४ कविवर्य या. मु. पाठक यांनी २५ जून ७४ ला ७० व्या वर्षात पदार्पण केले. संघाच्या सरचिटणीसांनी त्यांना पुष्पमाला अर्पण करून त्यांचे अभिष्ट चिंतन केले.

५.५ श्री. वामन कृष्ण चोरघडे, संघाचे पूर्वाध्यक्ष व ख्यातनाम कथाकार यांचे षष्टयब्दिपूर्तीनिमित्त दि. १६ जुलै ला संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली ‘सत्कार’ आयोजित करण्यात आला. आचार्य दादा

अनुक्रमणिका

धर्माधिकारी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे आणि प्रा. प्रभाकर उर्ध्वरेषे यांची वामनराव-जींच्या व्यक्तित्व व कर्तृत्वावर प्रकाश पाडणारी भाषणे झाली. श्री. वामनरावांचे जुने मित्र व सुप्रसिद्ध सिने संगीत दिग्दर्शक श्री. सी. रामचंद्र या समारंभाला उपस्थित होते.

५.६ प्रा. भा. श्री. परांजपे, मराठीचे साक्षेपी टीकाकार यांच्या 'रामदासाचे साहित्यशास्त्र' या ग्रंथाला पुण्याच्या ग्रंथोत्तेजक सभेने दोनशे रुपयाचे पारितोषिक देऊन गौरविले, त्याबद्दल संघाने त्यांचे अभिनंदन केले.

५.७ प्रा. शरच्चंद्र टोंगो, उमरखेड येथे भरणाऱ्या वि. सा. संघाच्या ३१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष यांचा सन्मान दि. २५–२–७५ रोजी करण्यात आला त्याच वेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. ब. ना. ठोकबोटे व कार्याध्यक्ष श्री. स. बा. नरवडे यांचाही सत्कार करण्यात आला.

५.८ डॉ. कुमार गंधर्व, संघाचे आजीव सदस्य, याना ८ एप्रील रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यांचे अभिष्ट चिंतन करण्यात आले.

६. जन्मशताब्दि

६.१ कै. त्र्यंबक सीताराम कारखाननीस, महाराष्ट्र नाट्य मंडळाचे संस्थापक, दिग्दर्शक, नाटककार व कलावंत यांची १५ एप्रील ७४ रोजी जन्मशताब्दि साजरी झाली. त्यांच्या स्मृतीला संघाने अभिनंदन केले.

६.२ कविवर्य 'बी' यांच्या जन्मशताब्दि समारोपादाखल १ जून रोजी त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली.

७. स्मृतिदिन

७.१ खालील मान्यवर साहित्यिकांचे स्मृतिदिन पाळण्यात आले.

नाना जोग	१–५–७४	ह्म्लेटा व बुटपॉलीश एकांकिका सादर करण्यात आल्या.
कृ. प्र. खाडिलकर	२३–८–७४	प्रतिमेला पुष्पहार.
ना. मु. गुप्ते (कवी 'बी')	३०–८–७४	प्रतिमेला पुष्पहार.
अण्णाजी बोबडे	१–१०–७४	प्रा. या. मु. पाठक यांचे भाषण.
य. खु. देशपांडे	२०–११–७४	प्रतिमेला पुष्पहार.
राम गणेश गडकरी	२३–१–७५	कॉ. पी. एन्. कारेकर यांचे भाषण.

७.२ याशिवाय लोकमान्य टिळक पुण्यतिथी (१ ऑगस्ट), गांधी जयंती (२ आक्टोबर) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन (६ डिसेंबर) पाळण्यात आल्या व त्यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या.

८. सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला (संयोजक– श्री. वा. के. अत्रे)

८.१ श्री गणेश व्याख्यानमाला

श्री गणेश व्याख्यानमाला यवतमाळ येथे दि. २०, २१ व २२ जुलैला आयोजित करण्यात आली. सुप्रसिद्ध साहित्यिक व तत्त्वचिंतक श्री. पुरुषोत्तम यशवंत उपाख्य बाबासाहेब देशपांडे यांनी "श्रीज्ञानदेवांचे अद्वैत" या विषयावर तीन व्याख्याने दिली. वि. सा. संघाच्या यवतमाळ शाखेने हा कार्यक्रम फार उत्साहाने आयोजित केला होता आणि रसिकांची उपस्थिती देखील प्रतिदिनी हजारावर होती.

८.२ श्रीशिवाजी राज्यारोहण त्रिशत संवत्सरी

पुण्यश्लोक श्रीशिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाच्या त्रिशत सांवत्सरिक महोत्सवाचे हे वर्ष असल्यामुळे २ जूनला श्रीशिवाजी महाराजांच्या प्रतिमेला संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण

करण्यात आली. व दि. ३ जूनला श्री. रज्जन त्रिवेदी यांचे राजकवि भूषण यांच्या 'शिवबावनी' या शिवबाच्या जीवनावरील काव्यावर व्याख्यान झाले. तसेच परिमल प्रकाशन व संघ यांच्या संयुक्त योजनेने श्री शिवछत्रपती दर्शन दि. १० जानेवारी ७५ पर्यंत प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला उपराष्ट्रपती माननीय बी. डी. जत्ती यांनी भेट दिली हे प्रदर्शनाचे वैशिष्ट्य होते.

८.३ श्री राम चरित मानस चतु:शती समारोह

संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी यांच्या तुलसी रामायणाच्या चतु: शताब्दि निमित्त हा समारोह दिल्ली येथील अखिल भारतीय केंद्रीय समितीच्या प्रेरणेने आणि सहाय्याने दि. १२ व १३ आक्टोबर ह्या दिवशी साजरा करण्यात आला. डॉ. नरेंद्र, केंद्रीय समितीचे संचालक आणि दिल्ली विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख, मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. समारोहाचे उद्घाटन महाराष्ट्र विधान सभेचे सभापती माननीय श्री शेषराव वानखेडे यांच्या शुभहस्ते झाले. डॉ. कमलाकांत पाठक यांनी प्रास्ताविक भाषण केले. प्रा. भ. श्री. पंडित यांनी तुलसी रामायणांतील सौंदर्य स्थळे ह्या विषयावर व्याख्यान दिले. श्री तुलसीदासजीच्या रामचरित मानस या ग्रंथाचे अपूर्वत्व व श्रेष्ठत्व विशद करणारे भाषण श्री. शेषराव वानखेडे यांनी केले. दि. १३ ऑक्टोबरला सकाळी झालेल्या परिसंवादात सौ. दमयंती पांढरीपांडे, प्रा. माणिकराव वैतुले, डॉ. प्रा. कमलाकांत पाठक डॉ. रामचंद्र मिश्र यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी पं. शिवचरण छांगाणी होते. सायंकाळी प्रा. वा. ना. आसमवार यांचे 'तुलसी रामायण व एकनाथाचे भावार्थ रामायण' या विषयावर भाषण झाले. श्री. नरहरिदास तल्हार यांनी तुलसी रामायणाच्या स्वकृत मराठी भाषांतरातील निवडक भागाचे पठण केले. या प्रसंगी तुलसी रामायण व त्यावरील मराठी व भिन्न भाषी पुस्तकांचे प्रदर्शन श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाने आयोजित केले होते.

८.४ इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा

कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा दि. १९ जाने. ७५ ला आयोजित करण्यात आली. भाषणाचा विषय 'माझा आवडता साहित्यिक' असा होता. या स्पर्धेत २२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पारितोषिके विजेत्यांची नांवे युगवाणीच्या फेब्रु-मार्च ७५ चे अंकांतील कार्यवृत्तात दिले आहेत.

८.५. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

ही स्पर्धा वक्तृत्वोत्तेजक सभा पुणे आणि वि. सा. संघ ह्यांच्या विद्यमाने दि. १३, १४ व १५ सप्टेंबरला धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय "देशाच्या नवनिर्माण कार्यात विद्यार्थी शक्तीचा वापर करणे योग्य आहे" हा होता. एकूण २२ महाविद्यालयाच्या ४४ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. पारितोषिके विजेत्यांची नांवे युगवाणीच्या आगस्ट-सप्टेंबर अंकांतील कार्यवृत्तांत दिली आहेत.

